**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७१

निर्णय दिनांक १६-०२-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो.<br>बरकतउल्ला खॉन,<br>घर नं. ९-४-४५५, खयूम प्लॉट्स,<br>मॅफको जवळ, नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

<u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. विठ्ठल यशवंतराव बिरादार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. सुनिल अण्णासाहेब वांढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, २००४-०५, २००५-०६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालया अंतर्गत रस्त्यावर फलक बसविण्याच्या कामासंदर्भा-तील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ वर्षे २००४-०५ आणि २००५-०६ मध्ये विविध योजना अंतर्गत व देखभाल दुरुस्ती कार्यक्रम गट “ब” ते “क” (२००४-२००५) आणि (२००५-०६) किती रस्त्यावर फलक बसविण्याचे कामास मंजुरी आहे.

१. या दोन वर्षात किती कामाचे अंदाजपत्रक मंजूर झाले.

२. किती कामे चालू आहेत याची यादी द्यावे.

३. किती कामाची निविदा करणे बाकी आहे याची यादी देणे.

४. किती कामे मजूर सहकारी संस्थांला दिले त्याची यादी द्यावे.

५. किती कामे फॅब्रीकेशन मजूर सहकारी संस्थेस देण्यात आले त्याची यादी.

६. किती कामे एम. एस. एस. आय. डी. ला देण्यात आले त्याची यादी.

७. वर्षे २००५-२००६ चा देखभाल दुरुस्ती कार्यक्रमामधील मंजूर कामात किती अंदाजपत्रकात सूचना व माहिती फलक बसविण्याची तरतूद केलेली आहे. त्या कामाची यादी व अंदाजपत्रकाची प्रत द्यावी.

८. वर्षे २००५-२००६ च्या गट ब ते क कार्यक्रमात “रस्त्यावर फलक बसविणे” अशा कामाचे नांव नसलेले जॉब नंबरच्या किती अंदाजपत्रकात फलक बसविण्याची तरतूद केलेली आहे.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली काही माहिती पुरविली.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने व विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांच्याकडील दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले असल्याचे कळविले. तद्वतच या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विलंब झाल्याबद्दल उचित कारवाई करण्यात येत असल्याबद्दल देखील अपिलार्थीस त्यांनी कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १९-०५-२००६ रोजी अपिलार्थीस पुनश्चः माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०४-२००६ रोजी जी माहिती पुरविली होती तीच माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविली.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न दिल्याने व जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी त्यांच्या उपस्थितीत घेतली नाही व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती पूर्णतः चुकीची असल्याचे नमूद केले आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सध्या फलक बसविण्याची किती कामे उपरोक्त कालावधीमध्ये केली गेली आहे याची माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी मार्च अखेरच्या कामाच्या ताणामुळे विलंब झाला आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १८-०४-२००६ रोजी व नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे दिनांक १९-०५-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या माहितीची मूळ प्रत आयोगास दाखविली असता मूळ प्रतीतील वाक्य टंकलेखकाने चुकीचे टाईप केले असल्याने अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ ची माहिती चुकीची पाठविली गेली असल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिलेला निर्णय अपिलार्थीच्या मूळ माहितीस सहाय्यभूत करणारा असल्याने त्यांना अपिलार्थीस पाचारण करुन सुनावणी घेण्याची आवश्यकता वाटली नाही. त्याच बरोबर अपिलार्थीस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांनी संबंधितांना ताकीद दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार कारवाई करणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीन्वये कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना दिनांक ०९-०४-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत असतांना या प्रकरणी दिनांक १८-०४-२००६ रोजी म्हणजे एकूण ९ दिवसाच्या विलंबाने माहिती पुरविली गेल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी तयार केलेली माहिती टंकलिखीत करत असतांना मुद्दा क्रमांक २ मधील माहितीमध्ये संबंधीत टंकलिपिकाने "नाही" या शब्दाच्या जागी "आहे" हा शब्द टंकलिखीत केला आहे. याचबरोबर अपिलार्थीने मागणी कलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस सरळपणे उत्तर दिले नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०४-२००६ व १९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती

पुरविलेली आहे ही माहिती पाहता त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ संदर्भात चुकीची उत्तरे दिली आहेत असे दिसून येते. सदर चुकीचे कारण म्हणजे लिपिकाने केलेली चूक आहे तसेच जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात सरळपणे माहिती दिलेली नाही. उर्वरीत मुद्दयावरील जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पूर्णतः चुकीची आहे असे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती चुकीची कशी आहे हे सिध्द करण्यासाठी त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केला नाही किंवा आज झालेल्या सुनावणीसही ते उपस्थित नाहीत.

वरील सर्व वस्तुस्थिती पाहता या ठिकाणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व विसंगत माहिती पुरविल्याचे काही प्रमाणात सिध्द होते. अपिलार्थीस दिनांक १८-०४-२००६ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये झालेली चूक जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेल्या माहितीमध्ये दुरुस्त करता आली असती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिसून येते. जरी ही कारवाई स्वाभाविकपणे केली असली तरी शेवटी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती विसंगत होती हा मुद्दा शिल्लक राहतो. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता सहाय्य करणारे त्यांचे जे इतर कर्मचारी / अधिकारी आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी देखील जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस माहिती विलंबाने देण्यासंबंधी मार्च मधील कामांचा ताण असे कारण दर्शविले आहे. मार्च महिन्यामध्ये जरी त्यांच्यावर कामाचा ताण असला तरी मार्च महिन्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणांनी

विलंबाने माहिती दिली तरी चालू शकेल अशा अर्थाची कोणतीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेला मार्च महिन्यातील कामे हा मुद्दा मुळात कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय आणि स्विकारार्ह नाही.

त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी लावलेल्या ९ दिवसाच्या विलंबाबाबत ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (९ दिवसांसाठी) एकूण रुपये २२५० /- (अक्षरी- रुपये दोन हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली भरावी. जन माहिती अधिकारी यांनी विनंती केल्याप्रमाणे सदर रक्कम त्यांनी २ हप्त्यात भरावी. जन माहिती अधिकारी हे शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरतील हे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल पुढील महिन्यापासून दरमहा शास्तीची रक्कम वसूल होईपर्यत नियमीतपणे पाठवावा. संबंधीत शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत करावी. अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांनी मुळात विसंगतीपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक २ व ७ च्या संदर्भात वस्तुस्थितीवर आधारीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेली माहिती, त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशी विसंगत व नवीन असल्याने, त्यांनी व्दितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेला नवीन माहितीचा मुद्दा आयोग विचारात घेत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ व ७ च्या संबंधी वस्तुस्थितीदर्शक माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (९ दिवसांसाठी) एकूण रुपये २२५० /- (अक्षरी- रुपये दोन हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

४. जन माहिती अधिकारी हे शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरतील हे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी पहावे व

यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल पुढील महिन्यापासून दरमहा शास्तीची रक्कम वसूल होईपर्यत आयोगास नियमीतपणे पाठवावा.

५. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी संबंधीत शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत करावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन, घर नं. ९-४-४५५, खयूम प्लॉट्स, मॅफको जवळ, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वरिष्ठ कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०१

निर्णय दिनांक १६-०२-२००८

श्री. नाथाराम कोंडीबा कोरडे, : अपिलार्थी
मु. पो. नाळवंडी,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, गिरी हॉस्पिटलसमोर, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड |
| जन अपिलीय अधिकारी | : | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गिरी हॉस्पिटलसमोर, बीड |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नाथाराम कोंडीबा कोरडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई श्री. गोपीनाथ सुखदेव घुले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा विशेष

जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्री. संजय राधाकिसन दाणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), त्याबरोबर त्रयस्त पक्षकार अध्यक्ष सुशील शिक्षण संस्था बीड श्री. दिनेश लाला पवार (यापुढे त्यांना त्रयस्त पक्ष असे संबोधण्यात येईल) व विभागीय समाज कल्याण अधिकारी श्री. सदानंद गोविंदराव पाटील हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८८ ते २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील सुशील शिक्षण संस्था बीड या संस्थेंतर्गत असलेल्या प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेसंदर्भात खालील प्रमाणे ३ मुद्दयावर माहिती मागितली होती.

"१. सुशील शिक्षण संस्था, बीड या संस्थेने प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेच्या विभागास सुरु करतांना मान्यतेसाठी दाखल केलेल्या प्रस्तावाच्या संस्थेच्या हमीपत्रासह व शासनाने घालून दिलेल्या मान्यतेच्या अटींसह अनुदान मंजुरी आदेशाच्या सत्यप्रती.

२. सुशील शिक्षण संस्था, बीडच्या संचलीत प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई या आश्रमशाळेच्या शैक्षणिक वर्षे २००४-०५ साठी कर्मचारी भरती करतांना घेतलेल्या अधिकृत प्रमाणित रोष्टरच्या सत्यप्रती.

३. सुशील शिक्षण संस्था, बीडच्या संचलीत प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई या आश्रमशाळेच्या शैक्षणिक वर्षे २००३-०४ साठी बिंदु नामावलीप्रमाणे प्रवर्गनिहाय शिल्लक अनुशेष पदांची संख्या व बि. सी. सेल (मागासवर्गीय) कार्यालयाच्या अधिकृत आदेशाच्या प्रमाणित सत्यप्रती."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी बीड यांच्याकडे केला होता. तथापि या प्रकरणी ते अपिलीय अधिकारी असल्याने अपिलार्थीच्या सदर अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई - जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी आहेत - त्यांना दिलेली आहे. तथापि या पत्रासोबत अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक १२-०९-२००६ रोजीचा अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचा कोणताही उल्लेख या पत्रामध्ये नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीमध्ये असे सांगितले की, अपिलार्थीचा विचाराधीन माहितीसाठीचा अर्ज आजतागायत त्यांना प्राप्त झालेला नाही व तसे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये दिनांक १४-११-२००६ रोजी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

सदर अपील अर्ज विभागीय समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १५-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते. तथापि सदर अपील अर्ज विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांनी सुनावणीमध्ये शपथपत्राव्दारे कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे दिनांक १५-०९-२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाले तथापि त्यासोबत अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांना प्राप्त झालेली नाही. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या पत्रामध्ये सहपत्र म्हणून कोणत्याही जोडपत्राचा उल्लेख नाही.

अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज त्यांच्याकडे गेला नसल्याने त्यांना अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कारवाई करता आली नाही. अपिलार्थीने या संस्थेसंदर्भात त्यांच्याकडे अशा प्रकारच्या माहितीसाठीचे एकूण १३ अर्ज केले असून त्यांना त्यांनी मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरविली आहे. विचाराधीन असलेल्या मूळ अर्जाची प्रत त्यांनी आज पाहिली असून अपिलार्थीने मागितलेल्या ३ मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भातील माहिती त्यांनी यापूर्वीच अपिलार्थीस त्यांनी केलेल्या वेगळ्या अर्जासंदर्भात पुरविली आहे.

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आयोगाकडे अपिलार्थीने दाखल केलेले कथित अपील अर्ज त्यांच्याकडे अथवा त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही व तसे त्यांनी शपथपत्राव्दारे कबूल केले आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने व ते या प्रकरणी प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी नसल्याने यांचे या मुद्दयावर काहीही म्हणणे नाही. अपिलार्थीने वस्तुतः त्यांच्याकडे प्रथम अपील करावयास हवे होते तथापि त्यांनी अपील अर्ज त्यांच्याकडे केलेला नाही त्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याची संधी त्यांना प्राप्त झाली नाही.

त्रयस्त पक्षातर्फे श्री. दिनेश लाला पवार यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०९-२००६ व आज विचाराधीन असलेल्या अर्जात त्यांच्या संस्थेसंदर्भात मागितलेली माहिती अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदी नुसार देण्यास त्यांची काही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्त पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी (मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई) यांच्या कडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो प्रत्यक्षतः जे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले आहेत त्यांच्याकडे ५ दिवसाच्या आत तो पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) नुसार अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी त्यांनी नेमके उलटी कारवाई केल्याने, म्हणजेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संपर्क साधण्याचे सूचित करणे व त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना देणे अशा प्रकारच्या कारवाईमुळे

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना ७ दिवसाच्या आत सहजपणे देता येईल अशी प्रत्यक्षतः कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा व अपील अर्जच प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर कारवाई करणे अथवा प्रस्तावीत करणे योग्य होणार नाही. तथापि या घटनेस विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय प्रामुख्याने जबाबदार असल्याचे दिसून येते.

सबब अपिलार्थीचा मूळ अर्ज प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असलेले मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई यांच्याकडे का पोहोचला नाही याची त्यांनी आपल्या कार्यालयात चौकशी करुन संबंधीतांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई यांच्या कडे तयार असून ही माहिती अपिलार्थीस देण्यास त्रयस्त पक्षाची कोणतीही हरकत नाही हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत (मुख्याध्यापक गेवराई) यांच्याकडे हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत हस्तांतरीत करावी. सदर अर्ज मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज व अपील प्राप्त न झाल्याने व त्यांनी केलेल्या विधानाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या या म्हणण्यावर आपले कोणतेही लेखी म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे असे आदेश देण्यात येत आहेत की,

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील संबंधीत कर्मचा-यावर मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज न पाठविण्यासंदर्भात त्यांच्यावर, आवश्यक असल्यास, यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज अथवा त्याची सत्य झेरॉक्स प्रत मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई यांच्याकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत पाठवावी. तदनंतर संबंधीत मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा गेवराई यांनी अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य नोंदणीकृत टपालाव्दारे पाठवावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नाथाराम कोंडीबा कोरडे, मु. पो. नाळवंडी, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा,

नाईकनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव / अध्यक्ष, सुशील शिक्षण संस्था, मातोश्री निवास, महावीर चौकपेठ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२८
निर्णय दिनांक- २०-०२-२००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मधुकर गंगाधरराव दिवाण,<br>पवन-पुत्र, शिवाजी नगर, पाथरी<br>जिल्हा-परभणी. | | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद, पाथरी<br>जिल्हा-परभणी. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन)<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २०-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.मधुकर गंगाधरराव दिवाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पाथरी, श्री.कृष्णा बाळकृष्णा निपाणे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त

कार्यालय, औरंगाबाद, श्री. सोमनाथ गुंजाळ (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतः विषयी व इतर ३ कर्मचा-यांच्या विषयाची नस्ती पाहण्याची मागणी खालील प्रमाणे केली होती.

''१) श्री. म.ग.दिवाण यांच्या विरुध्द अपहाराचा गुन्हा दाखल केलेली फाईल.

२) श्री.डी.बी.चिंचाणे यांची नियुक्ती संचिका व पद भरती बाबत सक्षम अधिका-यांच्या मंजूरी आदेशाची फाईल.

३) श्री.डी.एस.वडवणे व श्री.आर.एन.नवले यांची नियुक्ती संचिका व पद भरती बाबत मंजूरी आदेशाची संचिका. ''

जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने अर्ज केला त्याच दिवशी त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक-१ शी संबंधीत विषयाची नस्ती वगळता उर्वरित दोन मुद्यावरील नस्त्या अपिलार्थीस त्यांनी दाखविल्या. सदर नस्त्याच्या पाहणी संदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाच्या मागेच जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या हस्तक्षरात असे लिहून दिले आहे की, ''आज दिनांक १९-०१-२००६ रोजी माझ्या अर्जानूसार मला मूळ संचिका बघावयास मिळालेल्या नाहीत. ज्या (०३) संचिका दाखविल्या आहेत. त्या संचिकामध्ये पद भरती बाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे आदेश दिनांक- ०१-१२-१९८८ चे नव्हते व श्री.चिंचाणे यांचे आदेश संचिकेत नाहीत. तरी (०४) फाईलस बघने व निरीक्षण

करणे बाकी आहे. ''  थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण नस्त्या दाखविल्या नाहीत, असे अनुमान यावरुन काढण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या नस्त्याने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनाक- २४-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १०-०४-२००६ रोजी घेवून या संदर्भातील आपले आदेश दिनाक- १५-०४-२००६ रोजी पारीत केले.  त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन  शासकीय माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या सर्व संचिका निरीक्षणासाठी ७ दिवसाच्या आत त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात व सदर संचिकेतील जी कागदपत्रे  अपिलार्थी यांना लागतील, त्याच्या छायाप्रती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे, सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी याच्या आदेशा प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये, त्यांनी मागणी केलेल्या सर्व फाईलस नगरपरिषद कार्यालयाकडे उपलब्ध असून त्यांनी केव्हाही येवून संबंधीत फाईलचे निरीक्षण करावे व आपल्याला आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती विनामुल्य घेवून जाव्यात, असे अपिलार्थीस कळविले. सदर पत्र घेवून नगरपरिषदचे शिपाई या पत्राची तामिली करण्यासाठी अपिलार्थी यांच्या घरी गेले असता, अपिलार्थी हे त्यांच्या निवासस्थानी उपलब्ध न झाल्यामूळे या पत्राची तामिली अपिलार्थीस करता आली नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ते नगरपरिषदेचे कर्मचारी असतांना त्यांना दिनांक- २६-०५-२००६ चे पत्र त्यांना शिपायामार्फत पाठविण्याचे जन

माहिती अधिकारी यांना कोणतेही प्रयोजन नव्हते. जन माहिती अधिकारी यांच्या सहायकाने अशी माहिती दिली की, अपिलार्थी या कालावधीमध्ये निलंबीत असल्याने ते कार्यालयात उपस्थित नव्हते. तर अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, ते नगर परिषदेच्या कार्यालयात हजर राहिल्याप्रित्यर्थ हजेरीपत्रकावर रोज सही करीत असतात. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाहणीसाठी आवश्यक त्या संचिका उपलब्ध होवू शकल्या नाहीत, असे येथे दिसून येत आहे.

या सर्व घटनामूळे व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेवर संचिका न दाखविल्यामूळे, दिलेल्या खोटया व चूक माहितीमूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये कार्यवाही करावी. जन अपिलीय अधिकारी यांना देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आर्थीक दंड व शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याची विनंती केली होती तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्यामूळे त्यांना आयोगाकडे हे व्दितीय अपील करावे लागत असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते पाथरी नगरपरिषदेमध्ये वरिष्ठ-लिपीक या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्यापेक्षा सेवाजेष्ठतामध्ये कनिष्ठ असलेल्या कर्मचा-यांना पदोन्नती मिळाली असल्याने व या विरुध्द न्याय मागण्या करिता त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे पाहणीसाठी मागितलेल्या नस्त्या हव्या होत्या. तथापि जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना आवश्यक असणा-या नस्त्या उपलब्ध करुन दिल्या तर नाहीच. परंतू अपिलार्थी यांच्यावर विभागीय चौकशीची

कार्यवाही करुन त्यांना पदोन्नतीपासून वंचीत ठेवले. आजही त्यांची मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या नस्त्या पाहणीची मागणी कायम आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केले असल्याने त्यांना शास्ती लावावी व त्यांच्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही आदेशीत करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने एकूण ४ कर्मचा-या विषयीच्या नस्त्या पाहण्याची मागणी त्यांच्याकडे केली होती. या ४ कर्मचा-यांपैकी एक कर्मचारी स्वतः अपिलार्थी हे आहेत. अपिलार्थीने नस्त्या पहाणीसाठी ज्यावेळेस अर्ज केला त्या वेळेस त्यांचेशी संबंधीत नस्ती नगरपरिषदेच्या वकीलाकडे त्यांनी पाठविली असल्यामूळे, त्यांना ती अपिलार्थीस दिनांक- १९-०१-२००६ रोजी दाखविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या चारही नस्त्या त्यांच्याकडे आजही उपलब्ध असून ते त्या अपिलार्थीस दाखविण्यास तयार आहेत. अपिलार्थीने, आज विचाराधीन असलेल्या मुद्यावरच त्यांच्याकडे दिनांक- ०७-०२-२००६ रोजी अर्ज केला असतांना या अर्जा संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०२-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये संचिकाचे निरीक्षण करण्याची लेखी विनंती केली होती तथापि अपिलार्थीने सदर पत्र घेण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग व्दारे पाठविले. अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रित्यर्थ त्यानी पोस्टाची पोंचपावती आयोगासमोर सादर केली. अपिलार्थी यांना नगरपरिषद कार्यालयाने त्यांच्या गैरवर्तणूकी बाबत निलंबीत केले असल्याने, अपिलार्थीने नगरपरिषदेचे कर्मचारी/ अधिकारी यांना त्रास देण्याच्या हेतूने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संचिका निरीक्षणासाठी दाखविल्या आहेत. परंतू माहिती घेवूनही माहिती मिळाली नाही असे म्हणण्याची अपिलार्थी यांना एक प्रकारची सवय झालेली आहे. अपिलार्थीने एकूण ४

प्रकरणातील संचिका जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. यापैकी किती संचिका अपिलार्थीस  दाखविल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीस ३ संचिका दाखविल्या असल्याचे आयोगासमोर सांगितले. एक संचिका अपिलार्थीस न दाखविण्याचे कारण विचारले  असता,  त्यांनी  ते  या पदावर  २२ जानेवारी २००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीस आवश्यक ती  प्रश्नाधीन नस्ती  न दाखविण्याची कारणे- तत्कालीन मुख्याधिकारी यांना माहिती असावी, असे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर सर्व संचिका ७ दिवसाच्या आत पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले होते.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती खोटी व चूक आहे, असे अपिलाचे कारण दर्शविले आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निश्चीतपणे कोणती माहिती खोटी दिली व दिलेली माहिती खोटी कशी आहे. हे अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थी यांनी आयोगास असे सागितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविलेल्या संचिकेमध्ये  पद भरती बाबतचे सक्षम प्राधिकरण यांचे आदेश दिनांक- ०१-१२-१९८८ चे नव्हते व श्री. चिंचाणे यांचे आदेशही त्या संचिकेत नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविलेल्या संचिका व त्यातील माहिती खोटी आहे, असे त्यांचे मत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने केलेल्या

त्यांच्या दिनाक- १९-०१-२००६ रोजीच्या अर्जा संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत प्रतिसाद देवून ४ प्रकरणापैकी ३ प्रकरणाच्या नस्त्या अपिलार्थीस दाखविल्या आहेत. एक प्रकरण जे अपिलार्थी यांच्याशी संबंधीत होते त्या प्रकरणा संबंधीची नस्ती नगरपरिषदेच्या वकीलाकडे पाठविली असल्याने, त्यांना ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आली नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सदर नस्ती दाखविण्याची इच्छा असती तर त्यांनी संबंधीत वकीलाकडून सदर नस्ती तात्काळ प्राप्त करुन घेवून ती अपिलार्थीस निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देवू शकले असते. संबंधीत नस्ती अभिप्रायासाठी ज्या वकीलाकडे पाठविली ते वकील व जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे मुख्यालय एकच असल्यामूळे, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली नस्ती पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे, हे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपीलासंदर्भात दिनाक १५-०४-२००६ रोजी निर्णय देवून अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या नस्तीच्या पाहणी संदर्भात आपले आदेश पारीत केले आहेत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही अंदाजे १ वर्ष १० महिने इतका कालावधी ओलांडूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याशी संबंधीत नस्त्या उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत, ही बाब येथे प्रकर्षाने लक्षात येते. आजमितीस अपिलार्थी हे नगरपरिषदेच्या कार्यालयामध्ये नियमितपणे कार्यालयीन कामकाजासाठी उपस्थित राहत असतात. अपिलार्थीस त्यांनी पाहणीकरिता मागणी केलेली नस्ती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काहीही असली तरीही, ( या प्रकरणी, विशेषतः अपिलार्थी यांच्या विरुध्द नगरपरिषद प्रशासनाने शिस्तभंग विषयक कार्यवाही संदर्भातील अंतिम निर्णय दिनाक २९-१०-२००७ रोजी लागला असल्यामूळे,) जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यास काहीच हरकत नव्हती. तथापि त्यांनी तसे केले नाही. मात्र आज जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादामध्ये त्यांनी अपिलार्थीस सर्व

नस्त्या ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास आयोगास आश्वासीत केले आहे व त्याप्रमाणे त्यांनी लेखी शपथपत्र आयोगास सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणी माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना पहाणीसाठी हव्या असलेल्या ४ नस्त्या पैकी ३ नस्त्या उपलब्ध करुन दिल्या आहेत व एक नस्ती पाहणीसाठी आता उपलब्ध करुन देत आहेत, हे पाहता त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केल्याचे निश्चितपणे सिध्द होत आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या पूर्ण नस्त्या अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत उपलब्ध न करुन देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांनी दर्शविलेल्या उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर संचालक, नगर परिषद संचालनालय, मुंबई, यांनी प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन व तदनंतर आयोगास १ महिन्याच्या आत आपला अहवाल सादर करावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना खोटी व चूक माहिती दिल्याचा मुद्दा आयोग अमान्य करीत आहे. कारण अपिलार्थीने अपेक्षित केलेले आदेश त्या नस्तीमध्ये नसल्याने, संपूर्ण नस्त्या चुक किंवा खोटया ठरु शकत नाहीत. अपिलार्थीस जर काही कागदपत्रे निश्चीतपणे हवी असतील तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील योग्य त्या तरतूदीनूसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळयाने अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. केवळ त्यांना अपेक्षित असलेले आदेश संबंधीत नस्त्यामध्ये नाहीत, म्हणून सदर नस्ती खोटी ठरत नाही. तव्दतच जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश दिले नसल्याच्या या

कारणास्तव अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले हाही त्यांचा मुद्दा आयोग अमान्य करीत आहे. कारण जन अपिलीय अधिकारी यांना अशा प्रकारची अधिकारीता माहिती अधिकार अधिनियमा व्दारे दिलेली नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- २०-०२-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत

१. श्री.मधुकर गंगाधरराव दिवाण, पवन-पुत्र, शिवाजी नगर, पाथरी, जिल्हा-परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई-४०० ०३०, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२९
निर्णय दिनांक- २० फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सतीश प्रभाकरराव दिवाण,<br>१ 'शिवप्रसाद' शिक्षक कॉलनी पाथरी,<br>तालूका-पाथरी, जिल्हा-परभणी. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग पाथरी तालूका- पाथरी, जिल्हा परभणी. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी. जिल्हा-परभणी. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी |
| | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी | : | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड. |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २०.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.सतीश प्रभाकरराव दिवाण (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथरी, श्री.राधाकिशन नरसिमलू पटवेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी, श्री. प्रकाश रामराव किर्ती (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-०२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००० ते मार्च, २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती व तसेच जलसंपदा विभाग व कृषि विभागाशी संबंधीत एकूण ९ मुद्यांवर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) जानेवारी २००० ते मार्च २००५ या कार्यकाळात सा.बा.उपविभाग अंतर्गत किती व कोणकोणती कामे करण्यात आली ? त्याचा तपशिल.

२) त्या सर्व कामावर किती खर्च करण्यात आला व तो खर्च कोणत्या बजेटमधून करण्यात आला? त्याचा तपशिल.

३) त्या सर्व कामांचे गुत्तेदार कोण होते ? त्यांची नावे ?

४) पाथरी तालूका कृषी कार्यालय बांधकामास किती खर्च आला ? व सदरील काम कोणत्या बजेटमधून करण्यात आले ?

५) पाथरी तालूका कृषी कार्यालयाने हॉल खोल्या, स्वच्छतागृह- शेतकरी निवास आदि बांधण्यात आले आहे काय ? असल्यास विवरण.

६) पाथरी तालूका कृषी कार्यालयाच्या बांधकामाचे गुत्तेदार कोण होते ? त्यांची नावे ?

७)	पाथरी तालूका कृषी कार्यालयाच्या बांधकामास कधी सुरुवात करण्यात आली ? व काम कधी पूर्ण झाले ? तसेच सदरील इमारत पाथरी तालूका कृषी कार्यालयाला कधी हस्तांतरीत केली ? याबाबत सविस्तर माहिती.

८)	जायकवाडी पाटबंधारे उप विभाग क्र-६ कार्यालयाच्या परिसरामध्ये इतर किती इमारती आहेत ? त्यापैकी काही इमारती इतर संस्थांना / व्यक्तींना दिल्या आहेत काय ? असल्यास विवरण.

९)	पाथरी तालूका कृषी कार्यालयाच्या इमारतीच्या जागेवर अगोदर काय होते? त्याचा तपशिल."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण ९ मुद्दांपैकी सार्वजनिक बांधकाम विभागाशी ३ मुद्दे, कृषि विभागाशी ५ मुद्दे, तर जलसंपदा विभागाशी १ मुद्दा असल्याचे दिसून येते. थोडक्यात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याशी व इतर कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती मागितली. अपिलार्थीच्या वरील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस विशिष्ट कामा विषयी माहितीची मागणी करण्याचे सूचित केले व त्याचबरोबर अपिलार्थीच्या अर्जामध्ये क्रमांक-४ ते ९ हे मुद्दे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्याचे त्यांनी कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०५-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिल जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक- ०६-०६-२००६ रोजी प्राप्त झाले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपीलार्थीच्या अपीलअर्जा संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १३-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे व अपिलार्थीस माहिती वेळेत न देण्याचे कारणे त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती वेळेत दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालून त्यांच्या अपीलावर निर्णय दिला नाही व अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचीत ठेवले आहे, असे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामूळे, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती सार्वजनिक बांधकाम, कृषि विभाग व जलसंपदा विभागाशी संबंधीत होती. अपिलार्थीने सार्वजनिक बांधकाम विभागाविषयी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्याने सदर माहिती त्यांना देण्यास वेळ लागणार असल्याची कल्पना त्यांच्याकडील दिनांक- ०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना दिली होती. तदनंतर कृषि

विभाग, जल संपदा विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेवून त्यांनी ती अपिलार्थीस अनुक्रमे दिनांक ३०-०६-२००६ व १०-०७-२००६ रोजी दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक- ०४-०२-२००७ रोजी दिलेली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज दिला त्यावेळेस माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी नव्यानेच सुरु झाली असल्याने त्यांना या कायद्याच्या तरतुदी विषयी पुरेशी माहिती नव्हती. अपिलार्थीस माहिती देणे अथवा माहिती देण्यास टाळाटाळ करणे असा त्यांचा उद्देश नव्हता.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संबंधीत प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी या अपीलाची सुनावणी घेतली नाही. जर या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नव्हते तर अपिलार्थीचा अपील अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी आहेत, त्यांच्याकडे का पाठविला नाही, हे विचारले असता त्यांनी त्यांची चूक कबूल केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जलसंपदा व कृषि विभागाचे संबंधीत त्यांच्या विभागा बरोबरच संबंधीत माहिती मागितली आहे. उक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाची प्रत संबंधीत विभागास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पाठवून देणे, या प्रकरणी उचित ठरले असते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करुन इतर विभागाकडून अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम

विभागाशी संबंधीत मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, त्यांनी कोणत्या एका विशिष्ट बाबीविषयी अथवा कामाविषयी माहिती मागितल्याचे दिसून येत नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत मोघम असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळणे हा त्यांचा जरी हक्क असला तरी माहिती मागवितांना थोडा विवेक बाळगणे, हे त्यांचे कर्तव्य ठरते. या प्रकरणी अपिलार्थीने अशा प्रकारचा विवेक जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवितांना ठेवल्याचे आढळून येत नाही. आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस तिन्हीही विभागाची पूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती देण्याकरिता सुमारे १ वर्षे ८ महिने इतका असमर्थनिय विलंब लावल्याचेही दिसून येत आहे. तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचे अपील विना कार्यवाई तसेच ठेवून दिले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही या प्रकरणाचा निपटारा करतांना आपल्या कार्यशैलीमध्ये कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती, गुत्तेदाराची नावे हा मुद्दा वगळता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-याकडे त्यांच्याकडील बजेट पुस्तिके व्दारे सहज उपलब्ध असू शकते. त्यामूळे अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देणे, हे मोठया जिकरीचे अथवा अवघड काम होते, असे आयोगास वाटत नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- २०-०२-२००८.

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत

१. श्री. सतीश प्रभाकरराव दिवाण, १ 'शिवप्रसाद' शिक्षक कॉलनी, पाथरी, तालूका-पाथरी, जिल्हा परभणी

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथरी, तालूका-पाथरी, जिल्हा-परभणी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, अदालत

रोड, औरंगाबाद- ४३१००५ यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६१

निर्णय दिनांक : २०-०२-२००८

१ श्री. बाबू नामदेव गबाळे, : तक्रारदार
भवानीनगर, कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा उपविभागीय अभियंता (स्थानिक स्तर)
उपविभाग, अहमदपूर जि.लातूर

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. बाबू नामदेव गबाळे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (स्थानिक स्तर) उपविभाग, अहमदपूर जि.लातूर श्री.शिवराज माधवराव हिवाळे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयुक्तांकडे त्यांचे दि. ४.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयुक्तांनी दि. २२.६.२००७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार ते उत्तरवादी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क भरण्यासाठी गेले असता प्रथमतः उत्तरवादी यांनी त्यांच्याकडून शुल्क भरुन घेण्यासाठी टाळाटाळ केली. तथापि बऱ्याच वादावादीनंतर उत्तरवादी यांनी तक्रारदार यांच्याकडून रु. ३६२०/- रकमेचा भरणा त्यांचे कार्यालयात करुन घेऊन तक्रारदारास सदर शुल्क मिळाल्याप्रीत्यर्थ ६७४२६०३ दि. १७.७.२००७ या क्रमांकाची पावती दिली व त्यांना सदर माहिती ताबडतोब देण्यात येईल, असे आश्वासित केले. तथापि तक्रारदार यांनी सदर रकमेचा भरणा करुनही आजतागायत उत्तरवादी यांचेकडून कोणत्याही प्रकारची

माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात ते उत्तरवादी यांच्या कार्यालयात गेले असता सदर माहिती उत्तरवादी यांना देण्यासाठी शासनाकडे त्यांनी निधीची मागणी केली असून, सदर निधी कधी प्राप्त होईल, ते सांगता येणार नाही व त्यास ५ ते ६ महिने सुध्दा लागू शकतील, असे त्यांनी तक्रारदारास सांगितले. थोडक्यात, तक्रारदार यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क उत्तरवादी यांचे कार्यालयात भरुन देखील त्यांना हवी असलेली माहिती केवळ उत्तरवादी यांचेकडे ही माहिती देण्यासाठी निधी उपलब्ध नाही, म्हणून त्यांनी तक्रारदारास माहिती प्राप्त करुन घेण्यापासून वंचित ठेवले आहे.

सदर प्रकरण जल संधारण विभागाशी संबंधित आहे. उत्तरवादी यांनी सुनावणीमध्ये असे सांगितले की, तक्रारदार यांनी त्यांचेकडे माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क त्यांनी शासनाच्या महसूल लेखाशिर्षाखाली दि. २०.७.२००७ रोजी जमा केले आहे.मात्र तक्रारदारास माहिती देण्यापोटी करावा लागणाऱ्या खर्चासाठी त्यांचेकडे कोणत्याही स्वरुपात निधी उपलब्ध नाही, त्यामुळे त्यांनी विभागीय कार्यालयास दि. १७.७.२००७ रोजी, विभागीय कार्यालयाने मंडळ कार्यालयास दि. २३.७.२००७ रोजी व मंडळ कार्यालयाने दि. ७.८.२००७ रोजी सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभागास आवश्यक त्या निधीची मागणी केली आहे. सदर निधी त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर तक्रारदारास हवी असलेली माहिती देण्यासाठी ते तयार आहेत.

उत्तरवादी यांनी आजच्या सुनावणीमध्ये त्यांची प्रशासकीय अडचण जरी पुढे केली असली तरी, एकदा तक्रारदार यांनी आवश्यक ते शुल्क त्यांचे कार्यालयात भरल्यानंतर त्यांना हवी असलेली माहिती विहित मुदतीत देणे उत्तरवादी यांचे प्रथम कर्तव्य ठरते. उत्तरवादी यांनी आवश्यक त्या फीचा भरणा केल्यानंतर ६-७ महिने उलटून गेल्यानंतरही त्यांना आवश्यक ती माहिती संबंधित विभाग, आवश्यक त्या निधी अभावी देऊ शकत नाही, ही माहिती अधिकाराची शोकांतिका ठरत आहे, असे आयोगास वाटते. तथापि आयोग तसे खचितच होऊ देणार नाही. शासनाने, उत्तरवादी यांना तक्रारदारास माहिती देण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतुद देखील करुन देणे हे शासनाचे प्रथम उत्तरदायित्त्व ठरते. आता शासनाने ज्या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती देण्यासाठी निधी उपलब्ध नसेल व अर्जदारांनी माहितीसाठीचे शुल्क त्यांचे कार्यालयात जमा केले असेल तर त्याचा शासनाच्या संबंधित महसूली जमा लेखाशिर्षाखाली भरणा करण्याऐवजी, त्याचा वापर माहिती देण्यासाठी लागणारा खर्च करण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांचेकडे अनामत म्हणून राहू देण्यासंबंधी व त्यातून माहिती देण्यासाठीचा आवश्यक

खर्च करण्यास क्षेत्रिय अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्याबाबत परवानगी देण्याबाबत शासनाने विचार करावा, असे आयोगास वाटते. या प्रकरणी संबंधित उत्तरवादी यांना आवश्यक तो खर्च करण्यासाठी सचिव, जलसंधारण यांनी त्यांना तात्काळ प्राधिकृत करुन तक्रारदार यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. तक्रारदारास आता प्राप्त होणारी माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने होत असल्याने उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांचेकडून प्राप्त झालेले शुल्क हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत परत करावे व तक्रारदारास विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.सचिव, जलसंधारण यांनी उत्तरवादी यांना, त्यांना तक्रारदाराने मागितलेली माहिती देण्याप्रीत्यर्थ आवश्यक त्या रकमेची तरतुद हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत करावी व तक्रारदारास तद्नंतर सात दिवसांचे आत त्यांना दि. १६.१.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी.

१. तक्रारदारास, त्यांच्याकडून माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रक्कम रु. ३६२०/-उत्तरवादी यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबू नामदेव गबाळे, भवानीनगर, ता. कंधार, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (स्थानिक स्तर) उपविभाग, अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, जल संधारण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५८१

निर्णय दिनांक २१-०२-२००८

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, : अपिलार्थी
मु. पो. तालुका अंबड, जिल्हा जालना

२ ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,
मु. पो. पावसेपांगरी, तालुका अंबड,
जिल्हा जालना

३ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,
मु. आलमगाव, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, अंबड
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, अंबड
जिल्हा जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, अंबड जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, जालना

# <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांच्या वतीने त्यांचे वकील अभया शेलकर तसेच अपिलार्थी श्री. ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, श्री. श्रीमंत विश्वनाथराव शेळके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) श्री. राजपूत ईश्वर नारायण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००३-०४ व २००४-०५ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या कामांची हजेरीपटाची नक्कल."

अपिलार्थीने माहितीचा विषय या सदराखाली खालीलप्रमाणे उध्द्त केले आहे.

"आपल्या कार्यालयामार्फत अंबड तालुक्यात रो. ह. यो. ची कामे झाले आहेत. त्या कामाची सध्याची परिस्थिती काय ? आपल्या कार्यालयामार्फत या वर्षात किती रक्कम खर्च झाली आहे. त्याची कामनिहाय यादी तसेच त्या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांची संख्या गाव व नाव निहाय त्यांना दिलेला कामाचा मोबदला नगदी व धान्य स्वरुपात व हजेरीपटाची नक्कल."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

या प्रकरणी ३ अपिलार्थीनी मिळून ही माहिती मागितली होती. सदर ३ अपिलार्थी म्हणजे श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री. ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे हे होत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त झाले नसल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीत थोडासा बदल केल्याचेही दिसून येते. अपिलार्थीने अपील अर्ज उपविभागीय अधिकारी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, अंबड यांच्याकडे केला होता. वास्तविक उपविभागीय अधिकारी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर हे या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी नाहीत तर कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर हे या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी आहेत. अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये असे सांगितले की, त्यांना निश्चितपणे जन अपिलीय अधिकारी कोण आहेत हे माहिती नसल्याने व तसेच याबाबतचा फलक संबंधितांच्या कार्यालयामध्ये नसल्याने त्यांनी उपविभागीय अधिकारी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात प्रथम अपील केले. उपविभागीय अधिकारी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, अंबड यांनी अपिलार्थीचे सदर

अपील संबंधीत कार्यकारी अभियंता जे या प्रकरणी प्रत्यक्षतः अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे न पाठविता स्वतःकडे विनाकारवाई तसेच ठेवले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ अन्वये व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी मूळ अर्जातील मागणीमध्ये बदल केल्याचे दिसून येते. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही व त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोणतेही आदेश त्यांना प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून २००३-०४ व २००४-०५ मध्ये रोहयो अंतर्गत झालेल्या कामाच्या हजेरीपटाच्या नकला आजही आवश्यक आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याच प्रकारची माहिती मिळालेली नाही. तद्वतच जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोण याचे मार्गदर्शन करणारे फलक लावण्यात आलेले नाहीत त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडेच, ते त्यांचा अपील अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठवतील या अपेक्षेने अपिल अर्ज सादर केला. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची मागणी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी २००३-०४ या कालावधीतील

हजेरीपटाच्या नकला त्यांना दिनांक ०५-०२-२००७ रोजी देण्यासाठी तयार करुन ठेवल्या होत्या व त्यांच्या कार्यालयातील शिपाई अपिलार्थी यांच्याकडे गेले असता अपिलार्थीने अर्धवट माहिती घेण्यास नकार देऊन त्यांना पूर्ण माहिती घेऊन येण्यास सूचित केले. अपिलार्थी यांनी यावर असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजवर फक्त ८३ मस्टरच्या झेरॉक्स प्रती दिनांक ११-०२-२००८ रोजी हस्तांतरीत केलेल्या आहेत. त्यांच्या मते मस्टरची संख्या अंदाजे ५०० च्या घरात आहे. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे सांगितले की, अपिलार्थीस आतापर्यंत न दिलेली २००३-०४ व २००४-०४ या वर्षातील माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून ते आज रोजी अपिलार्थीस ती देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी इतका प्रदीर्घ कालावधी का लागला हे विचारले असता त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या विभागीय कार्यालया-मध्ये दरमहा पाठविली जात असते व ती त्यांच्या कार्यालयामध्ये ठेवली जात नसल्याने विभागीय कार्यालयाकडून ही माहिती हस्तगत करण्यासाठी त्यांना वेळ लागला असे सांगितले. त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती तयार असून त्याची तपासणी करुन ती अपिलार्थीस १५ दिवसाचे आत विनामूल्य देण्याची तयारीही त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस दर्शविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-०४ व २००४-०५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयामार्फत केलेल्या रोहयो योजनेच्या कामांच्या हजेरीपत्रकाच्या नकला मागितल्या होत्या. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही क्लीष्ट स्वरुपाची किंवा फारशी अवघड होती असे आयोग मानत नाही. अपिलार्थीस फक्त जन माहिती अधिकारी यांनी या दोन वर्षातील मस्टरच्या फक्त झेरॉक्स प्रती काढून द्यावयाच्या

होत्या.  तथापि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०५-०२-२०००७ रोजी म्हणजे विहित मुदत टळून गेल्यानंतर अंदाजे साडेआठ महिने इतक्या विलंबाने दर्शविली आहे.  इतक्या विलंबाने देखील त्यांनी अपिलार्थीस सन २००३-२००४ या सालची अर्धवट माहिती तयार करुन ठेवली तर २००४-०५ ची माहिती त्यांनी अपिलार्थीस आजतागायत दिली नाही. आयोगाच्या मते जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस आवश्यक माहिती पुरविण्याच्या या विलंबाचे समर्थन करण्यासाठी केवळ ‘‘इच्छाशक्तीचा अभाव’’ याशिवाय इतर दुसरे कोणतेही कारण त्यांच्याकडे उपलब्ध असणार नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे संबंधीत कर्मचारी सहाय्यक यांनी प्रचंड अनास्था दर्शविल्याचे दिसून येते.  आयोगाने जन माहिती अधिकारी यांना पूर्ण संधी देऊनही त्यांना या विलंबाचे समर्थन करता आले नाही किंबहुना कोणत्याही परिस्थितीत हा विलंब समर्थनीय असू शकत नाही असे आयोगाचे ठाम मत आहे.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या खात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून गोळा करुन घ्यावी लागते असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी त्यांचे जे सहाय्यक कर्मचारी व अधिकारी जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे.  तेव्हा या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाप्रीत्यर्थ संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक कर्मचारी हेही तितकेच जबाबदार ठरतात.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी आणि त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी व अधिकारी या सर्वांना मिळून त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती अद्यापपर्यंत न दिल्याबद्दल माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली भरावी. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी आयोगास सुचविल्याप्रमाणे, शासकीय कोषागारात ३ हप्त्यात भरावी. पैकी यातील पहिला हप्ता त्यांनी मार्च २००८ व अंतीम हप्ता मे २००८ पर्यत भरावा. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगवशात आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे फलक जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नसल्याबाबतचा उल्लेख केला आहे त्याची दखल आता आयोग घेत असून सचिव (जलसंपदा) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावांचे फलक सहजपणे व ठळकपणे दृष्टीस

पडतील अशा दृष्टीने लावण्याच्या सूचना सर्व संबंधितांना तात्काळ द्याव्यात म्हणजे जनसामान्यांस माहितीचा अधिकार अधिनियमातील कारवाईसंबंधी निश्चितपणे योग्य ते मार्गदर्शन सहजपणे प्राप्त होऊ शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व व त्याचे सहाय्यक यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा.

५. सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांनी निकालपत्रामध्ये आदेशीत

केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

औरंगाबाद
दिनांक २१-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, मु. पो. तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, मु. पो. पावसेपांगरी, तालुका अंबड, जिल्हा जालना.

३ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, मु. आलमगाव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

४ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, अंबड जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्रपेटी क्रमांक ५१५, जुने उच्च न्यायालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ कोषागार अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८२

निर्णय दिनांक २१-०२-२००८

श्रीमती कावेरीबाई अंबादासराव टेकाळे, : अपिलार्थी
मु. पो. पोथरा,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक,
संस्कार विद्यालय (प्राथमिक),
नविन भाजी मंडई, नेताजी मैदान, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पंचायत समिती, बीड

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार विद्यालय (प्राथमिक), नविन भाजी मंडई, बीड |
| जन अपिलीय अधिकारी | : | सचिव, संस्कार प्रबोधिनी, नविन भाजी मंडई, नेताजी मैदान, बीड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती कावेरीबाई अंबादासराव टेकाळे

व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संस्कार प्रबोधिनी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार विद्यालय (प्राथमिक) श्री. बालासाहेब दत्तात्रय कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड श्री. पाखरे सुधाकर बन्सी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवेसंदर्भात दिनांक ३१-०७-१९७४ ते २६-०७-१९८७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. मी आपल्या शाळेत दिनांक ३१-०७-१९७४ ते २६-०७-१९८७ पर्यत सेवेत होते. या दरम्यान आपण मला दिलेल्या सर्व नियुक्ती आदेशांच्या प्रती द्याव्यात.

२. या कालावधीत आपण जि. प. बीड यांना सादर केलेल्या संच मान्यतेच्या प्रती द्याव्यात.

३. या कालावधीत सेवेत असलेल्या सर्व कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी द्यावी.

४. आपल्या शाळेमार्फत मी पत्राव्दारे डी. एङ अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. यासाठी आपण दिलेल्या सर्व आदेशाच्या / प्रमाणपत्रांच्या / पत्रव्यवहाराच्या प्रती द्याव्यात. म्हणजेच या शिक्षणासाठी आपण माझ्याशी संबंधीत केलेल्या शासकीय कार्यालयातील पत्रव्यवहाराच्या प्रती द्याव्यात.

५. मला आपण सुरुवातीपासून आजपर्यंत सेवापूस्तिका दिलेली नाही. त्यामूळे मला माझ्या सेवापूस्तीकेची प्रत द्यावी.

६. माझ्या सेवाकाळात आपण मला कोणकोणत्या पदावर किती कालावधीसाठी काम करायला लावले तो कालावधी तारखांसह द्यावा.

७. ११-८-७८ ते १-३-८६ या कालावधीत सह शिक्षिका म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र आपण बिनातारखेचे दिले होते त्याची प्रत द्यावी.”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा दिनांक १४-१२-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१२-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहित पुरविली आहे. या पत्रामध्ये त्यांनी पुढे, त्यांच्या शाळेच्या कार्यालयास लागलेल्या अपघाती आगीमुळे त्यांचे १९९३-९४ पुर्वीचे कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे व अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या त्यांच्या काही वैयक्तीक माहितीवरुन त्यांनी अपिलार्थीस हे उत्तर दिले असल्याचे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये दिनांक २९-०१-२००७ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती बीड यांच्याकडे यांच्याकडे प्रथम अपील केले.

अपिलार्थीने सदर अपील गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती बीड यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी संबंधीत शिक्षण संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्याच्यातील जोडपत्रासह

अपिलार्थीस परत पाठविला. तथापि सदर अर्ज, प्रथम दिनांक २०-०३-२००७ रोजी अपिलार्थी हे घरी उपलब्ध न होऊ शकल्यामुळे व नंतर पत्राव्दारे पाठविला असता अपिलार्थीने सदर पत्र घेण्यासाठी नकार दिल्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे पोहोचला नाही. गट शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस सदर अर्ज त्यांच्याकडील ०९-२-२००७ रोजीच्या पत्रान्वये परत पाठविला होता. गट शिक्षणाधिकारी यांची अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे परत पाठविण्याची कृती चुकीची असून त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज या प्रकरणी जे प्रत्यक्षतः अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे परस्पर पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि यांनी तशी कृती केली नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. थोडक्यात अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर वरील कारणास्तव कोणताही निर्णय होऊ शकला नाही असे येथे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने व त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही तसेच दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या पत्राने दिलेली माहिती देखील अपुरी व दिशाभूल करणारी आहे असे म्हटले आहे. याच अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने व जी माहिती दिली आहे ती अपुरी व दिशाभूल करणारी असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे. याचबरोबर त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेश निर्गमीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती ती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविली आहे. शाळेचे व संस्थेचे कार्यालय एकाच इमारतीत असून त्या इमारतीला २९/३० डिसेंबर १९९३ च्या रात्री आग लागली व या आगीत शाळेचे व संस्थेचे सर्व रेकॉर्ड जळून भस्मसात झाले आहे. सदर आग लागल्यासंदर्भात त्यांनी बीड पोलीस स्टेशन येथे दाखल केलेल्या एफ. आय. आर. ची प्रत आयोगास सादर केली आहे. सदर एफ. आय. आर. क्रमांक ५३२/९३ असा असून, तो संस्थेच्या सचिवांनी दिनांक ३०-१२-१९९३ रोजी १०-४५ मिनिटांनी बीड शहर पोलीस स्टेशनकडे दाखल केलेला दिसून येतो.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले दिनांक २९-०१-२००७ रोजीचे अपील त्यांना दिनांक ०६-०२-२००७ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाले आहे. या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सचिव संस्कार प्रबोधिनी यांच्याकडे अपील अर्ज करण्याची या पत्राव्दारे सूचना केली. तथापि सदर पत्र अपिलार्थीने घेण्यास नकार दिला. अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या दिवशी सदर पत्र देऊ केले होते असे जन अपिलीय अधिकारी

यांना विचारले असता त्यांनी त्यांना निश्चित तारीख आठवत नसल्याचे आयोगास सांगितले. तथापि त्यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाव्दारे या पत्राची तामिली अपिलार्थीस करण्यासाठी सूचित केले असता व संबंधीत मुख्याध्यापक अपिलार्थीच्या घरी सदर पत्राची तामिली करण्यास गेले असता अपिलार्थीच्या घरास कुलूप आढळले. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज परत पाठविता आला नाही. अपिलार्थी यांनी गट शिक्षणाधिका-याचे पत्र नाकारले असतांना त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने का पाठविले नाही याची विचारणा केली असता गट शिक्षणाधिकारी आयोगास समर्पक खुलासा करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-१९७४ ते २६-०७-१९७६ या कालावधीतील माहिती मागितली आहे. या कालावधीतील सर्व रेकॉर्ड संबंधीत शाळेस दिनांक २९/३० डिसेंबर १९९३ च्या रात्री लागलेल्या आगीमुळे भस्मसात झाले असल्याने हा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही व त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस देऊ शकणार नाहीत हे उघड आहे. तथापि त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये काही माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. संबंधीत अपिलार्थी ह्या या संस्थेमध्ये काही काळ सह शिक्षिका पदावर कार्यरत होत्या परंतु त्यांच्या नेमणुकीच्या प्रस्तावास जिल्हा परिषदेने मान्यता न दिल्याने त्यांची नियुक्ती पुढे खंडीत करावी लागली असे या प्रकरणी दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती आता संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही व जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे ती त्यांनी अपिलार्थीस विहित

मुदतीत देऊ केली आहे, तद्वतच अपिलार्थीने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती बीड यांच्याकडून आलेले पत्र घेण्यासाठी दिलेला नकार पाहता अपिलार्थीच्या वर्तनातील विसंगती स्पष्ट होते. अपिलार्थीने प्रथमतः चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केले. तदनंतर त्या प्राधिकरणाकडून आलेले पत्र घेण्यासाठी नकार दिला. मात्र राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करतांना त्यांच्या दिनांक २९-०१-२००७ च्या अपील आदेशावर निर्णय नाही असे त्यांनी विधान केले आहे. त्यांच्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अपीलावर आदेश न होण्यास अपिलार्थी हेच जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यांनी जर गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून त्यांना देऊ करण्यात आलेले पत्र स्विकृत केले असते तर कदाचित त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन प्रथम अपील पातळीवरच त्यांना न्याय मिळण्याची शक्यता होती. तथापि त्यांनी आपल्या विसंगतपूर्ण वर्तनाने ही संधी दवडली आहे असे येथे दिसून येते. आजही त्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर आहेत. यावरुन त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती खरोखरच हवी होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात शंका आहे. मूळ अर्जामध्ये निर्देशीत केलेली माहिती नष्ट झाली असल्याचा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे आवश्यक तो पुरावा सादर केला आहे व तसे शपथपत्रही त्यांनी आयोगास लिहून दिले आहे. संबंधीत रेकॉर्ड संस्थेच्या व शाळेच्या इमारतीस लागलेल्या आगीमध्ये आता नष्ट झाले असल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी हे देऊ शकणार नाहीत हे उघड आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले

व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २१-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती कावेरीबाई अंबादासराव टेकाळे, मु. पो. पोथरा, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्याध्यापक, संस्कार विद्यालय (प्राथमिक), नविन भाजी मंडई, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संस्कार प्रबोधिनी, नविन भाजी मंडई, नेताजी मैदान, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९३५

निर्णय दिनांक २१-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रणजीत नामदेवराव चव्हाण,<br>मु. पो. पिंपरखेडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी,<br>आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तालुका आष्टी, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी आष्टी, जिल्हा बीड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रणजीत नामदेवराव चव्हाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. संजय दशरथ साळवी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी श्री. ज्ञानेश्वर बाबुराव व्यवहारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००२ ते २००६ या कालावधी मध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे दादेगाव सज्जा अंतर्गत झालेल्या मातीनाला, सिमेंट बंधारे इ. बाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. सन २००२ ते २००६ मध्ये मौजे दादेगाव सज्जा अंतर्गत कोणकोणती कामे झाली आहेत. (मातीनाला, सिमेंट बंधारे इ.)

२. सर्वे नं. व शेतक-यांची नांवे

३. कामावरचा झालेला खर्च किती."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती दिली. या माहितीचे अवलोकन करता त्यांनी २००४-०५ हे साल वगळता उर्वरीत वर्षातील काही माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ व सिमेंट बंधा-यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिल्याचे या पत्रामध्ये आढळून येत नाही. एवढे असूनही सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोरील सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीस माहिती दिल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. सदर बाब पाहता जावक नोंदवहीतील सर्व रकान्यांचा भरणा यामध्ये केलेला नाही. या नोंदवहीतील जावक तपासणी क्रमांक, वर्गीकरण, टपालखर्च हे स्तंभ जन माहिती

अधिकारी यांनी भरले नसल्याचे दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच माहिती पाठविली किंवा कसे याचा अर्थबोध होत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली. तद्वतच कलम ७ (६) च्या तरतुदीअन्वये त्यांना मोफत माहिती मिळण्याचीही विनंती या अर्जात केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि त्यांनी, अपिलार्थीस त्यांनी केलेल्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्वरीत देण्याचे सूचित करुन त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीचे अपील ठरविण्याची अशा प्रकारची कृती नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार चुकीची असून त्यांनी या प्रकरणी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे नोंदवून त्यांच्यावर आपले आदेश पारीत करणे हे ‘‘अपील ठरविणे’’ या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपिलावर त्यांनी याप्रमाणे कारवाई करावी

असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०४-२००७ अन्वये व्दितीय अपील केले आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत माहित न दिल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करावी तसेच प्रथम अपिलाचा निकाल मुदतीत न दिल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावरही शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत आयोगास विनंती करुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे संबंधितांना आदेशीत करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे लिखीत स्वरुपात आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये मांडलेले आहे. त्यांचे आयोगाकडे केलेल्या अपील अर्जातील लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजावा. जन माहिती अधिकारी यांचे कथित दिनांक ०१-०२-२००७ चे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही परंतु जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ०८-०३-२००७ चे पत्र त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास उद्देशून त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. उर्वरीत माहिती ते अपिलार्थीस देण्यास आज तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी शेतक-यांची नांवे व त्यांचा सर्वे नंबर ही माहिती संबंधीत कामाच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असते. २ ते ३ सर्वे नंबर मिळून एक गट तयार केलेला असतो. अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये त्यांनी सदर गट नंबरचा उल्लेख केला आहे. एकदा गट नंबरचा उल्लेख केला की, अपिलार्थीस शेतक-याचे नाव व ज्या शेतामध्ये काम झाले आहे त्याचा सर्व्हे नंबर आपोआप समजतो. जन अपिलीय अधिकारी यांना विहित मुदतीत सुनावणी का घेतली नाही असे विचारले असता त्या कालावधीमध्ये ते या पदावर कार्यरत नव्हते व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते व त्याची प्रत अपिलार्थीस दिली होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले असून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीस देण्यात आलेल्या प्रतीमध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी जर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे १५ दिवसात कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही तर अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाली आहे असे समजण्यात येईल. जन अपिलीय अधिकारी यांचे अशा प्रकारचे अभिप्राय चुकीचे असून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळाल्याची त्यांनी खात्री करुन घेणे हे माहितीचा अधिकार अधिनियमामधील तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे याची त्यांना येथे जाणीव करुन देण्यात येत आहे.

दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद, वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तथापि त्यांनी त्यांचे म्हणणे सिध्द करण्याकरिता आयोगास जी कागदपत्रे दाखविली त्याबद्दल आयोगाच्या मनात सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संदेह निर्माण होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीच्या सत्यप्रतीची पाहणी केली असता त्यामध्ये पत्राच्या जावक संदर्भ येथे अपिलार्थीचे नाव एवढाच उल्लेख आहे. अपिलार्थीस सदर माहिती पोस्टाने पाठविली असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि जावक नोंदवहीमध्ये पोस्टाच्या तिकिटांचा कोणत्याही प्रकारे उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीमध्ये शेतक-यांची नांवे व सर्वे नंबर अपेक्षित होते तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, दिलेल्या माहिती मध्ये शेतक-यांच्या सर्वे नंबरचा उल्लेख नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या मते गट क्रमांकाचा उल्लेख केला की सर्वे नंबर व शेतक-यांची नांवे सहज उपलब्ध होऊ शकतील. सदर तपशील सहज कशा प्रकारे उपलब्ध होऊ शकेल याचा खुलासा त्यांना आयोगासमोर करता आला नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा हा मुद्दा वादाच्या प्रयोजनार्थ जरी ग्रहीत धरला तरी अशा पध्दतीमुळे अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी परत याच प्राधिकरणाकडे किंवा दुस-या प्राधिकरणा-कडे जावे लागणार आहे हे उघड आहे. थोडक्यात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे मात्र येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस कोणतीही विशिष्ट अशा कोणत्या कामाची माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. कारण अपिलार्थीने कामाचा उल्लेख करतांना मातीनाला, सिमेंट बंधारे इत्यादी असा मोघम

स्वरुपाचा उल्लेख त्यांच्या अर्जामध्ये केला आहे. यावरुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी होती याचा बोध होणे कठीण आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मातीकामाची माहिती दिली असल्याचे दिसून येते. अर्थात हे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांना ही माहिती मिळाली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती पैकी सिमेंट बंधारेबाबत कोणतीही माहिती दिली नाही याचे कारण विचारले असता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या कालावधीत सिमेंट बंधा-यांची कामे त्यांच्या कार्यक्षेत्रात झाली नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगून, शपथपत्राव्दारे त्यांनी ही बाब आयोगासमोर कबूल केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली हा त्यांचा मुद्दा जरी ग्राह्य धरला तरी त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिली हा मुद्दा उरतोच आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही समर्थन नाही. त्यांना पुरेसी संधी देऊनही अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याप्रीत्यर्थचे त्यांना समर्थन करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर सहकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. यामुळे जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सहकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव (कृषि) यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्यात आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला

अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांनी विचारलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (कृषि) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी, यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक २१-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रणजीत नामदेवराव चव्हाण, मु. पो. पिंपरखेडा, तालुका आष्टी,

जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६३२
निर्णय दिनांक- २१-०२-२००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुभाष रतनसिंग महेर,<br>व्दारा-बाळासाहेब वाळुंज,<br>सी-५२, न्यु विशालनगर,<br>गारखेडापरिसर, औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद,<br>औरंगाबाद. |
| | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी | : | अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हापरिषद, औरंगाबाद. |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.सुभाष रतनसिंग महेर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हापरिषद, औरंगाबाद, श्री. जिवाजी बाबुराव बागुल (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, श्री. व्ही.व्ही.गुजर (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी १९९२ ते फेब्रुवारी, २००६ या कालावधीतील औरंगाबाद जिल्हयातील मान्यता प्राप्त खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानीत व विनाअनुदानीत प्राथमिक शाळातील कार्यरत प्रभारी मुख्याध्यापकांच्या त्यांच्या कार्यालयाने दिलेल्या मान्यता संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

''१) जिल्हयातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानीत व विनाअनुदानीत प्राथमिक शाळांमध्ये संस्थेने नियुक्त प्रभारी मुख्याध्यापकांना वरील कालावधीत आपल्या कार्यालयाने दिलेल्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रमाणित प्रती व त्यांना दिल्या जाणा-या वेतनश्रेणी विषयी प्रमाणित माहिती.

२) प्रभारी मुख्याध्यापक नियुक्त केलेल्या संस्था व शाळांची प्रमाणित यादी. आणि संचमान्यतेच्या प्रती.

३) प्रभारी मु.अ. नियुक्त शाळा/ संस्थेच्या सेवाजेष्ठता सूचीच्या प्रमाणित प्रती.''

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत स्पिड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २०-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या शाळांची यादी जोडून या शाळेच्या कार्यरत कर्मचा-यांच्या बाबत अपिलार्थीस माहिती आवश्यक असल्यास त्यांनी संबंधीत शाळांचे मुख्याध्यापकाकडे माहिती अधिकारी या नात्याने अर्ज करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे उत्तर देवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनाक- १९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १०-०७-२००६ रोजी सुनावणी घेवून त्याच दिवशी अपीला संदर्भात आपले आदेश पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मागील वर्षाच्या संच मान्यतेच्या प्रती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. वास्तविकतः अपिलार्थीने जानेवारी १९९२ ते फेब्रुवारी २००६ या कालावधीतील माहिती करिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दिला होता. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना अपिलार्थीने मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे पूर्ण कालावधीची माहिती देण्याचा निर्णय न देता अपील निर्णयाच्या आधीच्या १ वर्षाच्या आतील माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून  प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे व अपील योग्य त-हेने ठरविले नसल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार  अधिनियमातील तरतूदीचे पालन केले नाही व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना असद्‌हेतूने माहिती नाकारली असल्याचे नमूद केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी कलम १९ (६) चा भंग केल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ चा भंग केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी सर्व प्रथम अर्ज दाखल केला होता. या  संदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर एकूण तीन वेळा सुनावणी घेवून दिनाक- १०-०७-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या सबंधात पारीत केलेले आदेश अपूर्ण आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारीत करुनही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्यांना आजपर्यंत मिळालेली माहिती अपूर्ण आहे. याच संदर्भात त्यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन दाखल केले असता, मा.उच्च न्यायालयाने त्यावर दिनांक ०९ एप्रिल, २००७ रोजी निर्णय देवून जन माहिती

अधिकरी यांना अपिलार्थीस उर्वरीत माहिती दिनाक- ३०-०६-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देण्याचे सूचित करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधीत प्राधिकरण / व्यक्ती कडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रयत्नपूर्वक प्राप्त करुन घ्यावी असे  जन माहिती अधिकारी / व जन अपिलीय अधिकारी यांना निर्देशित केले आहे. मा.उच्च न्यायालयाने आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी  त्यांना अद्यापही संपूर्ण माहिती दिलेली नाही. मा.उच्च न्यायालयाचे आदेश संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणूनही त्यांनी त्यावर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही, असे त्यांनी आपल्या युक्तीवादामध्ये पुढे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर पूर्ण  निर्णय दिला नाही. त्यामूळे जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थी यांनी आयोगाच्या, पुढे असेही निदर्शनास आणले की, शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये कायम स्वरुपी मुख्याध्यापकाच्या नेमणूका हेतुपूर्वक न करता या पदावर प्रदिर्घ कालावधी करिता हंगामी/ प्रभारी मुख्याध्यापक म्हणून संस्थेच्या मर्जीतील व्यक्तींच्या नेमणूका करतात व त्या तशाच पुढे सुरु ठेवतात.  अशा प्रकारास प्रतिबंध घालण्यासाठी  व त्याकरिता जनहित याचिका दाखल करण्यासाठी त्यांना सदर माहिती आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,  ते दिनांक ०४ सप्टेंबर, २००७ पासून या पदावर कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांनी अपिलार्थीस ९८

शाळा पैकी ५१ शाळा संदर्भात त्यांना आवश्यक असलेली माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत त्यांना प्रभारी मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या आदेशांच्या प्रती दिल्या नाहीत. खाजगी शिक्षण संस्थेमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त झाल्यानंतर संबंधीत शिक्षण संस्था मुख्याध्यापकाच्या पदी तात्पुरत्या स्वरुपात पद भरण्यासाठी त्यांच्या स्तरावर निर्णय घेतात व प्रभारी म्हणून मुख्याध्यापकांच्या पदावर तात्पूरत्या स्वरुपात नेमणूका दिल्यानंतर मान्यतेसाठी ते शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवितात. मुख्याध्यापक पदी जर कायम स्वरुपी नेमणूक द्यावयाची असेल तरच सेवाजेष्ठता, रोस्टर, शैक्षणीकपात्रता इत्यादी निकषावर त्या नेमणूका केल्याजाणे संस्थेला भाग पडते यामध्ये होणारा कालापव्यय टाळण्यांसाठी संबंधीत शाळेतील शिक्षकाच्या पगारा संदर्भातील व इतर प्रशासकीय बाबी संदर्भात होणारी संभाव्य गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने ते शिक्षण संस्थेच्या अशा प्रकारच्या दिलेल्या तात्पुरत्या नेमणूकीच्या प्रस्तावास मान्यता देत असतात. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दाची दखल घेवून शिक्षण संस्थेमध्ये चाललेले अशा प्रकारचे गैरप्रकार टाळण्यासाठी ते आता आवश्यक ती उपाय योजना करीत आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला त्यावेळी त्या पदावर ते कार्यरत नव्हते. अपिलार्थीने दिनांक- १९-०४-२००६ रोजी त्यांच्याकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर त्यांनी दिनाक- १८-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी निर्णय देणे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदीनूसार आवश्यक होते. तथापि अपिलार्थीच्या अपीलअर्जावरील सुनावणीचा निर्णय त्यांनी दिनांक- १०-०७-२००६ रोजी दिला आहे या विलंबाचे समर्थन त्यांना आता करता येणार नाही.

अपिलार्थीने, या प्रकरणी वेगवेगळ्या शाळामध्ये संस्थेने नियुक्त केलेले प्रभारी मुख्याध्यापकांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून दिलेल्या वैयक्तीक मान्यतेच्या प्रती मागितल्या होत्या. वैयक्तीक मान्यतेच्या प्रती याचा अर्थ प्रभारी मुख्याध्यापक पदी तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या नेमणूकीचे आदेश, असे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी, आयोगाने त्यांना वैयक्तिक मान्यतेचा अर्थ विचारला असता, दिले.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची होती. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी प्रमाणे ही माहिती दिनांक १५-०४-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे प्रमाण जरी विस्तृत स्वरुपाचे होते व अपिलार्थीस सदर माहिती देण्याचे काम जरी जिकीरीचे होते तरी आजतागायत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक ती माहिती पूर्णतः प्राप्त झाली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनाक- ३०-१०-०७ व १४-०२-२००८ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे त्यांच्या युक्तीवादामध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पर्यंत एकूण ९८ शाळापैकी ५१ शाळांची माहिती अपिलार्थीस दिल्याचे सांगण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस प्रभारी मुख्याध्यापकांना दिलेल्या वैयक्तीक मान्यतेच्या प्रमाणीतप्रती दिल्याचे आढळून आले नाही. थोडक्यात इतक्या प्रदीर्घ काळानंतरही

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अर्जापासून आज रोजीची सुनावणी तारीख यामध्ये १ वर्ष १० महिने इतका प्रदीर्घ कालावधी लोटला आहे. मा.उच्च न्यायलयाने देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक- ३०-०६-२००७ रोजी अगर तत्पूर्वी उर्वरित माहिती देण्याचे सूचित केले होते. येथे असे दिसून येईल की, मा.उच्च न्यायालयाने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिका-यास २ महिने इतका कालावधी या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहून दिला होता. मा.उच्च न्यायालयाने जन माहिती अधिकारी यांना निर्णय देवूनही संबंधीतांनी आजतगायत म्हणजे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयापासून १० महिने इतका कालावधी लोटून गेल्यानंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती पुरविली नाही, हे सत्य शेवटी उरत आहे. मा.उच्च न्यायालयाने निर्णय देवूनही संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, या निर्णयात न्यायालयाने दिलेली विहित मुदत टळून गेल्या नंतरही अपिलार्थीस माहिती न देवून विशेषतः न्यायालयाच्या संभाव्य अवमानाची तमा न बाळगून त्यांच्या कार्यशैलीतील जी बेपर्वाई स्पष्ट केली आहे, त्यावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असमर्थनीय विलंबानंतरही माहिती न दिल्या बद्दल त्यांना प्रतिदिनी २५०/- या प्रमाणे एकूण २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम उपरोक्त अधिका-यांनी पुढील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत जमा करावी. “ लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड. ”

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ सहाय करणारे त्यांचे सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. या तरतुदीच्या अनुषगाने ही शास्ती संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देणारे जबाबदार असणारे त्यांचे सहायक या सर्वावर मिळून एकत्रितपणे लावण्यात येत आहे.

या शास्तीची जबाबदार कर्मचारी/ अधिकारी निहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्तरावर हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी.

अपिलार्थीस माहिती मिळण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती बिनचूक स्वरुपात हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती बिनचूक स्वरुपात हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३) संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या सर्वानी अपिलार्थीस त्यांना संधी देवूनही विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५०/-

प्रमाणे एकुण रुपये २५०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

४) जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात शास्तीची रक्कम भरल्यासंदर्भातील अनुपालन अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,औरंगाबाद, यांनी आयोगाकडे हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे )

दिनांक- २१-०२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.सुभाष रतनसिंग महेर, व्दारा-बाळासाहेब वाळुंज, सी-५२, न्यु विशालनगर, गारखेडापरिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

६. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९३६
निर्णय दिनांक-२१ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल गंगाराम चंदनकर<br>मु.पो.गांधीनगर, बिलोली तालूका-बिलोली,<br>जिल्हा-नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि<br>अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि<br>अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २१.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. श्री. विठ्ठल गंगाराम चंदनकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,

बिलोली, श्री.आजिज खान दौलतखान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, श्री.मैनोद्दीन कासिमखान आतार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिनांक ०१-०३-२००६ ते १५-१०-२००६ पर्यंतच्या कालावधीतील धान्य कार्यक्रमां अंतर्गत झालेल्या कामाची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> “१) वरील कालावधीतील मंजूर कामे. (२) सदर कामावर नियुक्त पदनिहाय कर्मचा-यांची नावे व यादी (३) कृषी विभागाअंतर्गत मंजूर मंडळ कार्यालयाची संख्या व नावे (४) झालेल्या कामाचे गटनिहाय मजुरांची झेरॉक्स यादी (५) व त्या कामाचा मजूर अहवाल (६) दरम्यानच्या काळातील कामाचा प्राप्त व वाटप निधी (७) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त निधीची सत्यप्रत (८) एकूण खर्चाचा तपशिल.”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा सदर अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे स्मरण जन माहिती अधिकारी यांना दिले. या पत्रामध्ये त्यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क भरुन घेण्याची तयारी देखील जन माहिती अधिकारी यांना दाखविल्याचे दिसून येते. सदर पत्र त्यांनी जन

माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः हजर राहून दिले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. हे पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपीकाने दिनांक- १०-११-२००६ रोजीच्या त्यांच्या सहीसह पोंच दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने सदर अपीलअर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी लवकर विचारात घ्यावा या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक- १६-०३-२००७ रोजी स्मरणपत्र पाठविले असल्याचे दिसून येते. सदर पत्र देखील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्याच दिवशी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीच्या स्मरणपत्रावर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील दिलेल्या लिपीकाने दिलेल्या त्याच दिवशीच्या पोचपावतीवरुन दिसून येते. तदनंतर अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- २२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी हे त्यांना कुठलीच माहिती देत नसल्याचे व माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे कळविले. थोडक्यात दिनांक-२२-०३-२००७ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती दिली गेली नव्हती अथवा अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे शुल्क देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कळविले गेले नव्हते. हे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना लिहीलेल्या दिनांक-२२-०३-२००७ च्या पत्रान्वये सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेतल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले  असून त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशीत केलेल्या कालावधीमध्ये बिलोली तालुक्यामध्ये कृषि विभागातर्फे करण्यात आलेल्या कामासंदर्भात  जनतेकडून त्यांचेकडे ब-याच तक्रारी येत होत्या. कृषि विभागाने केलेल्या कामा संदर्भात वेगवेगळया वतृपत्रातून देखील त्यामधील गैरव्यवहाराच्या बातम्या छापून येत होत्या. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना  अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीमध्ये मिळाली असती तर या सर्व गैरप्रकाराची शहानिशा त्यांना करता आली असती व कृषि विभागात चालू असलेला गैरव्यवहार त्यांना उघडकीस आणता आला असता, त्यांनी मूळ अर्जाव्दारे  मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी या पदाचा दिनांक- २९-११-२००७ रोजी पदभार घेतला असून अपिलार्थीने ज्या वेळेस जन माहिती अधिकाकरी यांच्याकडे अर्ज केला होता त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. आर.पी. देशपांडे कृषि मंडळ अधिकारी  हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यास श्री. आर.पी.देशपांडे हे जबाबदार आहेत. श्री.आर.पी.देशपांडे हे आजच्या सुनावणीस गैरहजर का आहेत, असे विचारले असता जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी श्री. आर.पी.देशपांडे यांना आज आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी तोंडी सूचना दिल्या होत्या. तथापि

श्री.आर.पी.देशपांडे ( तत्कालीन जन माहिती अधिकारी ) यांनी सुनावणीस उपस्थित राहण्यास नकार दिला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. मात्र अपिलार्थीस माहिती देण्याचे श्री. आर.पी.देशपांडे यांना त्यांनी लेखीपत्रा व्दारे सूचना देवूनही श्री. आर.पी.देशपांडे यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी नेहमी येत होते.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मुलतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती साधी व सरळ होती, ही माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अतिरीक्त मेहनत करणे गरजेचे नव्हते. किंवा ही माहिती देण्याकरिता त्यांचेवर अतिरीक्त ताण पडावा इतपत अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप क्लीष्ट नव्हते.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २६-१०-२००६ रोजी अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारे आवश्यक ते शुल्क अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे दिनांक- २५-११-२००६ रोजी अगर तत्पुर्वी कळविणे आवश्यक होते. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील कोणत्याही पत्राव्दारे कोणताही प्रतिसाद दिल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही.

अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यासंदर्भात तालूका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- १०-११-२००६, दिनांक- १६-०३-२००७ व २२-०३-२००७ या तीन लेखी अर्जाव्दारे पाठपूरावा देखील केला होता. तथापि शासनाच्या कृषि विभागाच्या संबंधीत यंत्रणेमध्ये कोणत्याही प्रकारे हालचाल झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

त्याचबरोबर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल न घेवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्टपणे दर्शविला आहे. असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद आयुक्त (कृषि) पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणात त्यांनी दर्शविलेले वर्तन हे अक्षम्य तर आहेच परंतू वर स्पष्ट केल्याप्रमाणे ते त्यांच्या कार्यशैलीमधील कर्तव्य परायणतेचा अभाव व त्यांच्यातील बेपर्वाई स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. कोणत्याही नागरिकास त्यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडून ती वारंवार पाठपूरावा करुनही जर मिळत नसेल तर संबंधीत जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत, असे येथे म्हटल्यास वावगे ठरु नये, जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तीवादामध्ये त्यांनी सबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविण्या संदर्भात वेळोवेळी तोंडी सूचना देखील दिल्या होत्या, परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असे स्पष्ट केले आहे. एवढे होऊनही संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न केल्याचे या प्रकरणी आयोगास

आढळून आले आहे. केवळ इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यास असावे, असे आयोगास वाटते. जन सामान्यास त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे मागितलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे इच्छाशक्तीचा अभाव असणे ही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेमतेची नीचतम पातळी आहे, असे आयोगास वाटते व या प्रकरणी ही बाब निश्चितपणे सिध्द होत आहे. त्यामूळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्यास संबंधित जन माहिती अधिकारी पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाच्या प्रतिदिनी २५०/- रुपये याप्रमाणे २५,०००/- ( एकुण रुपये पंचवीस हजार ) इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यांना काहीही सांगावयाचे नाही, असे समजून हे आदेश अंतिम करण्यात येतील.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावा बद्दल व बेपर्वाइ बद्दल त्यांच्यावर सचिव (कृषि) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तद्‌नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

जन माहिती अधिकारी यांना असेही आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

१. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

२. जन माहिती अधिकारी यांच्यावर सचिव (कृषि) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी २५०/- रुपये याप्रमाणे २५,०००/-(एकूण रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच १ महिन्याच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- २१-०२-२००८.

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत

१. श्री. विठ्ठल गंगाराम चंदनकर मु.पो.गांधीनगर, बिलोली तालूका-बिलोली, जिल्हा-

नांदेड

२. जनमाहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी बिलोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (एन्र ड्स्क्ष्म)

३. जनअपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-०५, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६९

निर्णय दिनांक : २१-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. वसंत संपतराव मुंडे,<br>रा. परळी वै.जि.बीड | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई<br>जि. बीड | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. वसंत संपतराव मुंडे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड श्री. कांबळे विलास लक्ष्मणराव ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे विरोधात राज्य माहिती आयोगाकडे त्यांचेकडील दि. ३.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने, उत्तरवादी यांना, त्यांच्याकडील दि. १.१२.२००७ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदारास १५ दिवसांचे आत माहिती पुरविण्याचे आदेशित केले होते. तथापि उत्तरवादी यांनी तक्रारदार यांना दि. ३.१.२००८ पर्यन्त माहिती पुरविली नाही.

सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि. ३.१.२००८ रोजी नोंद केलेली आहे.

तक्रारदार यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तरवादी यांनी असा खुलासा केला आहे की, त्यांनी त्यांच्याकडील दि. २७.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदार यांना माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याची विनंती केली होती. तक्रारदार हे त्यांच्या कार्यालयात माहिती घेऊन जाण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. तक्रारदार यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून त्यापैकी काही माहिती त्यांनी आयोगास दाखविली. त्याचबरोबर काही माहिती उद्या दि. २२.२.२००८ रोजी तक्रारदारास देण्याची त्यांनी तयारी दर्शविली.

तक्रारदार यांनी असा युक्तीवाद केला आहे की, उत्तरवादी यांच्या दि. २७.१२.२००७ चे पत्र त्यांना दि.१७.१.२००८ रोजी प्राप्त झाले होते. या पत्रात विनंती केल्याप्रमाणे ते कार्यालयात उपस्थित झाले होते. तथापि त्यांची व उत्तरवादी यांची भेट होऊ शकली नाही.

आता उत्तरवादी यांचेकडे माहिती तयार आहे यापैकी काही माहिती ते तक्रारदारास आज देत आहेत तर उर्वरित माहिती तक्रारदारास उद्या देत आहेत. हे पाहता तसेच तक्रारदार यांनी केलेल्या मूळ अर्जाच्या अपील निर्णयामध्ये उत्तरवादी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे आदेशित झाले असल्यामुळे परत उत्तरवादी यांना तक्रारदारास उशिरा प्रतिसाद दिल्याबद्दल शिक्षेचे आदेश देणे योग्य होणार नाही, असे आयोगास वाटते. उत्तरवादी यांनी तक्रारदारास काही माहिती आत पुरविली आहे तर उर्वरित माहिती लागलीच दुसऱ्या दिवशी पुरविण्याची त्यांची तयारी आहे, हे पाहता तक्रारदार यांना सदर उर्वरित माहिती उत्तरवादी यांचे कार्यालयात जावून हस्तगत करण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, परळी वैजिनाथ, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९००

निर्णय दिनांक २२-०२-२००८

१ श्रीमती अंजली अनंत पारेकर, : अपिलार्थी
व्दारा : व्ही. आर. भागवत,
'बकूल' इन्कम टॅक्स कॉलनी,
डॉ. एम. यु. कुलकर्णी हॉस्पिटल जवळ,
जुना जालना, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बॅक ऑफ इंडिया इमारत, म. गांधी मार्ग,
हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक
ऑफ इंडिया इमारत, म. गांधी मार्ग,
हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ०१

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती अंजली अनंत पारेकर व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे गैरहजर आहेत तर

जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग श्री. प्रभाकर गोविंद गोगटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १८-१२-२००५ ते २१-०८-२००६ या कालावधीतील, राज्यसेवा (पूर्व) परिक्षा २००४ व त्यांनी दिनांक १७-०८-२००६ रोजी घोषित केलेल्या उत्तरतालिकेबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे एकूण ६ मुद्दयावर माहिती मागविली होती.

"१. दि. १८-१२-२००५ रोजी संपन्न झालेल्या राज्यसेवा (पूर्व) परीक्षा – २००४ यातील संच एक मधील खालील प्रश्न क्रमांक व त्यापुढील प्रश्नांची आपण दि. १७-०८-२००६ रोजी घोषित केलेल्या उत्तरतालीके-तील उत्तर विहित संदर्भाप्रमाणे आपण विहित केल्याप्रमाणे जुळत नाही. तरी याची वस्तुस्थिती स्पष्ट करावी व आपल्या विहीत संदर्भाचा सविस्तर खुलासा करावा.

a) प्रश्न क्र. १४१ आपले उत्तर ग्रेनग्लेस (स्कॉटलंड) असे आहे. परंतू सदरील G-8 बैठक सेंट पिटर्सबर्ग (रशिया) येथे संपन्न झाली.

b) प्र. क्र. १७८ मधे आपले उत्तर BRIBEM असे आहे परंतू दिलेल्या चार पर्याया मधे पहिल्या पर्यायात तीन स्वर (VOVEL) आहेत व इतर तीन मधे दोनच स्वर आहेत.

c) प्रश्न क्र. १८२ नूसार आपले उत्तर पर्याय क्र. २ आहे परंतु गाजर ही एक भाजी आहे व भाजी हे एक अन्न आहे. त्यामुळे याचे स्पष्ट उत्तर पर्याय क्र. एक आहे.

d) प्रश्न क्र. ४८ मधे आपले उत्तर पर्याय क्र. १ आहे परंतू महाराष्ट्र शासनाच्या इयत्ता दहावीच्या पाठ्यपुस्तकात विज्ञान भाग- एक मधे पृष्ठ क्र. ५० व ५१ अन्वये उत्तर पर्याय क्र. ४ असे स्पष्ट होते.

e) प्रश्न क्र. ४७ मध्ये आपण दिलेले उत्तर पर्याय क्र. दोन आहे. परंतू याच इयत्ता दहावीच्या विज्ञान भाग एक मध्ये पृष्ठ क्र. ११८ नुसार उत्तर पर्याय क्र. ४ आहे हे स्पष्ट होते.

f) प्रश्न क्र. १३८ नुसार आपण दिलेले उत्तर पर्याय क्र. चार आहे परंतू त्याचे उत्तर तिसरा पर्याय आहे.

g) प्रश्न क्रमांक १०० नुसार आपले उत्तर पर्याय क्र. ३ आहे परंतू याचे उत्तर एक आहे.

h) प्रश्न क्रमांक ४४ नुसार आपण दिलेले उत्तर पर्याय क्र. तीन आहे. परंतु याचे निश्चित उत्तर पर्याय क्र. ४ आहे.

२) दिनांक १८-१२-२००५ रोजी झालेल्या राज्यसेवा पूर्व परीक्षा – २००४ यातील संच एक मधील प्रश्न क्रमांक १३९ व १४३ यांची उत्तरे आपण दिलेल्या पर्यायात उपलब्ध असतांना आपण सदरील दोन प्रश्न का रद्द केले याचा खुलासा होणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

३. संच एक मधील प्रश्न क्रमांक १७, ५८, ५९, १६१, १८४ ही पाच प्रश्ने आपण रद्द का केली ? यांचे गुण परीक्षार्थींना का मिळू नये ?

४. वरील प्रमाणे अनेक त्रुटी व चुका आपल्या दिनांक १७-८-२००६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या व घोषित केलेल्या दि. १८-१२-२००५ च्या परीक्षेसंदर्भान्वयीन उत्तरपत्रिकेत आढळून येतात. तरी सुध्दा आपण ही उत्तरतालिका अंतिम असून या संदर्भात केलेली अभिवेदने माहितीचा अधिकार कलम

दोन (च), कलम चार चे उपकलम तीन अन्वये का विचारात घेतली जाणार नाही याचा संदर्भ देऊन खुलासा करावा.

५. सदरील परीक्षेचा निकाल केव्हा घोषित होणार आहे ?

६. अपिलीय प्राधिका-याचा नांव व पत्ता द्यावे."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी केलेल्या अर्जासंदर्भात काही माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलासंदर्भात सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आपला निर्णय कळविला. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीने केलेली मागणी मान्य करता येत नाही असे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस हा निर्णय साध्य पोस्टाव्दारे कळविला होता. सदर निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला किंवा कसे याबाबत त्यांना कोणतीही माहिती नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००७ अन्वये व्दितीय अपील केले आहे. या अपिल अर्जावरुन त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाला नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांच्या मते त्यांच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली गेली नसल्याने त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागत आहे. त्यांचे सदर दिनांक ०३-०१-२००७ रोजीचे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक १६-०१-२००७ रोजी नोंदविण्यात आले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जोडपत्र "अ" व "ब" ची प्रत जोडून त्याचे अवलोकन करावे अशी विनंती केली आहे. त्याचे अवलोकन करता अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली असून आवश्यक त्या कर्मचा-यांच्या अनुपलब्धतेमुळे त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत उत्तर पाठविता आले नाही.

अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीत, तज्ञांनी नेमक्या कोणत्या मूळ संदर्भानुसार संबंधीत प्रश्नांची उत्तरे निश्चित केली आहेत त्याची माहिती मागितली नव्हती. मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज करतांना त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या व्याप्तीमध्ये बदल करुन तज्ञांनी प्रश्नांची उत्तरे प्रसिध्द करतांना विचारात घेतलेल्या मूळ संदर्भाची माहिती मागविली होती. त्यांनी आपल्या युक्तिवादा मध्ये पुढे स्पष्ट केले की, आयोगाकडून घेण्यात येणा-या परिक्षा

या स्पर्धा परिक्षा असून तज्ञांचे संदर्भ पुरविणे त्यांना गोपनीयतेच्या दृष्टीने शक्य होत नाही. तज्ञांनी विचारात घेतलेले संदर्भ पुरविल्यास त्यांचे समाधान होईल असे शक्य नाही. मूळ संदर्भ पुरविल्यास अशी मागणी प्रत्येक उमेदवार नंतर करतील आणि याचा परिणाम म्हणून न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवून निकालाची प्रक्रिया लांबणीवर टाकली जाण्याची टाकण्याची शक्यता नाकारता येत नाही असेही त्यांनी पुढे सांगितले. आयोगाच्या निकाल प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीकोनातून आयोगामार्फत घेण्यात येणा-या परिक्षेच्या वस्तुनिष्ठ उत्तरतालिका आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत असेही त्यांनी पुढे स्पष्ट केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांचे म्हणणे एका पत्राव्दारे मांडले असून अपिलार्थीने प्रथम अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे या पत्राव्दारे त्यांनी खोडून काढले आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्दयावर माहिती मागितली असून मुद्दा क्रमांक ६ वगळता त्यांनी अपिलार्थीस मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून याव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित केले आहे व याचबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रसिध्द केलेल्या उत्तरतालिकेतील माहिती कशी विसंगत आहे हे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागावयाच्या माहिती या शब्दाचा त्यातील कलम २ (च) अन्वये स्पष्ट खुलासा केलेला आहे. या अधिनियमामध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

‘‘ ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने,ई-मेल, अभिप्राय,सूचना, प्रसिध्दि-पत्रके,

परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती," यांचा समावेश होतो.

"माहिती" या शब्दाच्या व्याख्येची अधिनियमाव्दारे स्पष्ट केलेली वरील व्याप्ती पाहता अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती या व्याख्येशी जुळत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सार्वजनिक प्राधिकरणाकडे खुलासे मागणे या अधिनियमामध्ये अपेक्षित नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मूळ अर्जात एक माहिती तर अपील अर्जामध्ये व्याप्ती वाढवून दुसरी माहिती अशी दोन भिन्न स्वरुपाची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये – तज्ञांनी नेमक्या कोणत्या मूळ संदर्भानुसार संबंधीत प्रश्नांची उत्तरे निश्चित केली आहेत त्याची माहिती अपेक्षित आहे -- असे म्हटले आहे. तथापि त्याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात केला नसल्याने हा मुद्दा आयोग आज रोजी लक्षात घेत नाही. या मुद्दयासंदर्भात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळा अर्ज करावा लागेल.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचे संदर्भ देणे का अवघड आहे हे त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील प्रमाणे वर स्पष्ट केले आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले की, ब-याच वेळ काही विषयातील तज्ञ त्यांच्या स्वतःच्या त्या विषयातील ज्ञानाच्या आधारे वेगवेगळे प्रश्न मूळ स्वरुपात तयार करत असतात. याकरिता काही विशिष्ट लिखीत असे संदर्भ उपलब्ध असत नाहीत. त्यामुळे अशा प्रकारच्या संदर्भाची मागणी त्यांना काही वेळा पुरविता देखील

येणार नाही. उपरोक्त प्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसलेली माहिती मागितली असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक तो खुलासा देखील विनामूल्य केला आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती न देण्याचा कोणताही असद्हेतू असावा असे आयोगास वाटत नाही. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसंदर्भात त्यांनी आपला निर्णय अपिलार्थीस दिनांक २०-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी देणे अपेक्षित होते तो त्यांनी अपिलार्थीस १५ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाचा अशा प्रकारच्या विलंबाने निपटारा केल्याबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो सकारात्मक प्रतिसाद द्यावा असे त्यांना या ठिकाणी सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती वर निर्देशीत केल्याप्रमाणे अधिनियमातील “माहिती” या शब्दाच्या व्याख्येशी जुळत नसल्याने, त्यांनी आपल्या माहितीची व्याप्ती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना वाढविली असल्यामुळे व त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी यथायोग्य विनामूल्य प्रतिसाद दिला असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती अंजली अनंत पारेकर, व्दारा : व्ही. आर. भागवत, 'बकूल' इन्कम टॅक्स कॉलनी, डॉ. एम. यु. कुलकर्णी हॉस्पिटल जवळ, जुना जालना, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, म. गांधी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, म. गांधी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०५

निर्णय दिनांक २२-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. परमेश्वर रंगनाथ गिते,<br>न्यायालय, परळी वै. तालुका परळी वै.<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस उप अधीक्षक,<br>पोलीस मुख्यालय, बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. परमेश्वर रंगनाथ गिते व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक यांच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी, आष्टी श्री. जयवंत सखाराम तांबारे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-२००१ ते २०-०१-२००६

या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कक्षेतील संरक्षक विभागाची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

"१. बीड जिल्ह्यातील ज्या नागरिकांना संरक्षण दिले जात आहे. अ.क्र. त्यांची नांवे, संरक्षण दिल्याचा दिनांक (आज तारखेस संरक्षण असलेल्या व्यक्तींचा), भरत असलेली रक्कम, विनामूल्य संरक्षण देण्याचे कारणे, विनामूल्य संरक्षण घेणाराची शासन नियमांप्रमाणे रक्कम भरुण संरक्षण घेण्याची ऐपत आहे किंवा नाही, मा. पोलीस अधीक्षक, बीड यांच्याशिवाय इतर वरिष्ठ अधिकारी / मंत्री / न्यायालय यांनी कोणकोणत्या व्यक्तींना संरक्षण देण्याचे आदेश दिले आहेत, कोणकोणत्या व्यक्तींना संरक्षण देण्याची आवश्यकता नसतांनाही संरक्षण दिले जात आहे. संरक्षण घेणा-या व्यक्ती लोकप्रतिनिधी आहेत किंवा नाहीत, शेरा.

२. मी आपल्या कार्यालयात व संबंधीत पोलीस स्टेशनकडे संरक्षण मिळण्यासाठी अर्ज दिलेले आहेत. याबाबत आपण संरक्षण देणेबाबतची कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे क्रिमिलर रिट पिटीशन क्र. ५१८/२००५ नुसार संरक्षण मिळणेबाबत याचिका दाखल केलेली होती. या याचिकेच्या वेळी आपण सहाय्यक पोलीस निरिक्षक, परळी ग्रामीण, सहाय्यक पोलीस निरिक्षक, परळी शहर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई व मा. पोलीस अधीक्षक बीड यांचा अहवालाच्या सत्यप्रती द्याव्यात तसेच उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे आपण पाठविलेल्या अहवालाची प्रत द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक १७-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलामध्ये उल्लेखित केल्यावरुन, दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेली माहिती अपूर्ण असल्याचे म्हटले असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीमध्ये बीड जिल्ह्यामध्ये कोणतीही व्यक्ती शासन नियमाप्रमाणे रक्कम भरुन संरक्षण घेत आहे किंवा नाही याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही किंवा यादी सादर केली नसल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली असून त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना फक्त छायांकीत प्रती दिल्या असून त्या सत्यप्रती करुन दिल्या नाहीत असे त्यांचे म्हणणे होते.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील प्रथमतः दिनांक १९-०५-२००६, २६-०५-२००६ व ०७-०६-२००६ या तारखांना सुनावणी ठेवली असता अपिलार्थी या तीनही दिवशी सुनावणीस हजर न राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळले. तदनंतर अपिलार्थीने फेरसुनावणी घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केल्यावरुन त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये दिनांक २१-०९-२००६ रोजी या प्रकरणी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी दिनांक २८-०९-२००६ रोजी आदेशीत केले. तदनंतर अपिलार्थीने परत दिनांक ०१-१२-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना माहिती मिळाली नसल्याचा अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या व्दितीय अपिलाची आयोगाकडे नोंदणी दिनांक ०६-०२-२००७ रोजी केली. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे निष्पन्न होऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेवर शास्ती व शिस्तभंगाईची कारवाई केली नाही असे म्हटले आहे, यामध्ये त्यांनी पुढे, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती जाणून बुजून अपूर्ण दिली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर वरील कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक २०-०१-२००६ रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीनुसार त्यांच्याकडे उपलब्ध माहिती दिनांक १३-०२-२००६ रोजी पुरविली आहे व अपिलार्थीस ती दिनांक १७-०२-२००६ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांचे शेती व वकिली असे व्यवसाय असून त्यांनी परळी शहर पोलीस स्टेशन येथे स्वसंरक्षणासाठी पोलीसदलाची मागणी केली होती. त्यांच्या विनंतीसंदर्भात कार्यवाही करण्याच्या दृष्टीने, कार्यवाहीचा भाग म्हणून चौकशी केली असता अपिलार्थीस संरक्षण देण्याची आवश्यकता नसल्याचा निर्णय घेतला गेला असल्याने अपिलार्थीस संरक्षण मिळाले नाही. अपिलार्थी हे पोलीस अधीक्षक कार्यालयात वेळोवेळी अपिले करत असून अपील सुनावणीच्या वेळी ते गैरहजर राहतात व त्यामुळे कार्यालयीन वेळेचा व मनुष्यशक्तीचा अपव्यय होत आहे. स्वसंरक्षणाच्या विषयासंदर्भात त्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांच्याकडे याचिका दाखल केली असता सदर याचिका मा. उच्च न्यायालयाने निकाली काढली आहे. त्यांना पोलीस दलातर्फे निःशूल्क संरक्षण न मिळाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे व्दितीय अपील केले असावे अशी त्यांना शंका आहे. अपिलार्थीने माहिती मागतांना फक्त पोलीस अधीक्षक, बीड, सहाय्यक पोलीस निरीक्षक परळी शहर, परळी ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड यांच्याच अहवालाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. उर्वरीत माहितीसंदर्भात त्यांनी सदर माहिती साक्षांकीत करुन हवी आहे किंवा कसे याबाबत, त्यांच्या अर्जामध्ये

कोणताही उल्लेख केलेला नव्हता. अपिलार्थीस माहिती न देण्यामागे त्यांचा कोणताही असद्हेतू नव्हता किंवा त्यांनी हेतूपुरस्सर कोणतीही टाळाटाळ केलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाप्रित्यर्थ एक शपथपत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये त्यांनी या प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रमाचा उल्लेख करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूपुरस्सर संपूर्ण माहिती द्यावयाचे टाळले असे म्हणता येणार नाही असे नमूद करुन अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती त्यांनी स्वतःला अधिकार नसल्याने ती मान्य केली नसल्याचे म्हटले आहे. याच शपथपत्रात त्यांनी पुढे अपिलार्थीस आता दिनांक ०५-१२-२००६ रोजी पोस्टाने संपूर्ण माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन, पुढे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न करुन अपिलार्थीस माहिती दिली आहे व अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक कारवाई केली असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळावे अशी आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली होती ती अपिलार्थीस दिनांक १९-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. उपरोक्त प्रकरणी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०२-२००६ रोजी पाठविली असून ती अपिलार्थीस दिनांक १७-०२-२००६ रोजी प्राप्त झाली आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य

पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १०-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. दिनांक १९-०५-२००६, २६-०५-२००६ व ०६-०७-२००६ असे तीन दिवस सुनावणी लावूनही अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर राहिले. सुनावणी हजर राहण्यासंबंधातील अपिलार्थीचे हे वर्तन जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या वरील युक्तिवादास पुष्टी देते. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी दिनांक २८-०९-२००६ रोजी आदेश दिले होते. या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१२-२००६ रोजी माहिती दिली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सत्यप्रती पुरविण्यासाठी आदेश करुनही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अंदाजे २ महिने इतका विलंब लावल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. या ठिकाणी विलंबाचे कारण त्यांनी बीड व परळी शहर येथील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असे दिले आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात माहितीची मागणी करतांना सदर माहिती साक्षांकीत करुन द्यावी किंवा सत्यप्रतीत द्यावी अशी मागणी केल्याचे दिसून येत नाही. अपवाद फक्त अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील पोलीस अधिका-यांच्या अहवालाच्या सत्यप्रती हाच आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या परळी ग्रामीण व परळी शहर येथील सहाय्यक पोलीस निरिक्षकाच्या अहवालाच्या सत्यप्रती पुरविल्या आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने या अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनामूल्य संरक्षण देण्याची कारणे, विनामूल्य संरक्षण घेणाराची शासन नियमांप्रमाणे

रक्कम भरुन संरक्षण घेण्याची ऐपत आहे किंवा नाही अशा प्रकारची माहिती मागितली आहे जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘‘माहिती’’ या अधिनियमातील संज्ञेच्या व्याख्येशी जुळत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-०२-२००६ रोजीच्या विनामूल्य दिलेल्या माहितीमध्ये त्यांच्या प्रश्नाला समर्पक उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरासन करण्याचा प्रयत्न केला आहे. फक्त सहाय्यक पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन परळी ग्रामीण व परळी शहर या अहवालाच्या सत्यप्रती अपिलार्थीस पुरविल्या नाहीत ज्या अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णयानंतर दिनांक ०५-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्या. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन, व विशेषतः अपिलार्थीस विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती दिल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास असद्‌हेतूपूर्वक टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याचे दिसून येत नाही. तद्वतच अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी माहितीचा काही भाग माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीशी जुळत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः जरी काही अपूर्ण माहिती दिली असली तरीही त्यामागे त्यांचा असद्‌हेतू होता किंवा ती देण्यासाठी हेतू पुरस्सर टाळाटाळ केली असे येथे दिसून येत नाही. अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः सहाय्यक पोलीस निरिक्षक परळी यांच्या अहवालाच्या प्रती न देऊन सदर माहिती काही प्रमाणात अपुरी दिल्याचे सिध्द होते. येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने माहिती मागितल्यास त्याला, ती अर्जदाराने मागितलेल्या स्वरुपात द्यावी असे त्यांना सूचित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या प्रकरणी अपूर्ण माहिती दिल्याबद्दल राज्य माहिती आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे. अपिलार्थीस आता

जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०५-१२-२००६ रोजी संपूर्ण माहिती मिळाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी आज अपिलार्थी हे सुनावणीस उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गिते, न्यायालय, परळी वै. तालुका परळी वै. जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, पोलीस मुख्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०६

निर्णय दिनांक २२-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुनवरखान सरदारखान,<br>घर क्रमांक ६८७, विद्यानगर,<br>परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापिका, सरहद्द गांधी प्राथमिक<br>शाळा, मदिनानगर, परभणी | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव मदिना एज्युकेशन सोसायटी,<br>मदिनानगर, परभणी | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुनवरखान सरदारखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सरहद्द गांधी प्राथमिक शाळा आबेदा बेगम अब्दुल हबीब (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव मदिना एज्युकेशन सोसायटी श्री. शेख म. शमशोद्दीन म. उस्मान (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९४ ते २००६ या कालावधी-तील सरहद्द गांधी प्राथमिक शाळा, मदिना नगर बाबत खालील प्रमाणे एकूण ३७ मुद्दयावर माहिती मागितली होती.

"१. सरहद्द गांधी प्राथमिक शाळेच्या १९९३ ते सप्टेंबर २००६ पर्यत झालेल्या तपासणीच्या प्रती.

२. १९९८ ते २००६ पर्यत इयत्ता चौथी वर्गाच्या परिक्षेस बसविलेल्या विद्यार्थ्यांची यादीच्या प्रती.

३. १९९८ ते २००६ पर्यत इयत्ता चौथी वर्गास परिक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यासाठी गट शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या पत्राच्या प्रती.

४. १९९८ ते २००६ पर्यत इयत्ता चौथीच्या परिक्षेसाठी भरणा करण्यात आलेली फी ची पावतीच्या प्रती.

५. पाचवी वर्गाच्या मान्यतेसाठी शाळेतून पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत.

६. पाचवी वर्गाच्या मान्यतेसाठी दिलेली शाळा समितीच्या ठरावाची प्रत.

७. इयत्ता पाचवी वर्गाच्या मान्यतेसाठी संस्थेकडून घेतलेल्या ठरावाची प्रत.

८. इयत्ता ५ वी वर्गाच्या मान्यतेसाठी वरील अनु क्र. ५ ते ८ वगळून इतर कागदपत्राच्या प्रती.

९. इयत्ता ५ वी वर्गाला दिलेल्या मान्यतेची प्रत.

१०. याच शाळेतील सर्व शिक्षकाच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती.

११. याच शाळेतील १९९३ ते २००६ पर्यत सर्व शिक्षकांच्या नियुक्ती साठी घेण्यात आलेल्या शाळा समितीच्या ठरावाच्या प्रती.

१२. याच शाळेतील १९९३ ते २००६ पर्यत सर्व शिक्षकांना मिळालेल्या मान्यतेच्या प्रती.

१३. याच शाळेतील १९९३ ते २००६ पर्यत सर्व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्तीसाठी घेण्यात आलेल्या शाळा मितीच्या ठरावाच्या प्रती.

१४. याच शाळेतील १९९३ ते २००६ पर्यत सर्व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मिळालेल्या मान्यतेच्या प्रती.

१५. १९९३ ते २००६ वर्षनिहाय गठीत करण्यात आलेल्या शाळा समितीच्या प्रती.

१६. १९९३ ते २००६ पर्यत शाळा समिती गठीत करण्यासाठी घेतलेल्या संस्थेच्या ठरावाच्या प्रती.

१७. १९९३ ते २००६ पर्यतच्या वर्षनिहाय शिक्षकाच्या जेष्ठतेची यादी.

१८. इयत्ता पहिली वर्गापासून इयत्ता ६ वी वर्गापर्यतच्या १९९३ ते २००६ पर्यत विद्यार्थ्यांची यादी.

१९. १९९३ ते २००६ पर्यतच्या शाळा समितीच्या प्रती.

२०. १९९३ ते २००६ पर्यत शाळा समिती गठीत करण्यासाठी घेतलेल्या ठरावाच्या प्रती.

२१. १९९३ ते २००६ पर्यतच्या शिक्षकांच्या जेष्ठतेची यादी.

२२. इयत्ता पहिली वर्गापासून इयत्ता सहावी वर्गाच्या १९९३ ते २००६ पर्यत विद्यार्थ्यांची यादीच्या प्रती.

२३. शाळेतील सेविका यांची नेमणुकीसाठी शाळा समितीने घेतलेल्या ठरावाच्या प्रती.

२४. सेविका यांची नेमणुकीच्या आदेशाची प्रत.

२५. लिपीक यांची नेमणुकीसाठी शाळा समितीने घेतलेल्या ठरावाची प्रत लिपीक यांची नेमणुकीच्या आदेशाची प्रत.

२६. २० % अनुदानासाठी शाळा समिती यांनी घेतलेल्या ठरावाची प्रत.

२७. २० % अनुदान मंजुरीसाठी शिक्षणाधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत.

२८. ४० % अनुदानासाठी शाळा समिती यांनी घेतलेल्या ठरावाची प्रत.

२९. ४० % अनुदान मंजुरीसाठी शिक्षणाधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत.

३०. ६० % अनुदान साठी शाळा समिती यांनी घेतलेल्या ठरावाची प्रत.

३१. ६० % अनुदान मंजुरीसाठी शिक्षणाधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत.

३२. ८० % अनुदानासाठी शाळा समिती यांनी घेतलेल्या ठरावाची प्रत.

३३. ८० % अनुदान मंजुरीसाठी शिक्षणाधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत.

३४. १९९८ पासून २००६ पर्यतचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-याच्या पगार पत्रकाच्या प्रती.

३५. शालेय पोषण आहार योजनेच्या तांदुळ मिळण्यासाठी घेतलेले शाळा समिती व संस्थेचे ठरावाच्या प्रती.

३६. शालेय पोषण आहार योजना सुरु झाल्यापासून २००६ पर्यत चे महिनावार विद्यार्थी संख्येच्या याद्यांच्या प्रती.

३७. शालेय पोषण आहार योजनेतील तांदुळ उचल केल्याच्या पावत्यांच्या प्रती देणे.

”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती, संस्था व शाळेच्या मुख्याध्यापिकेवर मुख्य न्याय

दंडाधिकारी न्यायालय परभणी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त परभणी व मा. सह धर्मादाय आयुक्त या कार्यालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सदरील माहिती त्यांना तुर्त देता येत नाही असे कळवून न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर त्यांना ती पुरविण्यात येईल असे त्यांनी या पत्रामध्ये पुढे आश्वासीत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाचे कारण जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्याचे त्यांनी दर्शविले आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे आवश्यक तो पुरावा सादर केला आहे. सदर पत्रावर अपिलार्थीने एकूण ३३ /- रुपये इतक्या किंमतीची पोस्टाची तिकिटे डकविल्याप्रीत्यर्थ त्यांनी पोस्टाच्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या, १४५३ क्रमांकाच्या पावतीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधीत संस्थेच्या सचिवांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने त्यांनी ही सुनावणी घेतली नाही असे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००७ रोजीचे व्दितीय अपील दिनांक ०६-०२-२००७ रोजी दाखल केले. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन

माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे नाकारल्याने त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० /- इतक्या रक्कमेची शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचा मूळ अर्ज दिनांक ०६-१०-२००६ अन्वये मागितलेली सर्व माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे अद्यापपर्यंत कोणतीही माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्यात यावी. सदर माहिती त्यांना निःशूल्क प्राप्त व्हावी अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता संस्थेचे संपूर्ण रेकॉर्ड त्यांच्या ताब्यात असणे आवश्यक आहे. तथापि या शाळेमध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या रेकॉर्डमध्ये उपलब्ध आहे ते सर्व रेकॉर्ड संस्थेचे सचिव श्री. शेख महमद समशोद्दीन यांच्याकडे आहे. त्यांनी आयोगास आपला युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर करुन त्यामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने अवैधरित्या शाळेचे संपूर्ण रेकॉर्ड यांच्याकडे ठेवलेले आहे. सदर रेकॉर्ड शाळेचे असल्यामुळे ते मुख्याध्यापका कडे ठेवणे बंधनकारक आहे असे असतांना त्यांनी बेकायदेशीररित्या सदर रेकॉर्ड स्वतःकडे ठेवले आहे. हे रेकॉर्ड ताब्यात मिळावे म्हणून त्यांनी नानलपेठ पोलीस स्टेशन परभणी येथे दिनांक ०१-०८-२००७ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केलेल्या बेकायदेशीर कामांना त्यांनी विरोध केल्यामुळे त्यांनी संगनमताने दिनांक ०१-०१-२००८ पासून त्यांच्या कडील पदभार काढून घेतलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडे ताब्यात असलेल्या रेकॉर्डची यादी आयोगास दाखविली. सदर यादीवरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या ताब्यात नसल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, शाळेचे कोणतेही रेकॉर्ड त्यांच्या ताब्यात नाही. जन माहिती अधिकारी यांच्या गैरवर्तणुकीमुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याकडील पदभार काढून घेण्यात आला असून त्यांनी सध्या कार्यरत असलेले मुख्याध्यापक यांना देखिल संपूर्ण रेकॉर्ड हस्तांतरीत केले नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जाबाबत त्यांना आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर प्रथमतः आयोगाकडे अपिलार्थीने केलेल्या अर्जाची सुनावणी आहे हे प्रथम समजले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने दिनांक ०६-१०-२००६ रोजी मागितलेली माहिती अपिलार्थीस अंदाजे एक वर्ष तीन महिने इतक्या कालावधी ओलांडून गेल्यानंतरही कोणत्याही स्वरुपात प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भातील रेकॉर्ड त्यांच्या ताब्यात आज रोजी नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या रेकॉर्डमध्ये आहे ते सदर रेकॉर्ड संस्थेचे सचिव जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे आहे तर संस्थेचे सचिव यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे कोणतेही रेकॉर्ड आजमितीस उपलब्ध नाही. सदर संस्था व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द वेगवेगळ्या न्यायालयात दावे प्रलंबीत आहेत हे पाहता या शिक्षण संस्थेचा प्रशासकीय कारभार योग्य रितीने चालला आहे असे वाटत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातील वाद लक्षात घेता अपिलार्थीस माहिती सहजतेने मिळण्याची शक्यता कमी वाटते. अशा परिस्थितीत एक अपवादात्मक बाब म्हणून या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी हस्तक्षेप करुन, आवश्यक वाटल्यास, जिल्हा पोलीस अधीक्षक परभणी यांची मदत घेऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहिती

संदर्भातील रेकॉर्ड शोधून काढावे व त्यातून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती देण्याची व्यवस्था करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध होण्यासंदर्भात जर जन माहिती अधिकारी हे त्यांना दोषी आढळले तर त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाव्दारे अथवा इतर कायद्यान्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई त्यांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत सदर माहिती उपलब्ध होईल याची दक्षता संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी. या प्रकरणी आवश्यकता असल्यास त्यांनी पोलीस मदत घेण्यास हरकत नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी या प्रकरणी या मुदतीमध्ये सखोल चौकशी करुन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, आवश्यक वाटल्यास जिल्हा पोलीस यांचे सहकार्य घेऊन जन माहिती अधिका-यास आवश्यक ते सहाय्य करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

औरंगाबाद
दिनांक २२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुनवरखान सरदारखान, घर क्रमांक ६८७, विद्यानगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सरहद्द गांधी प्राथमिक शाळा, मदिनानगर, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव मदिना एज्युकेशन सोसायटी, मदिनानगर, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९३७
निर्णय दिनांक-२२ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **श्री. गोपाळरेdी कोनरेdी कोटावाड,<br>मुक्काम- बाळापूर, कुंभारगल्ली जवळ,<br>तालूका- धर्माबाद,<br>जिल्हा- नांदेड- ४३१८०६.** | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी नगरपरिषद, धर्माबाद | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त<br>(सामान्य) विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोपाळरेड्डी कोनरेड्डी कोटावाड,

(यापुढे त्यांना  अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, श्री.सोमनाथ गुंजाळ  (यापुढे त्यांना  जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, धर्माबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-२२-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून १९६२ - ६३ ते दिनांक- २२-०१-२००७ च्या पर्यंतच्या कालावधीतील खालील मालमत्तेसंदर्भात मालमत्ताकर, कर असेसमेंटचे वर्षनिहाय उतारे यांची खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"

| अनुक्रमांक | घर क्रमांक | प्लॉट क्रमांक | अनुक्रमांक | मौजे बाळापूर |
|---|---|---|---|---|
| (१) | ७४१ - १ | ९३६ - ९ | (६) | बाळापूर |
| (२) | ७४२ - १ | ९४२ - १ | (७) | बाळापूर |
| (३) | २८८ - १ | ९४६ - १ | (८) | बाळापूर |
| (४) | ६२२ - १ | | | बाळापूर |
| (५) | ७३८ - १ | | | बाळापूर |

वरील घर व प्लाट अनुक्रमांकातील मिळकती चे माझे  आजोबा कैलासवासीय श्री.कोनय्या  पि.कोनय्या कोटावाड मौजे बाळापुर यांच्या १९६२-६३ ते आज पर्यंत २००७ मालमत्ता कर असेसमेंटचा वर्ष निहाय उतारा वरील मिळकती अनुक्रमांकातील माहिती सविस्तर देऊन मला उपकृत करणे. '

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क रुपये २२२०/- (अक्षरी रुपये दोन हजार दोनशे वीस मात्र) त्यांचे कार्यालयात त्वरीत भरण्याचे सूचित केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक- २८-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात केलेल्या प्रथम अपील अर्जावरुन दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीचे समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०९-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०७-०४-२००७ व दिनांक- १६-०४-२००७ रोजी सुनावण्या घेवून या संदर्भात आपले आदेश दिनांक १६-०४-२००७ रोजी पारीत करुन त्यामध्ये अपिलार्थीचे अपील मान्य केले आहे व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह अधिनियमातील कलम ७ (६) नुसार ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली. तथापि सदर माहिती अपिलार्थीस नगरपरिषदेचे शिपायामार्फत दिनांक- ०६-०७-२००७ रोजी प्राप्त झाली असे त्यांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची आहे, असेही त्यांनी आयोगास पुढे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही विलंबाने व चुकीची माहिती पुरविल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २९-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांना आदेश देवूनही, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नसल्याचे अपील अर्जात नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती २ पृष्ठांची असून त्यांना विलंबाने माहिती पुरविली व जी माहिती पुरविली ती देखील चुकीची पुरविली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने चुकीची माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार योग्यती कार्यवाही करावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ०९-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपीलावर आपले अंतिम आदेश दिनांक- १६-०४-२००७ रोजी पारीत करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाचे आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीचा प्रथम माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २२-०१-२००७ रोजी प्राप्त झाला. सर्वसाधारण परिस्थितीत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनूसार या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक-२१-

०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी आपला निर्णय अपिलार्थीस कळविणे भाग होते. तथापि त्यांनी माहिती संदर्भातील आपला निर्णय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कळविला नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक- २६-०२-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीकडे त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत पाठविले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये २२२०/-इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरावयाची उशीरा केलेली सूचना अपिलार्थीकडून प्रथमतः अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग झाल्यामूळे अवैध ठरते. अपिलार्थीच्या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०७-०४-२००७ व दिनांक १६-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली असता, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अनुक्रमे श्री.सोनकांबळे व श्री.रुखमाजी भोगावार या दोन्ही कर्मचा-यांना सुनावणीसाठी पाठवून दिले होते. जन माहिती अधिकारी यांच्या या अशा प्रकारच्या कृतीवर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निकालपत्रामध्ये ''शासकीय माहिती अधिकारी यांची सदर अपीलातील कृती हे दर्शविते की त्यांना अधिनियमातील तरतुदींचे अनुपालन करावयाचे नसून, अपिलार्थी यांना माहिती देण्यामध्ये त्यांना रस दिसून येत नाही. शासकीय माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याचे किंवा त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याचे अधिकार त्यांच्या कार्यालयास अधिनियमाव्दारे प्राप्त झाले नसल्याने अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही करणे या कार्यालयास शक्य होणार नाही. '' असे निष्कर्ष काढले आहेत. त्याचबरोबर अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल झाल्यानंतर देखील सुनावणीअंती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे आपले निरीक्षण या अपील निर्णयामध्ये नोंद करुन ठेवले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस व जन

माहिती अधिकारी यांना आपला निर्णय दिनांक- १६-०४-२००७ रोजी पाठविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना त्यांच्या पत्रावर १३-०४-२००७ असा दिनांक टाकलेला आहे. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे एकाच गावात राहत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक- १३-०४-२००७ चे पत्र अपिलार्थीस सुमारे पावणेतीन महिने इतक्या विलंबाने नगरपरिषदेतील शिपायामार्फत प्राप्त झाले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १६-०४-२००७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या दिनांकापर्यंत कोणतीही माहिती दिली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निकालपत्रात उल्लेखिलेले आहे. त्याचबरोबर गावातल्या गावात दिनांक- १३-०४-२००७ चे पत्र अपिलार्थीस नगरपरिषदेच्या शिपायामार्फत दिनांक- ०६-०७-०७ रोजी प्राप्त झाले, हे दोन्हीही मुद्दे विचारात घेता, संशयास्पद वर्तनाची सुई जन माहिती अधिकारी यांच्याकडे वळत आहे. याचा येथे उल्लेख करणे आयोगास जरुरीचे वाटते. आजच्या सुनावणीस देखील संबंधीत जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये देखील गैरहजर राहून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविल्याचे सिध्द झाले आहे. त्यांच्या या वर्तनावरुन त्यांना अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही की काय, असा त्यांनी निश्चय केला असावा असा संदेह आयोगाच्या मनात निर्माण होत आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- २२-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक- २१-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अधिनियमा व्दारे विहित केलेल्या तरतूदी प्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि केवळ वादाप्रित्यर्थ जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १३-०४-२००७ रोजी माहिती पुरविल्याचे गृहीत धरले तरी त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती १ महिने २२ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. विलंबाने माहिती देवूनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना त्यामध्ये

काही चुका केल्या आहेत. त्या चुका असद्हेतूने केल्या आहेत किंवा कसे ते आयोगास कळण्यास आजमितीस कोणताही मार्ग नाही, कारण जन माहिती अधिकारी
हे सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात केलेल्या चुका जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणल्या होत्या काय, असे अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थी यांनी सदर चुका नगरपरिषदेच्या कार्यालयातील लिपीक, श्री. सोनकांबळे यांच्या निदर्शनास त्यांनी तोंडी स्वरुपात आणल्या होत्या तथापि संबंधीत लिपीकाने त्यावर कोणतीही कार्यवाही आजतागायत केली नसल्याचे त्यांनी आयोगास आज सांगितले,अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याच्या त्यांच्या विधानाचे खंडण करण्यासाठी जन माहिती अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूपूरस्सर अचूक माहिती देण्याचे टाळले व अपिलार्थीची, माहिती देण्यासंदर्भात, प्रत्येक टप्प्यावर विनाकारण अडवणूक केली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस त्यांनी विलंबाने माहिती दिल्याचे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे यापूर्वीच सिध्द झाले आहे. जन माहिती अधिका-याचे या प्रकरणातील एकंदर वर्तन पाहता त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली व जी माहिती दिली तीही काही अशी चुकिची व १ महिना २२ दिवस इतक्या विलंबाने दिली असल्याने ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीस खचितच पात्र ठरत आहेत, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमा व्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये न देवून, सदर माहिती देण्यास १ महिना २२ दिवस इतका विलंब लावून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यामूळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी २५०/- रुपये याप्रमाणे १३,०००/- ( एकुण रुपये तेरा हजार ) इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत

आयोगाकडे सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यांना काहीही सांगावयाचे नाही, असे समजून हे आदेश अंतिम करण्यात येतील. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने चुकीची व अर्धवट माहिती देवून आपल्या कतीद्वारे त्यांनी दर्शविलेल्या उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर संचालक, नगर परिषद, संचालनालय, मुंबई यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांना अचूक माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना पुढे असेही आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीतील कथित चुकीचे मुद्दे तपासून अपिलार्थीस आवश्यक ती अचूक माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या दिनांक- १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीची अचुकता तपासून, तदनंतर यांनी आवश्यक वाटल्यास, अपिलार्थीस अचूक माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय

कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

४. जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ५२ दिवसाच्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी २५०/-रुपये याप्रमाणे एकूण ५२ दिवसाच्या विलंबाबाबत एकूण रुपये १३,०००/-(एकूण रुपये तेरा हजार) इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच १ महिन्याच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- २२-०२-२००८.

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत-

१. श्री. गोपाळरेड्डी कोनरेड्डी कोटावाड, मुक्काम- बाळापूर, कुभारगल्ली जवळ, तालूका- धर्माबाद, जिल्हा- नांदेड- ४३१८०६.

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, धर्माबाद,जिल्हा- नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई- ४०० ०३०, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णयनस्ती

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९३९
निर्णय दिनांक- २२-०२-२००८.

१ श्री.मधुकर हिराजी मुळे, अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा
तालूका-पुर्णा, जिल्हा-परभणी.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद,
पुर्णा, जिल्हा-परभणी.

२. जनअपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.मधुकर हिराजी मुळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पुर्णा, यांचे प्रतिनिधी श्री.महादेव गंगाधर अप्पा नगरे, लिपीक, नगरपरिषद, पुर्णा (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, श्री. सोमनाथ गुंजाळ (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १३-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोंडवाडयातील जनावरा संदर्भात ०१-०७-२००५ ते ३१-०१-२००६ या कालावधीतील एकूण ४ मुद्दांवर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १) सदरील कालावधीत कोंडवाडयात किती जनावरे दाखल झाली. त्यापैकी किती जनावरे मालकानी सोडवून नेली व शिल्लक किती?

२) कोंडवाडयात जनावरे दाखल करणारे व सोडवून नेणाराची नावे आणि त्यांनी भरलेले शुल्क किती ?

३) सदरिल काळात जनावरासाठी खर्च झाला का ? असल्यास किती? पैकी खर्च देणे बाकी आहे का ? असल्यास कशाचे, कोणाचे व किती ?

४) सदरील कालावधीत जनावरासाठी किती चारा खरेदी केला पैकी ३१ जानेवारी, २००६ रोजी शिल्लक किती ?

५) सर्व माहिती दिनांका सहित द्यावी."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस त्यांनी विचारणा केलेल्या चारही मुद्या संदर्भात माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनाक- १९-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. या अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ३१-१०-२००६ रोजी अंतिम सुनावणी घेवून या संदर्भातील आपले आदेश दिनांक- ०४-०१-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने विनंती केल्यानूसार सर्व मुद्दांची बिनचूक माहिती संपूर्ण रेकॉर्ड तपासणी करुन माहिती बिनचूक असल्याची स्वतः खात्री करुन ती अपीलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बिनचूक माहिती न दिल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपीलाचे कारण अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही, माहिती प्राप्त झाली नाही, असे दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनूसार कोणतीही माहिती मागितली असता, ते अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती कधीही देत नाहीत. प्रत्येकवेळी जन अपिलीय अधिकारी अथवा राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतरच त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होत असते. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या सवयीस प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतूदी प्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी. या प्रकरणातील त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक- १६-०२-२००८ रोजी ( व्दितीय अपील सुनावणीच्या सहा दिवस आधीच ) प्राप्त झाली. सदर माहिती आपणास अपेक्षित असलेली  अशी आहे काय, असे विचारले असता त्यांनी होकारार्थी उत्तर दिले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक-१९-०९-२००६ रोजीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्या नंतर दिनांक-२०-१०-२००६ व दिनांक- ३१-१०-२००६ या दोन दिवशी सुनावणी घेवून या संदर्भातील त्यांनी आपले अंतिम आदेश दिनांक- ०४-०१-२००७ रोजी पारीत केले आहेत. दि. २०.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी सुनावणीसाठी हजर न झाल्यामूळे त्यांना दुसऱ्या तारखेस सुनावणी घ्यावी लागली, असे त्यांनी आयोगास स्पष्टीकरण दिले.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,

अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत त्यांच्या दिनांक- १३-०७-२००६ रोजीच्या अर्जानूसार त्यांनी मागितलेली माहिती दिनांक- १२-०८-२००६ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी देणे, अधिनियमातील तरतूदी प्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रथम माहिती देण्यासाठी १२ दिवसाचा विलंब लावल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या ४ मुद्यांच्या संदर्भातील माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत अशी दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक- २ चा काही भाग- त्यांनी भरलेले शुल्क किती,- ही माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १६-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे दिसून येत आहे. ही माहिती देतांना त्यांनी अपिलार्थीस १४ पावत्याच्या छायांप्रती दिल्याचे दिसून येते. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १२ दिवस इतक्या विलंबाने अपूर्ण माहिती दिली आहे. एवढाच मुद्दा या ठिकाणी विचारात घेण्यासाठी शिल्लक राहिल्याचा दिसून येतो.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असे सांगितले की, या काळामध्ये नगरपरिषदेच्या मुख्याधिका-याची बदली झाली होती व पुर्णा तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार यांचेकडे या पदाचा अतिरीक्त पदभार सोपाविण्यात आला होता. या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी म्हणून कोणीही जबाबदार व्यक्ती प्रत्यक्षात उपस्थित नसल्यामूळे अपिलार्थीस ही माहिती विलंबाने पुरविली

गेली. आता अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाल्याचे त्यांच्या युक्तीवादामध्ये त्यांनी कबूल केले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी पासून हेतूपुरस्सर काही माहिती दडविल्याचे अथवा काही माहिती देण्यासंबंधी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे दिसून येत नाही. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी आता कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक- २२-०२-२००८**

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत
१. श्री.मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा तालूका-पुर्णा, जिल्हा-परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पुर्णा, जिल्हा-परभणी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५९

निर्णय दिनांक : २२-०२-२००८

१ श्री. बबन माणिक भातलवंडे, : तक्रारदार
रा. दहिफळ, ता.कळंब,
जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब,
जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तालुका कृषी अधिकारी, कळंब
जि.उस्मानाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. बबन माणिक भातलवंडे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी डॉ. तानाजी गोविंदराव चिमनशेटे तसेच

जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब जि.उस्मानाबाद श्री. मुक्ताराम नामदेवराव पाटील ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचेकडील दि. १९.११.२००७ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी तालुका कृषी अधिकारी, कळंब यांचेकडून दि. २१.८.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अधिनियमातील तरतुदीन्वये अर्ज दाखल केला होता. सदर माहिती उत्तरवादी यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते.

सदर अपीलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.१०.२००७ रोजी पोस्टात टाकले. तक्रारदार हे जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात २४.१०.२००७ रोजी चौकशी करण्यासाठी गेले असता सदर पत्र चुकून पाठविले गेले व आता पुढील सुनावणी दि. ३०.१०.२००७ रोजी ठेवली आहे, असे श्री. एम.एन.पाटील कृषी अधिकारी यांनी त्यांना सांगितले. दि. ३०.१०.२००७ रोजी परत जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात तक्रारदार गेले असता त्यांना दिवसभर बसवून ठेवून दि. १९.११.२००७ रोजी परत येण्यास सांगितले. तक्रारदार हे दि. १९.११.२००७ रोजी उत्तरवादी यांचे कार्यालयात गेले असता, कोऱ्या कागदावर सही करा, असे कृषी अधिकारी श्री. पाटील यांनी त्यांना सांगितले. त्याचबरोबर उत्तरवादी यांचे कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी तक्रारदारास त्यांना कोऱ्या कागदावर सही केली नाही तर, त्यांना कार्यालयाचे बाहेर जाता येणार नाही, असे धमकावले. हरतऱ्हेने प्रयत्न करुनही उत्तरवादी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे ही तक्रार केली आह

तक्रारदाराच्या तक्रारीवर उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की, तक्रारदाराने माहितीसाठीचा ज्यावेळी प्रथम अर्ज केला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. तक्रारदार यांनी अर्ज करण्याचेवेळी दि. २३.८.२००७ रोजी कोणते अधिकारी जन माहिती अधिकारी, म्हणून कार्यरत होते, याची त्यांना माहिती नाही व ते या पदावर दि. २३.७.२००७ पासून कृषी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तक्रारदार यांनी केलेला अर्ज हा उत्तरवादी हे या पदावर कार्यरत असतांना केलेला आहे, असे यावरुन सिध्द होत आहे. आज सुनावणीचे वेळी त्यांनी आयोगासमोर उपरोक्त धादांत असत्य विधान केले आहे. उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेली माहिती तर दिली नाहीच, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी तक्रारदारास दि.

१.१०.२००७ रोजीच्या अपीलअर्जावर त्यांनी दि. ३०.१०.२००७ रोजी निर्णय दिल्याचे कागद तयार करुन ते आज आयोगास दाखविले. सदर निर्णय तक्रारदार यांना प्राप्त झाला नसल्याचे तक्रारदार यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. थोडक्यात, उत्तरवादी व संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडून, तक्रारदारास त्यांना हवी असलेली माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास आढळून आले नाही. संबंधित उत्तरवादी यांनी तक्रारदारास सर्वसाधारण परिस्थितीमध्ये त्यांच्या दि. २१.८.२००७ च्या अर्जास दिनांक २०.९.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी प्रतिसाद देऊन तक्रारदारास आवश्यक ती माहिती पुरविणे या प्रकरणी अभिप्रेत होते, तथापि संबंधित उत्तरवादी यांनी तक्रारदारास विहित मुदतीत माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, सचिव, कृषी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे त्यांनी या प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेच्या अभावाबाबत हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व तद्नंतर एक महिन्याचे आत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तक्रारदार यांना अपेक्षित असलेली माहिती मिळण्याबाबत उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी तक्रारदारास त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण व बिनचुक माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२.सचिव, कृषी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे त्यांनी या प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेच्या अभावाबाबत हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व तद्नंतर एक महिन्याचे आत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

२. उत्तरवादी यांनी तक्रारदारास, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण व बिनचुक माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बबन माणिक भातलवंडे, रा. दहिफळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, कृषी, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२२

निर्णय दिनांक २५-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नितिनकुमार गणेश मुदिराज,<br>रा. शेटवाड यांचा वाडा, रेल्वे ओव्हर ब्रीज<br>जवळ, दत्तनगर, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी,<br>उपविभाग, नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नितिनकुमार गणेश मुदिराज (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. रामनारायण लक्ष्मीनारायण गगराणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. शशीकांत नथू देवघरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००६ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमात प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या संचिकेच्या सत्यप्रतीची मागणी खालील प्रमाणे केली होती.

"१. कोळी महादेव जमात प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेल्या संचिकेची सत्यप्रत मिळणेबाबत.

वरिल अनुक्रमांक १ प्रमाणे कागदपत्र न्यायालयात न्याय मागणे-साठी दाखल करणे कामी मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेल्या संचिकेचा शोध घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अभिलेख कक्षात संचिका शोधण्यासाठी कार्यालयीन वेळेत आणि सुट्टीमध्ये सुध्दा अभिलेख शाखेत संचिका शोधण्याचे काम केले असल्याचे आयोगासमोर सांगितले. प्रयत्न करुनही अपिलार्थीने मागितलेली संचिका त्यांना प्राप्त होऊ शकली नाही त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देता येत नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २६-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २७-०९-२००६ रोजी पारीत केले. सदर आदेश त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये निर्गमीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचे

प्रकरणी दिनांक ०५-१०-२००६ पुर्वी निकाली काढण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील प्रकरण बंद केले आहे.

अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना दिनांक ३०-१०-२००६ रोजी त्यांच्या माहितीसंदर्भात परत स्मरणपत्र दिले. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या कोळी महादेव जातीचे प्रमाणपत्र लवकरात लवकर संबंधितांकडून मिळावे. त्यांनी तहसीलदार नांदेड यांच्याकडे स्वतः करिता व त्यांच्या बहिणीकरिता जात प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी दोन वेगवेगळे अर्ज दाखल केले होते. तथापि त्यांच्या बहिणीच्या अर्जावर कारवाई होऊन त्यांना आता जात प्रमाणपत्र पुरविण्याचे आदेशीत झाले असून, आवश्यक ते जात प्रमाणपत्र त्यांना आज रोजी मिळण्याच्या मार्गावर आहे. तथापि त्यांच्या स्वतःच्या बाबत मात्र त्यांना जात प्रमाणपत्रासंदर्भात काहीही कळलेले नाही. अशा परिस्थितीत जात प्रमाणपत्र त्यांना लवकरात लवकर मिळावे अशी त्यांनी अपेक्षा या युक्तिवादामध्ये अखेरीस व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक १७-११-२००६ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर संचिका त्यांच्या व त्याचबरोबर नांदेड तहसील कार्यालयात शोध घेण्याचे काम केले तथापि सदर संचिका त्यांना प्राप्त होऊ शकली नाही व त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीची संचिका

सापडत नसल्याबद्दल कळविले देखील आहे.  सदर कृती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दिलेल्या निणर्यातील सूचनेप्रमाणे केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २-०८-२००६ रोजी या अपिलासंदर्भात त्यांनी प्रथम सुनावणी ठेवली होती.  तथापि अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही या दिवशी गैरहजर असल्याने या अपिलाची सुनावणी त्या दिवशी न होता ती त्यांना दिनांक २६-०९-२००६ रोजी घ्यावी लागली.  या प्रकरणी त्यांनी निर्णय निर्गमीत केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे.  त्यांनी त्यांच्या व त्यांच्या अधिपत्याखालील तहसील कार्यालयामध्ये सुट्टीच्या दिवशी हजर राहून अपिलार्थीच्या संचिकेचा शोध घेतला असता सदर संचिका त्यांना अभिलेख कक्षात प्राप्त होऊ शकली नाही.  त्यांनी आयोगास तसे एका शपथपत्राव्दारे लिहून दिले आहे.  मुळात अपिलार्थीने मागितलेली संचिकाच आता सापडत नसल्याने जन माहिती अधिकारी यांना आजतागायत ती प्राप्त होऊ शकली नाही.  अपिलार्थी यांच्या अर्जाबरोबर त्यांच्या बहिणीचा अर्ज देखील होता व त्यांच्या बहिणीस आता आवश्यक ते जात प्रमाणपत्र मिळण्याच्या मार्गावर आहे.  अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास अपिलार्थीस ते किती दिवसात मिळेल व त्याकरिता किती खर्च येईल याची विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीने आता नवीन अर्ज दिल्यास आणि या प्रकरणी लागणारी २० रुपये इतकी

फीस त्यांनी भरल्यास अपिलार्थीस सदर प्रमाणपत्र पुन्हा नव्याने १५ दिवसात आत देण्याची व्यवस्था करता येईल असे सांगितले, अपिलार्थीस सदर व्यवस्था मान्य आहे. तथापि अपिलार्थीने तहसीलदार नांदेड यांच्या कार्यालयात दिलेल्या अर्जापैकी त्यांच्या स्वतःच्या संदर्भातील अर्ज तहसील अभिलेख्यात सापडत नाही. अपिलार्थीचा अर्ज अशा प्रकारच्या कागदपत्राचे जतन करण्याचे काम ज्या कर्मचा-यावर सोपविले, त्याच्या हातून अपिलार्थीचा अर्ज गहाळ झाल्याचे दिसून येते संबंधिताने अपिलार्थीचा अर्ज जतन करुन ठेवण्यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना न केल्यामुळे अपिलार्थीस निष्कारण त्रास होत असल्याचे व त्यांची गैरसोय होत असल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज जतन करण्याचे काम ज्या कर्मचा-यावर सोपविले होते त्या कर्मचा-याने दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जात प्रमाणपत्र संदर्भात, अपिलार्थीचा नव्याने अर्ज त्यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस आवश्यक ते जात प्रमाणपत्र १५ दिवसाच्या आत विनामूल्य प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी.

अर्जदाराच्या अर्जाबरोबर त्यांच्या बहिणीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल झाला होता त्या अर्जावर व्यवस्थितपणे प्रक्रिया होऊन अर्जदाराच्या बहिणीस आवश्यक ते प्रमाणपत्र आज मिळण्याच्या मार्गावर आहे तथापि अपिलार्थीचा अर्ज गहाळ झाल्याने त्यांना आवश्यक ते प्रमाणपत्र जन माहिती

अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकत नाही. अपिलार्थीस आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त न होऊ देण्यामागे जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्‌हेतू असल्याचे आयोगास वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी जात प्रमाणपत्र संदर्भात अपिलार्थीचा नव्याने अर्ज प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस आवश्यक ते जात प्रमाणपत्र १५ दिवसाच्या आत विनामूल्य प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-याने अपिलार्थीचा प्रथम अर्ज गहाळ केला त्यांच्यावर, उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, नांदेड यांनी, संबंधितांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्यात आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नितिनकुमार गणेश मुदिराज, रा. शेटवाड यांचा वाडा, रेल्वे ओव्हर ब्रीज जवळ, दत्तनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२५

निर्णय दिनांक २५-०२-२००८

१ श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपिलार्थी
संपादक, साप्ताहिक, सत्यम् शिवम् सुंदरम्,
बी-१५४, विवेकनगर, वसमत रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक,
सोनपेठ पोलीस स्टेशन, तालुका सोनपेठ,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस उपविभागीय अधिकारी,
गंगाखेड उपविभाग गंगाखेड, तालुका
गंगाखेड, जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वामन रंगनाथराव मोरे व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपविभागीय अधिकारी हे गैरहजर आहेत तर जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक, सोनपेठ पोलीस स्टेशन श्री. दिपक ज्ञानोबा शिंदे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००६ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००० ते ०१-०४-२००६ या कालावधीमध्ये त्यांच्याकडे अपिलार्थी व कुमारी मेघा वामनराव मोरे या दोघांनी केलेल्या अनुक्रमे दिनांक ०६-११-२००६ व २२-१२-२००५ रोजी काही व्यक्तींच्या विरुध्द केलेल्या तक्रार अर्जाच्या संबंधात काय कारवाई झाली हे जाणून घेण्याकरिता खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ वामन रंगनाथराव मोरे यांनी दि. ६-११-२००० रोजी, चव्हाण राजेश्वर प्रभू रा. चिंचटाकळी ता. गंगाखेड हा शाळेचे खोटे प्रमाण देत असतो, म्हणून तक्रार केलेली आहे काय ? त्या तक्रार अर्जाबाबत आपल्या पोलिस स्टेशन मार्फत काय कार्यवाही झालेली आहे. या प्रकरणात एफ आय आर (FIR) दाखल करुन – गुन्हा दाखल झालेला आहे काय ? गुन्हा दाखल झाल्यावर तपास अधिकारी यांचा अंतिम तपास अहवाल – काय आहे - माहीती द्यावी.
>
> २. ॲड कु. मेघा वामनराव मोरे यांनी दि. २२-१२-२००५ रोजी - हरीभाऊ नानासाहेब गरुड - तलाठी यांच्या विरोधात तक्रार अर्ज दिलेला आहे. त्या तक्रार अर्जावर आपल्या मार्फत – तपास अधिका-यामार्फत काय कार्यवाही केलेली आहे. माहीती द्यावी. तक्रार अर्जावर चौकशी होऊन – गुन्हा दाखल करण्यात आले आहे काय ? माहीती द्यावी. चौकशी अंतर्गत किंवा तपास करताना, आपण कोणकोणत्या, संबंधितचे जबाब घेतलेले आहेत त्याबाबत माहीती द्यावी.

३. वरील दोन्हीही तक्रार अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत काय ? अर्ज निकाली काढताना किंवा काढल्यानंतर, संबंधित तक्रार करत्यास कळविणे, संबंधित पोलिस स्टेशन अधीका-यास बंधनकारक आहे किंवा नाही – (कायद्याने) माहीती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या अपिलासंदर्भात काही माहिती दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीच माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००६ अन्वये व्दितीय अपील केले.

या अपिलामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली, जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई न करता त्यांना पाठीशी घातले आहे व त्यांची दिशाभूल केली आहे. जन अपिलीय

अधिकारी श्री. जी. डी. नंदनवार यांच्यावर कारवाई करण्याची त्यांनी या अर्जामध्ये शेवटी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण ३ मुद्दयावरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस समाधानकारकरित्या दिली असून सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीने मागितलेल्या ३ मुद्दयावरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००६ रोजी अर्ज केला होता. अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत अधिनियमामधील विहित केलेल्या तरतुदीनुसार दिनांक ०३-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी या माहिती संदर्भातील निर्णय जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे अभिप्रेत होते. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ६६ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे येथे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना मागितलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस बरीच माहिती अनुत्तरीत असल्याचे दिसून येते. उदा. मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तपास

अधिकारी यांचा अंतीम तपास अहवाल काय आहे याची माहिती विचारली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये या मुद्दयावर कोणतेही भाष्य नाही. मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात तपास करतांना कोणकोणत्या संबंधितांचे जबाब घेतले आहे याबाबत अपिलार्थीने माहिती विचारली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहितीमध्ये कुठलाही उल्लेख नाही. अपिलार्थीने केलेल्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ मध्ये अर्ज निकाली काढतांना तक्रार करणा-यास कळविणे हे पोलीस स्टेशन अधिका-यास कायद्याने बंधनकारक आहे किंवा नाही याची माहिती विचारली आहे. तथापि हाही मुद्दा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तरामध्ये अनुत्तरीत आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती दिली. वरील परिच्छेदात वर्णिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट व विलंबाने माहिती दिल्याचे सिध्द झाल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा अर्ज नीट न वाचल्याने अपिलार्थीस माहिती देतांना काही संदर्भ या माहितीतून सुटल्याचे दिसून येते. अपिलार्थीने देखील माहिती मागतांना प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारल्याचे येथे दिसून येते आहे. अपिलार्थीने जरी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असली तरी सदर प्रश्नासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांना योग्य ते मार्गदर्शन करणे सहज शक्य होते तथापि त्यांनी ते केलेले नाही. अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सर्वप्रथम माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत कारवाई करणे अपेक्षित असतांना त्यांनी अशा प्रकारची कारवाई न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती

अधिकारी यांनी आपला निर्णय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीच्या आत अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते. तथापि अशी कृती न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा त्यांनी भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येते. वर उल्लेखिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी हे कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार असे आदेशीत करण्यात येते की, पोलीस महासंचालक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पूर्णतः मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे विचारलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. पोलीस महासंचालक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वामन रंगनाथराव मोरे, संपादक, साप्ताहिक, सत्यम् शिवम् सुंदरम्, बी-१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक, सोनपेठ पोलीस स्टेशन, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपविभागीय अधिकारी, गंगाखेड उपविभाग गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पहिला मजला, पोलीस मुख्यालय, कुलाबा, मुंबई – ४३२ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८९

निर्णय दिनांक २५-०२-२००८

१ श्री. सुधाकर एकनाथ सुरळे, : अपिलार्थी
स्वस्त धान्य दुकान १६५ (संलग्न),
शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुधाकर एकनाथ सुरळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सिताराम राठोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. डी. एम.

मुगळीकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००६ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी १९९७ ते २००६ या कालावधीतील त्यांना पुरवठा वाढवून देण्यासंबंधी वेळोवेळी केलेल्या अर्जावरील कारवाईची माहिती मिळण्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " माननीय जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे १९९७ ते २००६ या काळातील पुरवठा वाढवून देण्यासाठी वेळोवळी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व १०-१०-२००६ च्या अर्जावरील निर्णय माननीय जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा / निर्णयाची छायांकीत प्रत देणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १५-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे

अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात निर्णय कळविला. त्या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, " प्रकरणातील माहिती ही जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांचे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी हे असल्याने आपण त्यांच्याकडे प्रथम अपील अर्ज करणे आवश्यक आहे. करिता आपणास कळवून आपण केलेला या कार्यालयाकडील अर्ज निकाली काढण्यात येत आहे. " या पत्राची प्रत अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी कोणासही अग्रेषित केल्याचे दिसून येत नाही.

यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्रासंदर्भात परत जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे आपल्या मूळ माहितीची मागणी दिनांक ०२-०४-२००७ च्या पत्रान्वये केली आहे.

मध्यंतरीच्या काळात परत अपिलार्थीने जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १५-०३-२००७ व १४-०३-२००७ रोजी पत्रव्यवहार करुन त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीची मागणी केली व त्यांच्या अपिलावर लवकरात लवकर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याविषयी विनंती केली.

बरेच प्रयत्न करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांनी निर्णय दिला नसल्याचे नमूद करुन निर्णय न देताच त्यांचे अपील निकाली काढले असल्याचा उल्लेख केला आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना सुशिक्षित बेकार म्हणून १९८० साली किरकोळ रॉकेल

विक्रेता परवाना मिळाला असून ते १९८० पासून आजतागायत रॉकेलचा किरकोळ विक्रीचा व्यवसाय करत आहेत. ते आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील आहेत. १९८० ते आजपर्यंत ते रॉकेलचा व्यवसाय करीत असून सुरुवातील त्यांना २६ टाक्या वाटपासाठी देण्यात येत होत्या. तथापि सध्या त्यांना ६ टाक्या वाटप करण्यासाठी देण्यात येत आहेत. सदर कोटा वाढवून देण्यासाठी त्यांनी १९९७ ते २००७ पर्यंत जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी इ. कडे अनेक अर्ज करुनही त्यांना अद्यापर्यंत संबंधिताकडून कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. सदर माहिती त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला. तथापि ही माहिती त्यांना न मिळाल्याने त्यामुळे त्यांनी प्रथम अपील जिल्हाधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार केले. या अपिलावर जिल्हाधिकरी यांनी त्यांना जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे अपील करण्याचे आदेश दिनांक १२-०३-२००७ रोजी दिले. सदर आदेश त्यांना २७-०३-२००७ रोजी प्राप्त झाले. त्यापुर्वीच त्यांनी दिनांक १६-०३-२००७ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे माहिती व निर्णयासाठी अर्ज सादर केला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी औरंगाबाद हे त्यांच्या अर्जावरील वरील कारवाईसंदर्भात वा या अर्जावरील निर्णयाची माहिती त्यांना देत नसल्याने त्यांनी नाईलाजाने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अद्यापपावेतो त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावरील कारवाईची व निर्णयाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य द्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे औरंगाबाद शहरातील अधिकृत रॉकेल पुरवठादार आहेत. शहरातील रॉकेल व इतर अन्नधान्य पुरवठ्यसंदर्भात अन्नधान्य वितरण अधिकारी औरंगाबाद हे

जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. अपिलार्थी यांनी केलेल्या अर्जासंदर्भात त्यांना काही माहिती नाही. तथापि अपिलार्थीच्या मागणीचा विचार करता त्यांनी असे स्पष्ट केले की, केरोसीन वितरण प्रणालीमध्ये संबंधीत पुरवठादाराच्या कार्यक्षेत्रामध्ये लोकसंख्या वजा गॅसधारकाची संख्या हे सूत्र लक्षात घेऊन व शासनाने ठरवून दिलेल्या प्रणालीप्रमाणे रॉकेल पुरवठाधारकाना पुरवठा करण्यात येत असतो. अपिलार्थीने केलेल्या अर्जावर त्यांना १५ दिवसाच्या आत अपिलार्थीच्या अर्जाचा शोध घेऊन निर्णय देण्यात येईल असे त्यांनी आयोगास आश्वासीत केले.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रतिसाद दिला आहे. त्यांनी दिनांक १४-०१-२००८ रोजीचे पत्र अन्नधान्य वितरण अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले असून त्यामध्ये अन्नधान्य वितरण अधिका-यांना अपिलार्थीचा कोटा कमी करण्याची कारणे विचारली आहेत. सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देऊन त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांनी अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे. सदर पत्र अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे १९९७ ते २००७ या कालावधीमध्ये केलेल्या अर्जावर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केलेल्या कारवाईची माहिती हवी आहे. तथापि जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत तहसीलदार यांच्यामार्फत अपिलार्थीसारख्या विक्रेत्यांना कोटा मंजूर करण्यात येत

असतो.  प्रथमतः अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे त्यांना अपेक्षित असलेली माहिती मागितली असून संबंधीत प्राधिकरणाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये हस्तांतरीत केलेला नाही.  अपिलार्थीने त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये ते १९९७ ते २००७ या कालावधीमध्ये त्यांचा कोटा वाढविण्याच्या अर्जासंदर्भात काय कारवाई झाली याची माहिती मागितली आहे. तथापि सदर माहिती अपिलार्थीस आजतागायत प्राप्त झालेली नाही.  जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.  या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय अपुरा असल्याचे दिसून येते.  जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णया-नंतर देखील अपिलार्थी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ विनंतीसंदर्भात पाठपुरावा करत राहिले.  तथापि त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही.  आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या पत्रानुसार त्यांच्या दिनांक २६-१२-२००६ च्या पत्राव्दारे त्यांच्या कार्यालयात हजर होण्यास सूचित केले होते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम सुनावणीस हजर राहू शकले नाहीत.

नंतर अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी पाठविलेली पत्रे मिळाली नसल्याने अपिलार्थीस निर्णय मिळाला नाही असे वाटल्याचे दिसून येते.  सबब असे आदेशीत करण्यात येते की, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे निर्देशीत केलेल्या मूळ अर्जावर त्यांनी केलेल्या

कारवाईची वा निर्णयाची माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक २५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर एकनाथ सुरळे, स्वस्त धान्य दुकान १६५ (संलग्न), शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९०

निर्णय दिनांक २५-०२-२००८

१ श्री. मोहंमद अखील मोहंमद बु-हानोद्दीन, : अपिलार्थी
शहानवाज शहीद मस्जीद जवळ,
शहानुरवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापिका, अमीन उर्दू प्राथमिक
शाळा घाटी, आसेफीया कॉलनी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमीक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहंमद अखील मोहंमद बु-हानोद्दीन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अमीन उर्दू प्राथमिक शाळा श्रीमती खान रिजवाना बेगम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी अधीक्षक वर्ग-२

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद श्री. जकीयोद्दीन वजीरोद्दीन ईनामदार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००७ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या शिक्षण संस्थे-संदर्भात संस्था स्थापन झाल्यापासून ते दिनांक ०२-०३-२००७ पर्यतच्या कालावधीतील खालील प्रमाणे एकूण १९ मुद्दयावर माहिती मागवली होती.

“१. संस्थेचे नांव अलफारान एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, घाटी, औरंगाबाद (आसेफिया कॉलनी).

२. संस्था रजिस्टर आहे काय ?

३. कोणत्या नियमाखाली.

४. सभासदांची (फाऊंडर) मेंबर्सची यादी.

५. संस्थेची घटना.

६. मेमोरंडम ऑफ असोसिएशन.

७. संस्था रजिस्टर झाल्यापासूनचे कामाचे स्वरुप, विविध कार्यक्रम, अन्य गतीविद्या.

८. लेखा पीरक्षण सुरुवातीपासूनचे (१) ताळेबंद, इनकम एक्सपेंडीचर, बॅलेन्स शिट व ऑडीट रिपोर्ट.

९. प्रत्येक वर्षाचे ऑडीट केलेले तक्ते आपल्या कार्यालयास सादर केलेले आहे काय ?

१०. संस्थेतील विश्वस्थांची किती संख्या आहे.

११. संस्थेतील कोरम पूर्ण आहे काय ?

१२. जर नसल्यास रिक्त जागा भरली आहे काय ?

१३. संस्थेच्या घटनेनुसार त्रैमासिक व वार्षिक कार्यकारिणीची व सर्वसाधारण सभासदाचे आयोजन केले जातात काय ?

१४. संस्थेची स्थावर मालमत्ता आहे काय ?

१५. शाळेची इमारत संस्थेची आहे काय ?

१६. भाडे किती मिळते व कोठे जमा होते ?

१७. संस्थेच्या किर्द, खाते व पावत्या सुरुवातीपासूनच्या सत्यप्रती द्यावेत.

१८. संस्थेच्या बैठकीचे नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते काय ?

१९. सभासदांना वेळेपूर्वी नोटीस दिली जाते काय ?

२०. संस्थेचे मिनिट बुक तयार आहे काय ? नियमाप्रमाणे कार्यवाही होते काय ?"

सदर अर्ज अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना रजिस्टर टपालाने पाठवून तो अर्ज जन माहिती अधिका-यास दिनांक ०६-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सहीची टपाल स्विकृतीची पोचची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे.

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी होणारे शुल्क रुपये १०३२० /- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न देण्याचा प्रयत्न

केला. चुकीची माहिती देऊन आर्थिक पिळवणूक केली व नियमानुसार फी न आकारल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारीत केले. या सुनावणी मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे निश्चित केलेल्या दरानुसार देण्याचे सूचित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार शुल्क जमा करुन अभिलेखे तपासणीसाठी अर्जदारास उपलब्ध करुन देण्याचे सुरुवातीस सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांना, अपिलार्थीने रजिस्टर पोस्टाने माहिती मागविली असतांना त्यांना अभिलेखे तपासणीबाबत कसे आदेश दिले गेले हे विचारले असता अपिलार्थीने सर्व प्रथम संबंधीत शाळेच्या अभिलेखाची तपासणी करावी व त्यातील त्यांना हवी असलेली कागदपत्रे प्रतिपृष्ठ २ रुपये या दराने झेरॉक्स करुन घेणे जास्त सोईस्कर असल्याचे त्यांना वाटल्याने त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयानुसार माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ८२७६ /- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कडे अपिलार्थीने डिमांड ड्राफ्टव्दारे दिनांक ०३-०५-२००७ रोजी भरले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेल्या या डिमांड ड्राफ्टचा क्रमांक ०००९९४ असा असून तो युनियन बॅक ऑफ इंडिया औरंगाबाद येथील बॅकेच्या मुख्य शाखेव्दारे काढला गेला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एकूण १०३२० /- रुपये इतक्या रक्कमेचा भरणा करण्यासाठी सूचित केले असता त्यांनी रुपये ८२७६ /- इतक्या रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्याचे कारण विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना वकिलाची फी

पोस्टेज खर्च, पॅकेज खर्च अशी अनुज्ञेय फी कळविली. त्याची वजावट करुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये ८२७६ /- इतकी रक्कम भरल्याचे सांगितले.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०३-०५-२००७ रोजी आवश्यक त्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर डिमांड ड्राफ्ट परत केला. सदर डिमांड ड्राफ्ट परत करत असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खालीलप्रमाणे कळविले.

“ १. असे की, मा. अपिल अधिकारी ह्यांनी आदेश पारीत करुन दि. २७-४-२००७ रोजी अभिलेखे तपासणीकरीता शाळेवर हजर राहण्याचे आदेश दिले होते परंतु आपण जाणून बुजून हजर झाले नाही.

२. असे की, आपण दि. ३०-४-२००७ रोजी तपासणी करीता हजर झाले परंतु तपासणी शुल्क रोख रुपयात जाणून बुजून जमा केले नाही करीता तपासणी झाली नाही.

३. असे की, आपण दि. ४-५-२००७ रोजी हजर झाले परंतु तपासणी फि चा वेगळा डि डी. न देता माहितीचे पाने ह्यांची एकूण रक्कम व तपासणी शुल्क असे एकत्रीत रकमेचा डि डी. रक्कम रु. ८२७६ /- जमा केलेला आहे.

४. असे की, आपणास दि. ५-५-२००७ रोजी तपासणी करीता शाळेवर हजर रहावे असे लिखीत दिलेले असताना पण आपण जाणून बुजून हजर राहिलेले नाही.

५. असे की, एकंदरीत आपणास वारंवार आपल्या मोबाईल क्र. ९९२२३३३१६० वर हजर रहाण्याकरीता कळविले असता आपण जाणून बुजून हजर राहात नाही.

६. असे की, आपण फक्त निरीक्षणाची फि प्रति तास रु. २० /- प्रमाणे जमा करावी व त्यानंतरच आपण दिलेल्या यादीप्रमाणे आपणास प्रति पान रु. २ /- प्रमाणे

माहितीचे पाने पुरविण्यात येईल. करीता आपण दि. ४-५-२००७ रोजीचा डि डी. क्र. “०००९९४” रक्कम रु. ८२७६ /- (आठ हजार दोनशे श्याहत्तर) चा सोबत परत करीत आहे. ”

अपिलार्थी यांनी वरील उत्तराच्या क्रमांक ५ च्या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या भ्रमणध्वनीवर (क्रमांक ९९२२३३३१६०) त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यासंदर्भात कोणतीही सूचना प्राप्त झाली नसल्याचे आज सुनावणीमध्ये आयोगासमोर सांगितले.

वरील सर्व घडामोडीनंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-५-२००७ अन्वये व्दितीय अपील केले आहे.

या अपिलामध्ये त्यांनी, त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती देण्यास नकार दिला. त्यांनी रक्कम भरतो असे म्हटल्यावर ती न स्विकारता त्यांनी अपिलार्थीस पे ऑर्डर व्दारे सदर रक्कम भरण्याचे सूचित केले व तदनंतर पे ऑर्डर दिल्यानंतर मुदत संपल्या-नंतर त्यांची पे ऑर्डर परत केल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदर शुल्क परत केले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर योग्य ती

प्रशासकीय कारवाई करावी. त्यांनी आवश्यक ते शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती विहित मुदतीत न पुरविल्यबद्दल त्यांना आता प्राप्त होणारी माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्या माहिती देण्यासाठी तयार आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००७ रोजी संबंधीत नस्तीचे निरिक्षण करण्यासाठी बोलाविले होते तथापि त्या दिवशी त्यांनी भ्रमणध्वनी व्दारे अपिलार्थीशी संपर्क साधूनही अपिलार्थी हे कार्यालयात हजर झाले नाहीत. अपिलार्थी त्यांचे कार्यालयात हजर न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांनी भरलेले शुल्क दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे परत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०४-२००७ रोजीच्या अपिलावर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आपले आदेश पारीत केले आहेत. त्यांच्याकडे झालेल्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अभिलेखे तपासणीसाठी उपस्थित राहण्याचे मान्य केले होते. सदर अभिलेख तपासणी करुन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती प्रतीपृष्ठ रुपये २० इतके शुल्क भरुन त्यांनी त्या हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांच्या सल्ल्याने ठरले होते. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने दिनांक २७-०४-२००७ रोजी शाळेत समक्ष उपस्थित राहून अभिलेख्याची तपासणी करण्याचे व तशी व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करण्याचे ठरले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे त्यांच्या दिनांक ३०-०३-२००७ च्या पत्राव्दारे प्रतिसाद दिलेला आहे. यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणा-या शुल्काच्या रक्कमेमध्ये कायदेशीर सल्लागाराची फी, टायपिंगचा खर्च इत्यादी बाबींचा समावेश केला आहे. जो माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः कळविलेली रक्कम रुपये १०३२० /- ही चुकीची असल्याचे आढळून येते. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे ते आयोगास मान्य नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्याच्या प्राधिकरणासंदर्भात माहिती मागविणे हा संबंधीत नागरिकाचा हक्क आहे व ती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. तथापि येथे जन माहिती अधिकारी यांना या कर्तव्याचा विसर पडल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात अभिलेखे तपासणीसाठी प्रत्यक्ष येतो म्हणून सांगितले होते. तथापि ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस खरोखरच माहिती देण्याची इच्छा असती तर त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात भरलेला रुपये ८२७६ /- चा (दिनांक ०३-०५-२००७) डि डी. त्यांना लागलीच ४ दिवसात त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविला नसता. जरी अपिलार्थी योग्य त्या मुदतीत त्यांच्याकडे हजर झाले नव्हते तरी त्यांना अपिलार्थीस, त्यांनी भरलेल्या रुपये ८२७६ /- या रक्कमेमध्ये ते जी माहिती देऊ शकले असते, ती माहिती पुरविणे शक्य होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती

देण्यासंदर्भात वरील घटनाक्रमावरुन कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती खरोखरच द्यावयाची होती की कसे याबाबत संशय घेण्यास भरपूर वाव आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीचा डि डी. परत देतांना त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या पत्रामध्ये कळविलेली कारणे शुल्लक आहेत असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या या पत्रामध्ये, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाणून बुजून हजर झाले नाहीत, तपासणी शुल्क रोख रुपये जाणून बुजून जमा केले नाही, त्यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता देखील ते जाणून बुजून हजर झाले नाहीत. त्यांनी फक्त निरिक्षणाची फी प्रती तास रुपये २० प्रमाणे जमा करावी व त्यानंतर त्यांनी दिलेल्या यादीमध्ये प्रती पृष्ठ रुपये २ याप्रमाणे माहिती पुरविण्यात येईल अशी कारणे दिली आहेत. अभिलेखे तपासणीसाठी पहिल्या तासाला कोणतेही शुल्क आकारावयाचे नसून तदनंतरच्या प्रत्येक तासाला रुपये ५ आकारावयाची सूचना असतांना देखील अपिलार्थीस त्यांनी प्रती तास २० रुपये चुकीची फी कळविली. केवळ वादाच्या मुद्याकरिता अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात जाणून बुजून हजर झाले नाहीत असे जरी ग्रहीत धरले तरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपिलार्थीने भरलेल्या रुपये ८२७६ /- इतक्या किमतीची माहिती देण्यामध्ये त्यावेळेस कोणतीही अडचण नव्हती. तथापि केवळ अपिलार्थीस या ना त्या कारणास्तव माहितीच द्यावयाची नाही अशा प्रकारची त्यांची मानसिकता या प्रकरणात तयार झाल्याचे वरील प्रमाणे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जाणून बुजून टाळाटाळ केल्याचे वरीलप्रमाणे सिध्द होत आहे. कारण अपिलार्थीने आवश्यक त्या माहितीपोटी आवश्यक त्या रक्कमेचा त्यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००७ रोजी भरणा केल्यानंतर त्यांनी लगेच ४ दिवसा-नंतर वर उल्लेखिलेल्या शुल्लक कारणास्तव सदर डि डी. अपिलार्थीस परत केला.

यावरुन तर त्यांना अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत माहिती द्यावयाची तयारी नव्हती असे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी आता अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत टळली असल्याने व विशेषतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास, त्यांचे शुल्क भरण्याच्यासंदर्भात, अपिलार्थीने शुल्क भरुनही टाळाटाळ केली असल्याचे सिध्द झाल्याने अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतूद ६ (७) नुसार विनामूल्य माहिती द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेली माहिती देण्यासंदर्भात वरील प्रमाणे टाळाटाळ केल्याने त्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सुनावणीच्या या टप्प्यावर जन माहिती अधिका-याने आयोगासमोर एक अर्ज दाखल करुन सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली. सदर विनंती आयोग अमान्य करीत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे पुन्हा मांडण्याची एक जादा संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या

मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अखील मोहंमद बु-हानोद्दीन, शहानवाज शहीद मस्जीद जवळ, शहानुरवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अमीन उर्दू प्राथमिक शाळा घाटी, आसेफीया कॉलनी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९२

निर्णय दिनांक २५-०२-२००८

१ श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड, : अपिलार्थी
एन-११, बी-१७/२, हडको, टी. व्ही. सेंटर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपसंचालक कार्यालय, अनुसुचित जमाती
प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक कार्यालय, अनुसुचित जमाती
प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक (संशोधन), अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड

(यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती श्री. सखाराम भानुदास पुंगळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती श्री. दामोधर काशिनाथ खडकीकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००१ ते २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातील अभिलेखे पाहण्यासाठी खालील प्रमाणे विनंती केली होती.

" या समितीने मन्नेरवारलू जातीच्या व्यक्तींचे पडताळणी केलेली प्रमाणपत्र, व्ही. सी. रिपोर्ट, स्पेशल व्ही. सी. रिपोर्ट कमेटीचा आदेश, शासन निर्णय मार्गदर्शिका इत्यादी अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी तारीख व वेळ मिळणेबाबत.

२००१-२००५ या वर्षात आपल्या कार्यालयाने दिलेल्या ३४८ व्यक्तींच्या यादीप्रमाणे माहिती मिळावी. सोबत आपले पत्र दिनांक २०-१०-२००६ व यादी जोडत आहे. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे कळवून अपिलार्थीस यांचा अर्ज निकाली काढला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने केलेला अपील अर्ज प्रपत्र ब च्या नमुन्यात करण्यास अपिलार्थीस विनंती केली. अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी या पत्राव्दारे कोणताही निर्णय कळविला नाही. अपिलार्थीस सदर पत्र दिनांक १२-०५-२००७ रोजी प्राप्त झाले.

जन अपिलीय अधिकारी यांनी ज्या पध्दतीने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला ती पध्दत योग्य नसून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल होणा-या अपिलावर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन ते नोंदवून त्यावर आपले आदेश माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे पारीत करणे अभिप्रेत असल्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे याची नोंद त्यांनी येथून पुढे घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-५-२००७ अन्वये व्दितीय अपील केले आहे.

या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर त्यांना निर्णय देतांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देऊन त्यांचा माहितीसाठीचा अर्ज व अपील हेतू पुरःस्सर नामंजूर केल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ४ (१) (ब) विचारात घेतले नसल्याचे दिसून येत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे त्यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी तयार केलेली एकूण ३४८ व्यक्तींची यादी सादर केली असून त्या व्यक्तींच्या संदर्भातील त्यांचे पडताळणी केलेले जात प्रमाणपत्र, व्ही. सी. रिपोर्ट, स्पेशल व्ही. सी. रिपोर्ट, कमिटीचा अहवाल शासन निर्णय मार्गदर्शिका इत्यादी अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सदर विनंती त्यांच्याकडील दिनांक १५-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अमान्य केली. सदर विनंती अमान्य करतांना या संदर्भात कोणतेही कारण दिलेले नाही. त्यांना अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या नस्त्या पाहण्यासाठी उपलब्ध करुन मिळाल्या नाहीत. त्या त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन हव्यात. त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले असतांनादेखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाचा नमुना लक्षात न घेता त्यांना विहित नमुन्यात अर्ज करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी विनंती केल्याप्रमाणे एका वेळी ३४८ प्रकरणातील नस्त्या त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देणे त्यांना शक्य होणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या नस्त्यापैकी काही नस्त्या न्यायालयामध्ये, काही नस्त्या शासनाकडे व काही नस्त्या संचालकाच्या कार्यालयाकडे त्यांनी पाठविल्या असून त्यांच्याकडे ज्या नस्त्या आजमितीस उपलब्ध आहेत त्या नस्त्या अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची आयोगासमोर तयारी दर्शविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे अपील अर्ज करतेवेळी माहितीचा अधिकार अधिनियमाची

अंमलबजावणी नव्याने सुरु झाली असल्याने त्यांच्याकडून अपिलार्थीस अशा प्रकारचे उत्तर अनावधानाने दिले गेले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने एकूण ३४८ व्यक्तींच्या ''मन्नेरवारलू'' या जात पडताळणीसंदर्भात तयार झालेल्या नस्त्यांची पाहणी करण्यासाठी त्या अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाव्दारे विनंती केली होती. तथापि त्यांच्या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी लक्षात न घेता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक १५-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेल्या नस्त्या त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देता येत नसल्याचे कळविले. अपिलार्थीच्या विनंतीस नकार देतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही कारणे कळविली नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागणे हा अपिलार्थीचा हक्क असून त्यांना अधिनियमातील तरतुदप्रमाणे ती देणे हे जन माहिती अधिकारी यांचे आद्य कर्तव्य आहे. अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली नस्ती उपलब्ध न करुन देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण नस्त्या त्यावेळी उपलब्ध नव्हत्या. त्यावेळी काही नस्त्या न्यायालयात, काही नस्त्या संचालकाच्या कार्यालयामध्ये, त्यांच्याकडे पाठविल्या असल्याने त्या अपिलार्थीस उपलब्ध करुन ते देऊ शकले नाहीत असे आयोगास सांगितले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या स्पष्टीकरणाशी आयोग सहमत होऊ शकत नाही. कारण नस्त्या दुस-या प्राधिकरणाकडे जरी पाठविल्या गेल्या असल्या तरीही जन माहिती अधिकारी यांनी सदरहू नस्त्या दुस-या प्राधिकरणाकडे कायम स्वरुपी हस्तांतरीत केलेल्या नाहीत. त्या संबंधित प्राधिकरणाकडून काही कालावधी करिता त्यांना

निश्चितपणे परत मागविता येतात. अपिलार्थीच्या नस्त्या पाहण्यासाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता, त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भिलेल्या सर्व नस्त्या पाहणीसाठी त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

सबब या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या नस्त्यापैकी ज्या नस्त्या त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत व ज्या नस्त्या त्यांच्या कार्यालयाने पाठविल्या अशा सर्व नस्त्या त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच टप्याटप्याने हस्तगत करुन अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेल्या सर्व नस्त्या हे आदेश निर्गमीत होताच ६० दिवसाच्या आत, पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्यात येत आहे. संबंधीत नस्त्या अपिलार्थीस किती टप्यात व कशा पध्दतीने पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या व त्या उर्वरीत प्राधिकरणाकडून कशा हस्तगत करावयाच्या त्याचे नियोजन जन माहिती अधिकारी यांनी याच कालावधीत करुन अपिलार्थीस सर्व नस्त्या पाहण्यासाठी एकूण ६० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. अपिलार्थीने पाहण्यासाठी मागितलेल्या नस्त्या या शासनाच्या “अ” प्रवर्गातील अभिलेखे या प्रकारामध्ये मोडत असल्याने या सर्व नस्त्याच्या हिशोब जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चितपणे असला पाहिजे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत म्हणजे दिनांक ०४-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पेक्षा ११ दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे याबद्दल

त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून इतःपर माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील काही कलमांचा आधार घेतला आहे. तथापि महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ आता निरसीत झाला असल्याने, अपिलार्थीने या अधिनियमाच्या आधारे आयोगाकडे उपथित केलेले मुद्दे आयोग अधिकारितेअभावी विचारात घेत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण ३४८ नस्त्या त्यांना पाहण्यासाठी हे आदेश निर्गमीत होताच ६० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद
दिनांक २५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड, एन-११, बी-१७/२, हडको, टी. व्ही. सेंटर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, कार्यालय उप संचालक अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७३

निर्णय दिनांक : २५-०२-२००८

१ डॉ. रामप्रसाद माधवराव पोरवाल, : तक्रारदार
बालाजी मंदिररोड, मोंढा, परतूर जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,
परतूर ता. परतूर जि. जालना

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार डॉ. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर श्री. पांडुरंग माणिकराव मसलेकर ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे विरुध्द त्यांचेकडील दि. २४.०९.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे- राज्य माहिती आयोगाने आदेशित करुनही मुख्याधिकारी, नगर परिषद, परतुर यांनी त्यांच्या संचिकेमध्ये निर्णय न दिल्याच्या कारणाची माहिती दिली नाही. सुनावणीचे वेळी मुख्याधिकारी यांनी संचिका वकीलाकडे आहे, असे खोटे सांगितले व शिस्तभंग केला, दि. ११.९.२००७ रोजी सुनावणीमध्ये संचिका वकीलाकडे पाठविली नाही, असे लेखी उत्तर दिले-अशा अर्थाची

तक्रार केली आहे. सदर तक्रारीची नोंद  राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि. २८.९.२००७ रोजी झालेली आहे. तक्रारदार यांनी या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या दि. २७.१.२००६ रोजीच्या प्रथम अर्जासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.९.२००७ रोजी सुनावणी होऊन आयोगाने सुनावणीसंदर्भात अपील आदेश पारीत केले होते. या आदेशामध्ये आयोगाने अपीलार्थीचे अपील मान्य करुन उत्तरवादी यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या प्रकरणाशी संबंधित असलेली संचिका वकीलाकडून मागवून घेऊन त्यामधील अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशित केले होते. सदर माहिती तक्रारदारास उत्तरवादी यांनी विहित मुदतीत न दिल्याबद्दल अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीअन्वये त्यांचेवर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेश आयोगाने या प्रकरणात दिले होते. आयोगाचे  आदेश झाल्यानंतर उत्तरवादी यांनी तक्रारदारास दि. ११.९.२००७ रोजी अपीलार्थीच्या अर्जाशी संबंधित सर्व संचिकेच्या झेरॉक्स काढून ती अपीलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मालमत्तेच्या नामांतरासंबंधात माहितीची मागणी केलेली असून या प्रकरणात आवश्यक ती कार्यवाही उत्तरवादी यांचेकडून अगोदरच झाली आहे. तक्रारदार यांनी,  त्यांच्या मत, नामांतराविषयी माहिती मागितलीच नव्हती, तथापि तक्रारदार यांनी त्यांच्या ज्या मूळ अर्जासंदर्भात तक्रार केली आहे, त्यावरुन तक्रारदारास घ.क्र.१७४८, १७४९/१ च्या नामांतर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती हवी आहे, असे दिसते. तक्रारदार यांनी, मूळ अर्जाद्वारे माहिती मागितली नसतांनाही उत्तरवादी यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेल्या त्यांच्या दि. २२.२.२००८ रोजीच्या लेखी निवेदनामध्ये तक्रारदाराच्या प्रकरणी, मालमत्ता कर आकारावा असा निर्णय घेऊन तो उत्तरवादी यांना दि. ५.२.२००८ च्या पत्राद्वारे कळविले असल्याचे नमुद केले आहे. यावरुन उत्तरवादी यांनी तक्रारदारास मागितलेली माहिती तर दिलीच आहे परंतु त्यांच्या टॅक्ससंबंधीच्या प्रकरणीही निर्णय घेऊन तो कळविला असल्याचे दिसते. तक्रारीमध्ये उत्तरवादी यांनी आयोगाची दिशाभूल केल्याचे कारणावरुन त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याच्या केलेल्या विनंतीसंदर्भात  उत्तरवादी यांचेविरुध्द या प्रकरणी दि. ७.९.२००७ रोजीच्या आयोगाच्या आदेशाद्वारे अगोदरच प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश दिले असल्यामुळे व दि. ११.९.२००७ रोजी उत्तरवादी यांनी संपूर्ण संचिकेची झेरॉक्स प्रत तक्रारदारास उपलब्ध करुन दिल्यामुळे पुन्हा कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. तक्रारदारास आता, उत्तरवादी यांनी आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती दिली असल्याने, तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

३. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ डॉ. रामप्रसाद माधवराव पोरवाल, बालाजी मंदिररोड, मोंढा, परतूर जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८५

निर्णय दिनांक २६-०२-२००८

श्रीमती कावेरीबाई अंबादासराव टेकाळे, : अपिलार्थी
मु. पो. पोथरा,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा
परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती कावेरीबाई अंबादासराव टेकाळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. जाधव पांडुरंग काशिनाथ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी कक्ष अधिकारी जिल्हा परिषद श्री. राजपूत जयलाल हिरालाल (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवेसंदर्भात सन १९८३ ते १९८७ या कालावधीतील एकूण चार मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. मला आपण १९८४-८५ च्या पत्राव्दारा प्रशिक्षण योजनेव्दारे (D.Ed.) प्रशिक्षणासाठी निवड करुन प्रशिक्षण पूर्ण करण्यास मदत केली. या कालावधीत संस्कार विद्यालय बीड ने आपल्यासोबत व आपण त्यांचे सोबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती द्याव्यात.

२. दि. ७/७/१९८१ ते २५/७/१९८७ या कालावधीत संस्कार विद्यालयात आपल्या रेकॉर्डप्रमाणे किती कर्मचारी कार्यरत होते यांची यादी तारीख निहाय द्यावी.

३. संस्थेस या कालावधीत एखाद्या कर्मचा-यास मान्यता न घेता त्याला सेवेत ठेवावयाचे असल्यास त्यास कोणत्या तरतूदीप्रमाणे पगार देता येतो त्या शासनादेश / नियम इ. ची प्रत द्यावी.

४. आपण चॉर्ज घेतांना कोणकोणत्या कागदपत्रांचा ताबा घेतला त्या चार्जपट्टीची प्रत द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असल्याने त्यांनी मागितलेली माहिती मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी सुचविले. या पत्राची प्रत त्यांनी मुख्याध्यापक संस्कार विद्यालय बीड यांना देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या स्तरावर परस्पर द्यावी व या प्रकरणी अपील होणार नाही याची दक्षता घ्यावी असे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्याला मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती मोफत देण्याचे आदेशीत करण्याचे व जन माहिती अधिकारी यांना विनंती करुनही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नसल्याने व आपल्या कर्तव्यात कसूर केला असल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १४-०३-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने प्रथम अपील अर्जामध्ये नमूद केलेली मुद्दा क्रमांक ४ व ५ संदर्भातील माहिती अपिलार्थीस

माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे मोफत पुरविण्याचे सूचित केले आहे.

अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलामध्ये मुद्दा क्रमांक ४ अन्वये अपिलाचा निकाल मुदतीत नियमाप्रमाणे देऊन त्याची एक प्रत अपिलार्थीस पाठविण्याची विनंती केली तर मुद्दा क्रमांक ५ मध्ये मोफत माहिती देण्याचे आदेशीत करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी केलेले अपील आयोगाच्या कार्यालयात दिनांक २८-०३-२००७ रोजी नोंदविले. अपिलार्थीने या अपिलामध्ये, त्यांची मूळ विनामूल्य माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, बीड जिल्हा परिषदे अंतर्गत त्या सह शिक्षिका या पदावरुन दिनांक ३० जून २००५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या संपूर्ण कार्यकाळामध्ये त्यांनी काही सेवा संस्कार प्राथमिक विद्यालय या संस्थेकडे तर काही सेवा बीड जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळेमध्ये केली. त्यांनी बीड जिल्हा परिषदअंतर्गत केलेल्या सेवेचे सेवानिवृत्ती वेतन त्यांना प्राप्त होत आहे. तथापि संस्कार विद्यालयामध्ये त्यांनी केलेल्या सेवेचे सेवानिवृत्ती वेतन त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. संस्कार विद्यालयाकडे त्यांची सेवापुस्तिका तयार नसल्याने आजपावेतो त्यांना संस्कार विद्यालयामध्ये केलेल्या सेवेसंबंधी कोणतेही वेतन प्राप्त झालेले नाही. त्यांनी संस्कार विद्यालयात केलेल्या

सेवा कालावधीतील त्यांची सेवापुस्तिका पूर्ण करण्याकरिता या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. आर. एस. मोगल शिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद (सध्या निलंबीत) हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीस प्रथम अर्जाच्या संदर्भाने त्यांनी मुख्याध्यापकाकडे जाण्याचे का सूचित केले हे त्यांना आता सांगता येणार नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडे त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीकडेच उपलब्ध असल्याची त्यांना अनौपचारिकरित्या माहीत आहे. केवळ सेवानिवृत्ती वेतन लवकर मंजूर व्हावे म्हणून अपिलार्थी त्यांच्याकडे अशी मागणी करीत असतात. अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही. सदर शोध त्यांनी स्वतः घेतला असतांना देखील सदर माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ बाबत असा युक्तिवाद केला की, १९९३ सालापूर्वी एखाद्या शिक्षण संस्थेने केलेल्या शिक्षकाच्या नियुक्तीस मान्यता देणा-या मूळ प्रस्तावावरच जिल्हा परिषद आपले अभिप्राय देऊन सदर प्रस्ताव मूळ प्रतीत संबंधीत शिक्षण संस्थेकडे पाठवीत असल्यामुळे या मुद्दया-वरील माहिती त्यांच्याकडे आज मिळणे शक्य नाही व सदर अभिलेखे संस्थेला १९९३ मध्ये लागलेल्या आगीमुळे भस्मसात झाल्यामुळे ही माहिती तेही देऊ शकत नाहीत. मुद्दा क्रमांक ३ बाबत त्यांनी असा खुलासा केला की, अशा प्रकारचे कोणतेही शासन आदेश अथवा नियम नाहीत. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ४ संदर्भात त्यांनी असे स्पष्ट केले की, शिक्षणाधिका-याची बदली होत असतांना फक्त एक ९३ क्रमांकाचा फॉर्म भरला जातो. कोणतीही नस्ती हस्तांतरीत केली किंवा

स्विकृत केली याची नोंद या फॉर्ममध्ये नसते व अशा प्रकारचे कोणतेही रेकॉर्ड त्यांच्या कार्यालयात ठेवले जाण्याची पूर्वीपासून पध्दती नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक २९-०१-२००७ रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी विहित मुदतीत सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या अपिलावर दिनांक १४-०३-२००७ रोजी निर्णय पारीत केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संस्कार प्राथमिक विद्यालय यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (१) च्या तरतुदीनुसार त्या माहितीबद्दल अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांनी अपिलार्थीस स्वतः कळवावयास हवे होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांनी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे सुचविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वस्वी चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज नीट वाचला नसावा किंवा त्यांना अपिलार्थीस कोणतीही माहिती द्यावयाची नसावी हे दोनच पर्याय विचारात घेऊ शकले जातात. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी हे जिल्हा शिक्षणाधिकारी या स्तरावरील अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज नीट वाचला नाही हा पर्याय येथे लागू होत नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही अशा उद्देशाने व अपिलार्थीस माहिती देण्याची टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने त्यांनी संबंधीत संस्थेच्या मुख्याध्यापकाकडे जाण्याचे सूचित केले असावे असे वाटते. संस्कार प्राथमिक शाळेला १९९३ साली लागलेल्या आगीमध्ये त्यांचे सर्व अभिलेखे भस्मसात झाल्याचे संबंधीत जन माहिती अधिकारी

यांना पुरेपूर माहिती होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती १९८३ ते १९८७ या कालावधीची असल्याने या संदर्भातील संपूर्ण अभिलेखे आस्तित्वात असणार नाहीत याची संपूर्ण कल्पना असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुख्याध्यापकाकडे जाण्याचे सूचित केले ही त्यांची कृती त्यांनी अपिलार्थीस हेतू पुरःस्सर माहिती न दिल्याची बाब सिध्द करते. आजतागायत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांना केलेल्या मूळ अर्जासंबंधात दिनांक १४-०१-२००७ रोजीच्या पत्राव्यतिरिक्त कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाशी व पर्यायाने त्यांच्या सेवानिवृत्तीत्तर दैनंदिन उपजिविकेशी संबंधीत असून हा प्रश्न संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी व संबंधीत मुख्याध्यापक यांनी आवश्यक त्या गांभीर्याने घेतला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस सेवानिवृत्ती वेतन आदेशाप्रीत्यर्थ त्यांची सेवापुस्तिका पूर्ण करुन हवी होती त्याकरिता आवश्यक ते कागदपत्र अपिलार्थी यांच्याकडे उपलब्ध आहेत, अपिलार्थीने आवश्यक ते कागदपत्रे उपस्थित उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे दिल्यास ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत त्यांची सेवापुस्तिका तयार करुन देण्यास तयार आहेत. सदर सेवापुस्तिका तयार झाल्यावर जिल्हा परिषदेचे उपस्थित अधिकारी अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत सेवानिवृत्ती वेतन संदर्भात आदेश देण्यास तयार आहेत हे पाहता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बीड यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून त्यांची सेवापुस्तिका तयार करण्यासंदर्भात आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीचा सेवानिवृत्तीचा प्रश्न एका महिन्याच्या आत मार्गी लावावा व अपिलार्थीस त्यांचे सेवानिवृत्ती वेतन हे आदेश निर्गमीत केल्यानंतर एक महिन्याच्या आत सुरु होईल असे पहावे. सदर सूचना शिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद, बीड यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (b) नुसार देण्यात येत आहे.

अपिलार्थीने केलेल्या मूळ अर्जासंदर्भात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतू पुरःस्सर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ केली असल्याचे वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे सिध्द झाले असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी, कोणत्याही वैध कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात मुद्देनिहाय खुलासा, त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेला आहे त्या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती वरील परिच्छेदात उल्लेखिल्याप्रमाणे पुरवावी.

प्रसंगवशात शिक्षण विभागाच्या ब-याच सुनावण्यासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, खाजगी प्राथमीक शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे, त्यांच्या सेवानिवृत्ती वेतन संदर्भात बरेच प्रश्न अद्यापही प्रलंबीत आहेत.  सर्व खाजगी प्राथमिक / माध्यमिक

शाळांची संबंधीत शिक्षणाधिका-यामार्फत नियमित तपासणी केली जाते. तथापि शाळांची वार्षिक तपासणी करत असतांना या शाळांमधील किती शिक्षकांची सेवा निवृत्तीची प्रकरणे प्रलंबीत आहेत, पुढील वर्षामध्ये किती शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत, त्यांच्या सेवानिवृत्ती वेतन संदर्भात संबंधीत संस्थेने व शिक्षण विभागाने काय कारवाई केली आहे अशा प्रकारच्या मुद्यांचा समावेश शिक्षणाधिका-यांच्या वार्षिक तपासणीमध्ये केल्यास, संबंधीत शिक्षणाधिका-याने उपस्थित केलेल्या मुद्दयांचे अनुपालन संबंधीत शिक्षण संस्था विहित मुदतीत करील असे पाहिल्यास व ज्या शिक्षण संस्था शिक्षणाधिका-यांच्या वार्षिक अहवाल तपासणीचे अनुपालन करणार नाहीत त्यांचे वार्षिक अनुदान गोठविण्याबाबत काही विचार शासनस्तरावरुन झाल्यास ब-याच सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे प्रश्न मार्गी लागू शकतील असे आयोगाचे मत आहे. आयोगाने केलेल्या या सुचनेवर सचिव (शालेय शिक्षण) यांनी गांभीर्याने विचार करुन आवश्यक वाटल्यास योग्य ती कारवाई करावी असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक

दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (शालेय शिक्षण) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

५. अपिलार्थी यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती कावेरीबाई अंबादासराव टेकाळे, मु. पो. पोथरा, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१०

निर्णय दिनांक २६-०२-२००८

श्री. येलदाळे उमेश वामनराव, : अपिलार्थी
रा. सावतानगर, पोलीस स्टेशन रोड,
गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. येलदाळे उमेश वामनराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद श्री. रावसाहेब नारायणराव वाघमारे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील आस्थापना विषयक बाबीसंदर्भात एकूण दोन मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. जिल्हा परिषद बीड मध्ये दिनांक १८ मे २००६ रोजी पासून पुढे आजपर्यंत सेवा निवृत्त होवून औषध निर्माता या पदाची किती पदे रिक्त झालेली आहेत व त्यापैकी किती पदे पुन्हा भरली आहेत व ती कोणत्या दिनांकाच्या निवड यादीतून भरले आहेत. ती संवर्गनिहाय व नावासहीत (भरलेले व सेवानिवृत्त उमेदवार) याची माहिती देण्याची कृपा करावी.

२. औषध निर्माता या पदासाठी निवड सुचितील प्रतिक्षाधिन उमेदवारांच्या नेमणूका बाबतची शासकीय नियमावलीची (जी.आर.) ची विशेषतः दि. २६/१२/२००५ रोजीची प्रतिक्षा यादी संबंधीचा (जी.आर.) प्रत देण्याची कृपा करावी. "

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-०६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाठविली असल्याचे म्हटले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी एका पानावर ७ सेवा नियुक्त कर्मचा-यांची यादी दिल्याचे दिसून येते. व याचबरोबर ग्रामविकास व जलसिंचन विभागाच्या दिनांक २३ मे २००६ च्या शासन निर्णयाची प्रत

यासोबत जोडली असल्याचे दिसून येते. सदर निर्णय जिल्हा परिषदेच्या निवड मंडळने तयार केलेल्या निवड यादीची विधीग्राह्यता व मर्यादा या मुद्दयावर स्पष्टीकरण करणारा आहे. थोडक्यात अपिलार्थीने मागितलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक १ च्या संबंधात अंशतः माहिती व तर मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत चुकीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेली दिनांक २६-१२-२००५ ची प्रतिक्षा यादी ज्या शासन आदेशातील मार्गदर्शक सूचनाप्रमाणे तयार केली गेली होती त्या शासन आदेशाची प्रत, मागितली होती. सदर शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ जुलै १९९४ रोजीचा आहे. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २८ जुलै १९९४ चा आदेश देण्याऐवजी २३ मे २००६ रोजीचा आदेश पुरविला आहे.

तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी परत दिनांक १७-११-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-११-२०० रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांनी मागणी केल्यानुसार नाही व ती परिपूर्ण नसल्याचे म्हटले आहे.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-११-२००६ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्यांनी दिनांक १२-०१-२००७ रोजी पारीत

केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील आदेशावर दिनांक १२-११-२००७ अशी तारीख चुकीने टंकलिखीत केल्याचे दिसून येते. सदर तारीख चुकीची आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (१) चे भविष्यात उल्लंघन होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घेण्याचे सूचित केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस समजेल अशा भाषेत माहिती देण्याचे सूचित करावे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या पत्रामध्ये, त्यांनी १८ मे २००६ पासून पुढे सेवानिवृत्तीच्या पदाबाबत माहिती विचारली असतांना यासंदर्भात उत्तर देतांना जन माहिती अधिकारी यांनी १८ मे २००६ असा उल्लेख केला आहे. याच पत्रातील मुद्दा क्रमांक २ मध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये दिनांक २६-१२-२००५ असे लिहिले असता त्यांना उत्तर देतांना जन अपिलीय अधिकारी २६-१२-२००६ असा उल्लेख केला आहे. त्यांनी निदर्शनास आणलेल्या या चुका दुरुस्त करुन त्यांना नवीन माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी द्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजी दिलेली माहितीमध्ये १८ मे २००६ व २६-१२-२००६ अशा दोन तारखांची चूक त्याच्या कार्यालयकडून

अनावधानाने झालेली आहे. सदर चूकीची कबुली त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहितीबाबत काही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये तर काही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००६ रोजी दिलेल्या माहितीमध्ये १८ मे २००६ अशी तारीख चुकीने पडल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले आहे. तथापि सदर चूक जरी झाली असली तरी अपिलार्थीस जी माहिती अपेक्षित आहे त्या माहितीच्या वैधतेस कोणतीही बाधा पोहोचत नाही हेही तितकेच खरे आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या कथित माहितीतील सर्व मुद्दे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना परत टंकलिखीत केले आहेत. त्यात टंकलेखकाने अपिलार्थीस माहिती देतांना त्यांच्या मूळ अर्जामध्ये दर्शविलेली दिनांक २६-१२-२००५ ही तारीख २६-१२-२००६ अशी दर्शविली आहे. जरी टंकलेखकाने चूक केली असली तरी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीच्या व्याप्तीमध्ये व वैधतेमध्ये कोणताही फरक पडत नाही. मुळात अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भातील फक्त माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अपेक्षित असतांना त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीच्या सर्व मुद्यांची पुनरावृत्ती अपिलार्थीस माहिती देण्याच्या पत्रामध्ये केली आहे. अपिलार्थीस माहिती देतांना, अपिलार्थीने मागितलेली मूळ माहिती अपिलार्थीस माहिती देतांना फेरटंकलिखीत करुन कळविणे साधारणतः अपेक्षित नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी संदर्भात जन माहिती अधिकारी यंनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ च्या पत्रामध्ये खुलासा केला आहे व त्यामध्ये टंकलेखनातील चूक त्यांनी मान्य केली आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करत असतांना शासकीय माहिती अधिकारी म्हणून आयुक्त राज्य माहिती आयोग मुंबई असा उल्लेख केला आहे. सदर उल्लेख अपिलार्थीने चुकीने केला आहे असे अपिलार्थी आज सुनावणी मध्ये सांगत आहेत, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करतांना त्यांची टंकलेखनामध्ये चूक होऊ शकते ती त्यांना चालते मात्र जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेल्या उत्तरमध्ये टंकलेखनामधील चुकीचा आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये विनाकारण बाऊ केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे याचा बोध होत नाही.

सबब अपिलार्थीस त्यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या उत्तरासंदर्भात आवश्यक ते शुध्दीपत्रक तयार करुन ते त्यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत पाठवावे असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी काही मुद्यावर विलंबाने माहिती दिल्याचेही या प्रकरणी उघड होत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना सर्वसाधारण परिस्थितीत ३०-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित आहे. तथापि येथे अपिलार्थीस काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी ४८ दिवसाच्या विलंबाने पुरविल्याचे दिसून येते. या विलंबाचे समर्थन करतांना उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या शासन निर्णयाची प्रत त्यांच्या कार्यालयात सहजरित्या उपलब्ध नव्हती. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करण्यारे कर्मचारी यांनी या प्रकरणी हलगर्जीपणा केल्याचे आज कबूल केले. थोडक्यात अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः अर्धवट माहिती दिली. उर्वरीत माहिती ४८ दिवसाच्या विलंबाने दिली. सदर विलंबाचे समर्थन ते आज करु शकत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदी नुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात

सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर सहाय्यक त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये लावलेल्या अशा प्रकारच्या ४८ दिवसाच्या असमर्थनीय विलंबाबाबत, विलंबाच्या प्रतीदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १२००० /- (अक्षरी- रुपये बारा हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देणारे त्यांचे इतर सहाय्यक यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पूर्ण माहिती न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे कर्मचारी जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील असल्यास त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत माहिती देण्यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ०३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरवून अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १२००० /- (अक्षरी- रुपये बारा हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यास जबाबदार असणारे त्यांचे इतर सहाय्यक यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पूर्ण माहिती न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे

आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. येलदाळे उमेश वामनराव, रा. सावतानगर, पोलीस स्टेशन रोड, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४०

निर्णय दिनांक २६-०२-२००८

श्री. सिध्देश्वर वामनराव स्वामी, : अपिलार्थी
जंगमवाडी, मालेगाव, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम), उत्तर
विभाग, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सिध्देश्वर वामनराव स्वामी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग श्री. शेख हैदर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उत्तर विभाग श्री. मधुकर बळवंतराव बंगाळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> "१. मालेगावातील जंगमवाडी भागात (देशी दारुच्या दुकानामागील जिल्हा परीषद नांदेड यांचे नीधीतून दि. २०-२-२००६ या काळात पूलाचे बांधकामाची सुरुवात झाली होती ते काम आज रोजी पर्यत पूर्ण काम झालेले आहे तरी ते पूलाचे काम झालेल्या शेतीचा गट नं. २०२ मधील शेतीतून झालेला आहे परंतू कोनत्या शेतक-याच्या शेतीत झालेला आहे त्यांचे नांव व त्यांची कीती शेती त्यामध्ये गेलेली आहे ते क्षेत्रफळ देणे ही माहीती सत्यप्रतीमध्ये देणे."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २३-०१-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या सदर अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये

अपिलार्थीस त्यांचे दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या अपिलासंदर्भात व त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस गट नंबर २०२ च्या ७/१२ उता-याची प्रत देऊन सदर गटाची मालकी ज्या शेतक-याकडे होती त्या शेतक-याचे नांव, ग्रामपंचायत मालेगावचे सरपंच व ग्रामविकास अधिका-याचे प्रमाणपत्र दिले असून, त्यामध्ये अपिलार्थीने संदर्भित केलेल्या पुलाचे काम हे मालेगाव गिरगाव या रस्त्याच्या हद्दीमध्ये केले असल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना मालेगाव येथील गट नंबर २०२ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत केलेल्या पुलाच्या बांधकामामध्ये निश्चितपणे कोणत्या शेतक-याची व किती क्षेत्रफळाची जमीन गेली आहे याची माहिती हवी होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत पुरविली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे. ज्या पुलाच्या संदर्भात त्यांनी माहिती मागितली आहे त्या पुलाच्या बांधकामासंदर्भात, या पुलाचे बांधकाम चालू असतांना सरपंच मालेगाव यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुन व त्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड व पालकमंत्री नांदेड यांना देऊनही त्यांचे कोणतेही म्हणणे लक्षात न घेता या रस्त्यावर नळकांडी पूल जिल्हा परिषदेमार्फत बांधला गेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागविली त्यावेळेस ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कारणे त्यांना सांगता येणार नाहीत. अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०५-०२-२००७ रोजी आवश्यक ती व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मालेगाव-गिरगाव जंगमवाडी भागामध्ये झालेल्या पुलाच्या बांधकामा-संदर्भात माहिती मागविली आहे. अपिलार्थीस ज्या रस्त्यावरील पुलाच्या बांधकामा-संदर्भात माहिती हवी आहे तो रस्ता मालेगाव-गिरगाव रस्त्याला मालेगाव गावाजवळच मिळतो. अपिलार्थीने मागितलेली माहिती मालेगाव गावातील अंतर्गत रस्त्यासंदर्भातील आहे. छोट्या गावातून जाणारे रस्ते ज्या वेळी मुख्य रस्त्याला जोडले जातात त्यावेळी मुख्य रस्त्याच्या हद्दीमध्ये पाण्याचा निचरा होण्याकरिता जोडरस्त्यावर पाईप पूल बांधला जातो. मालेगाव गावातील अशा प्रकारच्या पोच रस्त्यावर बांधलेल्या पुलाची अपिलार्थीस माहिती हवी आहे. सदर पूल मुख्य रस्त्याच्या हद्दीत बांधला आहे व तशा अर्थाचे प्रमाणपत्र संबंधीत ग्रामपंचायतीने अपिलार्थीस दिले देखील आहे. मालेगाव-गिरगाव या मुख्य रस्त्याचे मूळ काम १९७२ च्या दुष्काळामध्ये झालेले आहे. तदनंतर त्याच्यावर सदर रस्त्याचे पुढील काम पूर्णा पाटबंधारे विभाग यांच्यामार्फत झालेले आहे. या रस्त्याच्या कामाकरिता कोणत्याही प्रकारचे भुसंपादन झालेले नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००७ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीस मालेगाव गिरगाव (एम. डी. आर. २१) या रस्त्याला मालेगाव गावामधील

जंगमवाडी गिरगावपासून सुरु होऊन पुढे मालेगाव गिरगाव रस्त्याला जोडणा-या जोडरस्त्यावरील, मुख्य रस्त्याच्या हद्दीत बांधलेल्या नळकांडी पुलाच्या जमिनीच्या मालकी हक्कासंबंधीची माहिती हवी आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी वर स्पष्ट केल्याप्रमाणे सदर नळकांडी पूल हा मुख्य रस्त्याच्या हद्दीत बांधलेला आहे. मूळ रस्ता बांधतांना सदर रस्ता १९७२ च्या दुष्काळामध्ये बांधला होता त्यावेळी जमिनीचे कोणतेही भुसंपादन झालेले नव्हते. शेतक-यांनी केवळ दानपत्रे दिल्यानंतर अशा रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येत होते. त्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध नाही. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस गट नंबर २०२ च्या ७/१२ उता-याची प्रत व ग्रामपंचायत प्रमाणपत्र पुरविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोग मान्य करत आहे. मुळात अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती कोणत्याही प्रकारे उपलब्ध नाही हे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मागणी संदर्भात सर्वसाधारणपणे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने संदर्भीत केलेल्या २०२ या गटाचे एकूण ४ मालक असून अपिलार्थी त्यापैकी एक आहे. अपिलार्थीस या पुलाचे बांधकाम नेमके कोणाच्या कोणत्या मालकाच्या हद्दीत झाले आहे व त्याचे क्षेत्रफळ किती आहे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी भूमापन कार्यालया-कडे वेगळा अर्ज करुन जमिनीची मोजणी करुन घ्यावी लागेल. त्याकरिता त्यांना तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे मोजणीचा वेगळा अर्ज करावा लागेल असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे वर वर्णिल्याप्रमाणे शक्य नाही. तथापि अपिलार्थीस त्यांनी विहित केलेल्या मुदतीत कळविले नाही. त्यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद दिनांक ०५-०२-२००७ रोजी

दिलेला आहे. अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीमध्ये दिनांक २६-१२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी आपला निर्णय कळविणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे अनिवार्य होते. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस निर्णय कळविण्यास जन माहिती अधिकारी यांनी ५१ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्या-करिता का विलंब लागला याचे स्पष्टीकरण ते त्यांना पुरेपूर संधी देऊनही स्पष्ट करु शकले नाहीत. अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी दुसरे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते एवढेच त्यांनी आयोगास सांगितले. अशा प्रकारच्या असमर्थनीय विलंबामुळे त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करविण्यास पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या एकूण ५१ दिवसाच्या विलंबाकरिता त्यांना विलंबाप्रती प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १२७५० /- (अक्षरी- रुपये बारा हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीच्या आवश्यक त्या माहितीच्या मागणीबाबत, त्यांनी गट नंबर २०२ ची मोजणी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून करुन घ्यावी म्हणजे त्यांना निश्चितपणे संदर्भिय पुलासाठी त्यांची जमीन गेली आहे किंवा कसे व गेली असल्यास ती नक्की किती गेली याची माहिती मिळू शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या एकूण ५१ दिवसाच्या विलंबाकरिता त्यांना विलंबाप्रती प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १२७५० /- (अक्षरी- रुपये बारा हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

औरंगाबाद
दिनांक २६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सिध्देश्वर वामनराव स्वामी, जंगमवाडी, मालेगाव, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उत्तर विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४१

निर्णय दिनांक २६-०२-२००८

श्री. रामनारायण मयारामजी बंग, : अपिलार्थी
१-१२-२७ ''गंगामाई'' बाबानगर चौरस्ता,
वसंतनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामनारायण मयारामजी बंग हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय श्री. चिमाजी दगडू चौगुले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क

श्रीमती संगीता प्रतापराव दरेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या विभागात जातीच्या आरक्षण कोठ्यातून नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची नांवे, त्यांचे पद, नियुक्त झाल्याची तारीख, रुजू झाल्याची तारीख, त्यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्राची प्रत, रुजू झाल्यानंतर किती दिवसात पडताळणी रिपोर्ट द्यावा लागतो, जात पडताळणी केलेल्या रिपोर्टची माहिती, वेळ झाल्यानंतरही जर जात प्रमाणपत्राची पडताळणी केली नसेल तर त्यांच्यावर काय कारवाई केली. नसेल केली तर कारणासहीत सविस्तर माहिती.”

अपिलार्थीने या अर्जामध्ये माहितीशी संबंधीत कालावधी नमूद केला नसल्याचे दिसून येते. तद्वतच अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत माहिती, संबंधीत कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मागवण्यात येत असल्याचे व सदर माहिती त्यांच्याकडून प्राप्त होताच अपिलार्थीस अवगत करण्याचे आश्वासीत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये दिनांक ०१-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी नांदेड हे प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये सदर अपील अर्ज अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क नांदेड -- जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी -- आहेत त्यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती अर्जामध्ये "संबंधीत कालावधी" त्यांनी नमूद न केल्याने त्यांना माहिती देणे शक्य नाही असे कळविले व त्याचबरोबर अपिलार्थीने माहितीचा कालावधी नमूद केल्यास त्यांना माहिती देण्याची तयारी दर्शविली. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या पत्राच्या संदर्भात अपिलार्थीने दिनांक २२-०३-२००७ चा अर्ज दिला. तथापि सदर संदर्भ चुकीचा असल्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही आज आयोगासमोर सांगितले व त्याचबरोबर त्यांनी लेखी शपथपत्र सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ११-०४-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस दिनांक १९-०४-२००७ रोजी प्राप्त झाले यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील टपालवही आयोगास दाखविली. यामध्ये अपिलार्थीस हे पत्र दिनांक १९-०४-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी टपालवहीवर सही करुन त्याची पोच दिली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या

मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निकाल दिला नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजी प्रतिसाद दिला. अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी नमूद न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांना अपेक्षित माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या अर्जामध्ये निश्चित कालावधी नमूद न केल्याचे कळल्यानंतर ते अपिलार्थीस विहित मुदतीपेक्षा आडीच महिने इतक्या विलंबाने का कळविले असे विचारले असता त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते असे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्या अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क तथा जन अपिलीय अधिकारी या पदावर दिनांक ०२-०६-२००७ रोजी रुजू झाल्या आहेत. सदर प्रकरण त्यांच्या पुर्वीच्या काळातील असून त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्या कार्यालयाने सादर केला नव्हता. अपिलार्थीने जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे त्यांच्या माहितीच्या संदर्भात दिनांक ०१-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीची सदर कृती बरोबर नव्हती. जिल्हाधिका-याने या अपिलावर सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक ०४-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अपील अर्ज योग्य त्या कार्यवाहीस्तव व अपिलार्थीस समर्पक उत्तर देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास पाठविला. अपिलार्थीचा

अर्ज आल्यानंतर त्यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे आवश्यक ते अभिप्राय अपिलार्थीस कळविले.

वरील घटनाक्रम, राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे करतांना त्यामध्ये अपिलार्थीस नेमक्या कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा केला नव्हता. त्यांनी केलेल्या अर्जामध्ये माहितीशी संबंधीत कालावधी या मुद्दयासमोर "तिस दिवस" असा उल्लेख केला आहे. जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीने निश्चित कालावधीतील माहिती नमूद न केल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविला आली नाही हा त्यांचा मुद्दा आयोग ग्राह्य धरत आहे. तथापि या प्रकरणातील एकूण घटनाक्रम पाहिला असता सदर प्रकरण अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडून आवश्यक त्या गांभीर्याने हाताळल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांचा दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली. सदर पत्र लिहितांना अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांनी आपल्या नजरेसमोर ठेवला नसावा हे त्यांचे दिनांक १९-०१-२००७ रोजीचे पत्र व दिनांक ११-०४-२००७ रोजीचे पत्र या दोन्ही पत्रातील विसंगतीमुळे स्पष्ट होते. अपिलार्थीने जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केला तो अर्ज दिनांक ०४-०३-२००७ रोजी उत्पादन शुल्क कार्यालयास प्राप्त झाला व जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनंतर त्यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी अपिलार्थीस, त्यांनी मागितलेल्या माहितीमध्ये निश्चित कालावधीचा उल्लेख नसल्याचे कळविले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कालावधी, त्यांचा प्रथम अपील अर्ज जन माहिती अधिकारी

यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर लगेच कळविणे आवश्यक होते. तथापि या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी आपल्याला अपिलार्थीस ही माहिती द्यावयाची आहे अशा प्रकारचा सकारात्मक दृष्टीकोन न ठेवता त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर काहीच कारवाई केली नाही. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी कळविणे भाग होते. अपिलार्थीच्या अर्जातील सदर त्रुटीबाबत त्यांनी अधिनियमामधील विहित केलेल्या तरतुदीनुसार ७३ दिवसाच्या विलंबाने कळवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे अशी आयोगाची या प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकन करता खात्री झाली आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरण हाताळतांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ७३ दिवस इतक्या विलंबाने कारवाई करुन आपल्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त, उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन, तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी स्पष्ट न केल्याने जन माहिती अधिकारी त्यांना माहिती देऊ शकत नाही याची त्यांनी नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. माहिती अधिकार अधिनियमाखाली अर्ज करणा-या प्रत्येक अर्जदाराने असे लक्षात घेतले पाहिजे की, राज्य शासनातर्फे विहित केलेल्या प्रपत्रामध्ये माहिती मागत असतांना या प्रपत्रामध्ये, सर्व मुद्दयामध्ये माहिती भरुन हे प्रपत्र त्यांनी पूर्णतः भरले किंवा कसे याची प्रथम खात्री करुन घ्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याकडून

अर्जदारास अपेक्षित असलेली माहिती मिळणार नाही. अर्जदाराने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी माहितीसाठीचा अर्ज पूर्ण स्वरुपात भरणे हे त्यांचे प्राथमीक कर्तव्य ठरते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामनारायण मयारामजी बंग, १-१२-२७ ''गंगामाई'' बाबानगर चौरस्ता, वसंतनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, वसंतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १ ला माळा, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८४

निर्णय दिनांक २६-०२-२००८

श्री. दत्ता पाटील काकडे, : अपिलार्थी
रा. टाकळी कोलते, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (पुरवठा
विभाग), तहसील कार्यालय भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, भोकरदन,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दत्ता पाटील काकडे, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन व त्रयस्त पक्ष हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वस्त धान्य दुकान टाकळी

कोलते तालुका भोकरदन येथील दुकानदार सौ. सुमन रघुनाथ सोनवणे यांना त्यांच्या दुकानामार्फत करण्यात आलेल्या डिसेंबर २००६ व जानेवारी २००७ या कालावधी मधील रॉकेल पुरवठा व धान्य वितरणासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. रॉकेल पुरवठा व वितरणाची पध्दत डिसेंबर व जानेवारी मध्ये वितरणाची यादी.

दारिद्र्यरेषेचे लोकांना भाव लि. मध्ये, सर्वसाधारण वाटपाचे भाव हि म इत्यादी."

अपिलार्थीने केलेल्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १०-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणी संदर्भातील आदेश त्यांनी पारीत केले नसल्याचे अपिलार्थीने जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे केलेल्या दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तहसीलदार भोकरदन यांनी ऑक्टोंबर २००६ ते मार्च २००७ पर्यत टाकळी कोलते येथून रॉकेल वाटप करण्याच्या नियतनाच्या २ प्रती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. तथापि या प्रती अपिलार्थीस कोणाकडून व कधी प्राप्त झाल्या हे संबंधीत कागदपत्राच्या अनुपलब्धेते-मुळे कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील

अर्जावर कोणतेही आदेश पारीत केल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्रयस्त पक्षाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी कलम ११ (१) च्या कलमाचा उल्लेख केला आहे. तथापि अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयावर राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ (३) प्रमाणेच अपील करावे लागते याची त्यांना इतःपर कल्पना देण्यात येत आहे व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अपिलार्थीने केलेला ११ (१) या कलमा खालील अर्ज हा त्यांचे आयोगाकडे केलेले माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) खालील व्दितीय अपील समजून पुढील प्रमाणे निपटारा करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या या अर्जामध्ये आवश्यक असलेली माहिती म्हणून या मूळ माहितीपेक्षा वेगळी माहिती मागविल्याचे दिसून येते. आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये त्यांनी रॉकेल वाटप कार्डधारकाची यादी, गहू, तांदूळ सवलतीच्या दरात मिळणा-या कार्डधारकाची यादी व त्यांना प्रती युनिट मिळणारा माल यांची माहिती विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये आपल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप बदलल्याचे या प्रकरणी दिसून येते. याच अर्जामध्ये त्यांनी संबंधीत स्वस्त धान्य दुकानदार गरीब व दारिद्र्य रेषेखालील लोकांचा माल उचलून तो काळ्या बाजारात विकतो असे त्यांच्या निदर्शनास आले त्यामुळे त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागितली.  तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीच माहिती न देता माहिती देण्यास टाळाटाळ केली असे त्याचे म्हणणे आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही आयोगाने पुर्वसूचना देऊनही अनुपस्थित आहेत. आजच्या सुनावणीस हजर राहण्याकरिता राज्य माहिती आयोगातील कक्ष अधिकारी श्री. आर. सी. सरोदे यांनी तहसीलदार भोकरदन यांच्याशी दिनांक २०-०२-२००८ रोजी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून आजच्या सुनावणीस हजर राहण्या-करिता त्यांना विनंती केली होती. तथापि आयोगाकडून त्यांच्या भ्रमणध्वनीवर सूचना प्राप्त होऊनही ते आज सुनावणीस अनुपस्थित आहेत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादामध्ये वर म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांचे म्हणणे आयोगाकडे सादर केलेल्या लिखीत स्वरुपामध्ये मांडले आहे.  त्यांच्या मते त्यांनी सौ. सुमन सोनवणे यांच्याविरुध्द जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे अनुक्रमे दिनांक २०-०४-२००७ व दिनांक ०६-०३-२००७ रोजी तक्रार केली असतांना या तक्रारीवर कोणतीही कारवाई झाली नाही.  त्याचबरोबर त्यांनी या स्वस्त धान्य दुकानासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असून त्यांनी माहिती दिली नाही.  जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपिलावर निर्णय दिला नाही व जन अपिलीय अधिकारी हे त्यांची बाजू स्पष्ट करण्यासाठी आयोगाने त्यांना पुरेसा कालावधी देऊन, पुर्वसूचना देऊनही आज सुनावणीस अनुपस्थित आहेत. तेव्हा अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सदर निर्णय देण्यात येत आहे.  आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर २००६ व जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २००७ या कालावधीशी अनुक्रमे दिनांक ०७-१०-२००६ व ०२-०१-२००७ चे विवरणपत्र

दिल्याचे दिसून येते. सदर विवरणपत्र अपिलार्थीस केव्हा दिले याची नोंद उपलब्ध कागदपत्रामध्ये नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांना पुरविण्यात येणा-या धान्याचा भाव व सर्वसाधारण वाटपाचे भाव ही माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणात असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ मधील तरतुदींचा भंग केला आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केला आहे. जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणातील वर्तन निश्चितपणे बेजबाबदारपणाचे व त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करणारे आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदींचा भंग करुन त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांच्या या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी जालना यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन, राज्य माहिती आयोगा-कडून सूचना प्राप्त होऊनही सुनावणीस गैरहजर राहण्याबद्दल त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली असल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या वर महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी हे आदेश प्राप्त होताच २ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई करावी व तदनंतर एक

महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आपल्या माहितीची व्याप्ती प्रथम व व्दितीय अपिलामध्ये बदलली असल्यामुळे वरील निर्णय अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील माहिती पुरताच मर्यादित राहील. अपिलार्थीने केलेल्या अपील अर्जामध्ये केलेली वाढीव माहितीची मागणी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश त्यांना प्राप्त होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्ता पाटील काकडे, रा. टाकळी कोलते, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग), तहसील कार्यालय भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/६३

निर्णय दिनांक : २६-०२-२००८

१ श्री. शरच्चंद्र माधव पंडित, : तक्रारदार
एन-३, प्लॉट नं. ७४, सिडको, औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा कार्यकारी अभियंता (प),
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. शरच्चंद्र माधव पंडित (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. भागवत बी. म्हस्के ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री. अ. रो. बनसोडे व मुख्य अभियंता यांचे प्रतिनिधी सहा. मुख्य अभियंता, औरंगाबाद श्री. एच एस. पगारे, हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. २०.०९.२००७ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचे विरुध्द अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने दि. १६.८.२००७ रोजी दिलेल्या

आदेशाचे अनुपालन उत्तरवादी यांनी विहित मुदतीत केले नाही.  तक्रारदाराच्या या तक्रारीची नोंद आयोगाचे कार्यालयात दि. २०.९.२००७ रोजी झालेली आहे. आज रोजी  झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार हे गैरहजर आहेत. उत्तरवादी यांनी केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात व राज्य माहिती आयोगाने दि. १६.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे अनुपालनाचे संदर्भात उत्तरवादी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे व सदर माहिती त्यांचे नियंत्रणाखालील उपअभियंता, कनिष्ठ अभियंता या सगळयांकडून संकलीत करुन घ्यावयाची असल्याने, त्यांनी तक्रारदारास देण्यासाठी आवश्यक ती माहिती फेब्रुवारी,२००८ मध्ये तयार करुन ठेवली होती. सदर माहिती एकत्रित करुन दि. ८.२.२००८ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्रान्वये, तक्रारदार यांना,  सदर माहिती व्यक्तीशः प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित होऊन माहिती घेऊन जाण्यासंदर्भात सूचित केले आहे. तथापि या पत्राची तामिली तक्रारदार हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर उपलब्ध होऊ न शकल्यामुळे झाली नाही. तक्रारदार आता उत्तरवादी यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत व्यक्तीशः उपस्थित राहिल्यास तक्रारदारास विनामूल्य माहिती देण्यास उत्तरवादी तयार आहेत.

उत्तरवादी यांनी आपल्या युक्तीवादामध्ये पुढे असेही स्पष्ट केले की. त्यांनी तक्रारदारास दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी दूरध्वनी क्र. २४८६१७० वर दोन वेळा फोन करुन त्यांचेकडील उपलब्ध असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासंदर्भात सूचना केली तथापि तक्रारदार हे त्यांचे कार्यालयात दि. २२.२.२००८ रोजी उपस्थित राहीले. त्यावेळी त्यांना संबंधित लिपीकाने माहिती देऊ करुनही त्यांनी ती स्वीकारली नाही व माहिती न घेताच ते कार्यालय सोडून गेले.

येथे उत्तरवादी यांनी आयोगाच्या दि. १६.८.२००७ रोजीच्या आदेशाचे विलंबाने पालन केले असल्याचे दिसून येते. उत्तरवादी यांनी आयोगाच्या आदेशाचे पालन करण्याकरता लागलेला विलंब त्यांनी आज रोजीच्या त्यांचे युक्तीवादामधून आयोगाचे निदर्शनास आणला. हा विलंब उत्तरवादी यांनी आयोगाचे समोर स्पष्ट केलेल्या त्यांच्या खात्याची कार्यपध्दती विचारात घेतल्यास काही अंशी समर्थनीय आहे. याचबरोबर तक्रारदार यांनी  या प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.३.२००७ रोजी केलेल्या द्वितीय अपीलाच्या निर्णय देतांना उत्तरवादी यांनी तक्रारदारास विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेश आयोगाने यापूर्वीच दिले आहेत, हे लक्षात घेता आता नव्याने परत उत्तरवादी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेशित करणे आयोगास

उचित वाटत नाही. तक्रारदार; उत्तरवादी यांनी माहिती तयार ठेवूनही व त्यांचेशी उत्तरवादी यांनी संपर्क साधूनही, त्यांचे कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित राहूनही आवश्यक ती माहिती हस्तगत करीत नाहीत, हे पाहता या प्रकरणी उत्तरवादी यांचेवर या टप्प्यावर कार्यवाही करणे योग्य होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग आले आहे.

तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून वारंवार विनंती करुनही या प्रकरणातील माहिती न घेण्याचे तक्रारदार यांचे वर्तन पाहता या ठिकाणी तक्रारदार यांनी आपल्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीस वेळीच आवर घालावा, असे त्यांना सूचित करण्यात येते.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शरच्चंद्र माधव पंडित, एन-३, प्लॉट नं. ७४, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८३

निर्णय दिनांक २७-०२-२००८

श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन, : अपिलार्थी
जवाहर कॉलनी महाडाजवळ, हिवरखेडा
रोड, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कन्नड श्री. कारभारी शंकर दिवेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार (नगरपालिका प्रशासन) श्रीमती ए. एस. भालेराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर

आहेत. त्रयस्त श्री. जाधव बाबुराव कचरु व जाधव प्रभाबाई कचरु हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कन्नड शहरातील प्रभाग ३ व १ या मतदारसंघातील मतदार यादीसंदर्भात दिनांक १४-०९-२००६ ते १७-१०-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" आपले पत्र दि. १७-११-२००६ चे अन्वये कन्नड विधानसभा मतदार यादी तहसिल कडुन उपलब्ध करुन वार्ड क्रमांकाप्रमाणे विभाजन केले आहे. त्यानुसार दि. १५-०९-२००६ रोजी अस्तीत्वात असलेल्या २८ मतदार जामडी घाट येथील रहिवासी असलेले नगर परिषद निवडणूक २००६-०७ चे प्रभाग क्र. ३ चे मतदार यादीत समावेश केल्याबाबतचा सबळ पुरावा आहे. त्यानंतर दि. १७-१०-२००६ रोजी अधिप्रमाणित करण्यात आलेल्या प्रभाग ३ मधील २६ बोगस मतदारांचा त्या यादीतुन वगळण्यात आले आणि अ. क्र. ८५९ वरील जाधव बाबुराव कचरु व अ. क्र. ८६० वरील जाधव प्रभाबाई कचरु हे मतदार राष्ट्रवादी कॉग्रसेच उमेदवार जाधव तेजराव बाबुराव यांचे आई-वडिल असुन त्यांचे नाव प्रभाग ३ मधील मतदार यादीतुन वगळणी करण्यात आलेले नसुन त्यांना प्रभाग क्र. १ चे मतदार यादीत अ. क्र. ७८२ वर जाधव बाबुराव कचरु व अ. क्र. ७८३ वर जाधव पद्माबाई कचरु यांचा समावेश केल्याचा सबळ पुरावा आहे. त्याचप्रमाणे २६ बोगस मतदार जामडी घाट येथील रहिवासी असलेले यांना प्रभाग ३ मधील मतदार यादीतुन वगळणी करण्यात येवुन प्रभाग १ च्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. ज्यावर प्राधिकृत अधिकारी यांनी सही शिक्क्यानिशी अधिप्रमाणित केलेले आहे.

सदरच्या मतदार याद्या सबळ पुरावा असुन संबंधीत **मतदारांना प्रथम प्रभाग ३ चे मतदार यादीमध्ये समावेश करण्यात आलेला असतांना त्याच मतदारांना पुन्हा प्रभाग क्र. १ चे मतदार यादीत समावेश करण्यासाठी जी कागदपत्रे शासन तरतुदीतील फॉर्म यांचा वापर केला असेल त्यानुसार त्या अधिनियमातील तरतुदी बाबतचे परिपत्रकासह माहीती उपलब्ध करुन देण्यात यावी व जी मतदार प्रभाग ३ मधील मतदार यादीतुन वगळणी करण्यात आलेले नाहीत असे असतांना देखील त्यांचा प्रभाग १ चे मतदार यादीत समावेश करण्यासाठी शासन तरतुदीचा वापर केलेला आहे त्याची प्रतीसह माहीती पुरविण्यात यावी.** ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये २०४ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सदर पत्रावरुन त्यांच्याकडे परत दिनांक ०६-०१-२००७ रोजी संदर्भ केला असून त्यामध्ये सतत चकरा मारुनही त्यांनी केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्याकरिता हेतू पुरःस्सर टाळाटाळ केली जात असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे आवश्यक ती फी भरण्याची तयारी आहे किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख नाही.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्या कडील दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुर्वी कळविल्याप्रमाणे

आवश्यक ते शुल्क रुपये २०४ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याची विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २९-१२-२००६ व दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या पत्रातील निर्णय मान्य नसल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाची अंतीम सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १०-०४-२००७ रोजी पारीत केले. या अपील निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपील दाखल झाल्यानंतर प्रती पृष्ठ रुपये २ /- प्रमाणे आकारणी करुन अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे वेळेत माहिती दिली नाही. सदर माहिती देतांना अडथळे निर्माण केले. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या आदेशामध्ये विहित कालावधीमध्ये माहिती दिली नाही असे सिध्द होते असे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केल्यानंतर प्रती पृष्ठ रुपये २ /- प्रमाणे शुल्क आकारुन माहिती दिली आहे व शेवटी जन माहिती

अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्याची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रुपये २०४ /- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांचे कार्यालयात न भरता अपिलार्थी त्यांच्याशी याच विषयावर वेळोवेळी पत्रव्यवहार करत राहिले. सदर पत्रव्यवहार माहितीचा अधिकार अधिनियमाखालील नसून तो साध्या कागदावर केलेला आहे. अपिलार्थीने दिनांक १८-०१-२००७ रोजी त्यांना अर्ज करुन संचिकेच्या निरिक्षणाची मागणी केली होती. अपिलार्थीच्या सदर अर्जावर त्यांनी तात्काळ प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २०-०१-२००७ रोजी संचिकेच्या निरिक्षणासाठी उपस्थित राहण्यास कळविले. अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-०१-२००७ रोजी दुपारी ०४-०० वाजता उपस्थित झाले व त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या संचिकांची पाहणी केली. अपिलार्थीस त्यांना सदर संचिका पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या. सदर संचिकाची पाहणी केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती एकूण १३८ पृष्ठांची आढळली. सदर पृष्ठांच्या प्रती काढून घेण्यासाठी अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-०२-२००७ रोजी रुपये २७६ /- इतक्या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याविषयी लेखी स्वरुपात सुचविले. तथापि

अपिलार्थीने या संपूर्ण कालावधीत त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क भरण्याची तयारी कधीही दाखविली नाही व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी सुनावणी झाली असता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष केवळ ११ पानांची माहिती आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०३-२००७ रोजी लेखी पत्राव्दारे माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये २२ /- ची मागणी केली. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक २६-०३-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये २२ /- इतक्या शुल्काच्या रक्कमेचा भरणा केला. आवश्यक त्या रक्कमेचा भरणा केल्याने सदर माहिती त्यांच्या कार्यालयातून दिनांक २९-०३-२००७ रोजी हस्तगत केली. सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या संदर्भीय पत्राच्या स्थळप्रतीवर माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची सहीनिशी पोच घेतली आहे. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक २९-०३-२००७ रोजी मिळाल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी त्यांनी दिनांक ०९-०३-२००७, १७-०३-२००७, २२-०३-२००७ व ०७-०४-२००७ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक १०-०४-२००७ रोजी पारीत केले. अपिलार्थीने त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या कथित जादा शुल्कासंदर्भात अपील केले होते. यासंदर्भात सुनावणी घेऊन वरील प्रमाणे दिनांक १०-०४-२००७ रोजी निर्णय दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये, दिनांक २९-१२-२००६ रोजी योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरता ते जन माहिती अधिकारी यांच्याशी निरर्थक पत्रव्यवहार करत राहिले. सदर पत्रव्यवहार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २२-१२-२००६ च्या अर्जाशी सुसंगत नाही कारण त्यांनी दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या अर्जामध्ये प्रत्यक्षतः माहितीची मागणी केली होती. तथापि तदनंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या वेळोवेळीच्या अर्जामध्ये त्यांच्याकडे संचिका पाहण्याची मागणी केली. प्रथमतः अपिलार्थीने त्यांना १३८ पृष्ठांची माहिती मागितली होती. सदर माहितीचे शुल्क रुपये २७६ /- हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरताच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाच्या दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या सुनावणीमध्ये फक्त ११ पानांची माहिती आवश्यक असल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सांगितले. सदर माहितीपोटीचे शुल्क रुपये २२ /- भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले व अंतीमतः त्यांनी सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २६-०३-२००७ रोजी भरुन त्यांना आवश्यक असलेली माहिती दिनांक २९-०३-२००७ रोजी हस्तगत केली. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने वेळोवेळी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती बदलल्याचे वर निर्देशिल्याप्रमाणे स्पष्ट होत आहे. मुळात अपिलार्थीला स्वतःला निश्चित कोणती माहिती हवी आहे

याची माहिती नसावी असे यावरुन दिसून येते. ज्या ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करण्याचे सूचित केले त्या त्या वेळी अपिलार्थीने आपल्या माहितीच्या मागणीचे स्वरुप व व्याप्ती बदलली आहे व शेवटी दिनांक २२-०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर त्यांनी त्यांना एकूण ११ पृष्ठांची माहिती आवश्यक असल्याचे कथन केले. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी रुपये २२ /- इतक्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर त्यांनी ती हस्तगत केली हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून माहिती हेतू पुरःस्सर दडविली किंवा त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असे वाटत नाही व ते सिध्दही होत नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही असे सिध्द झाले असल्याचे म्हटले आहे. तथापि त्यांनी काढलेला त्यांचा हा निष्कर्ष आयोग खोडून टाकत आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीचा भंग झाला नसल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भत नाही. अपिलार्थीस स्वतःला निश्चितपणे कोणती माहिती प्राप्त करुन घ्यावयाची होती हे समजत नव्हते, एकदा आवश्यक त्या माहितीची निश्चिती झाल्यानंतर व त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या दराप्रमाणे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर ३ दिवसातच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन, जवाहर कॉलनी महाडाजवळ, हिवरखेडा रोड, कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८८

निर्णय दिनांक २७-०२-२००८

श्री. स. वजिर स. अहमद, : अपिलार्थी
बरकतपुरा भाग, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय मुदखेड,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, मुदखेड,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. स. वजिर स. अहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय मुदखेड श्री. पी. के. राठोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा

तहसीलदार, मुदखेड श्री. विनायक दत्तात्रय जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून, जुलै व ऑगस्ट २००६ या कालावधीतील अतिवृष्टीमुळे धनज गावच्या झालेल्या शेतातील पिकांच्या नुकसानी संदर्भात खालील प्रमाणे सत्यप्रतीत माहिती मागितली होती.

> “ जून, जुलै व ऑगस्ट या महिनेतील २००६ या वर्षातील अतीवृष्टी मूळे, महापूरामुळे धनज या गावच्या शेतीतील पीकांचे नुकसान झाल्याबाबद तलाठी यानी केलेल्या पीक पंचनामा व पीक गेलेली शेताची पाहणी करुन पूरगृहस्थाच्या शेतक-याची नावाची यादी, गट न., पंचनामा व ज्या शेतीत पेरलेले पीकासहीत व एक एक शेतक-याची कीती शेतीचे नुकसान झाले व आपण ती कीती शेतीची नोंद केली त्या नोंदीसहीत माहीतीच्या सत्यप्रतीत माहीती देणे मुदखेड तालुक्यातील धनज या गावची २००६ या वर्षातील, अतीवृष्टी, पूरग्रस्थ, महापूराने झालेल्या शेतीची नुकसान १) पंचनामा २) शेतीत कोनते पीक होते ३) शेतक-याचे नाव, गाव ४) कीती शेतीचे नुकसान झाले याबाबद सवीस्त माहिती द्यावी (गट न.सहीत).”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी प्रती पृष्ठ रुपया एक या दराने एकूण रुपये २२ /- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवही दाखविली. या नोंदवहीमध्ये अपिलार्थीस संबंधीत जन

माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००६ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २०-१२-२००६ च्या पत्रावर जावक क्रमांक लिहिलेला नाही. सदर पत्र अपिलार्थीस मिळाले किंवा कसे हे कळण्यास आज रोजी अपिलार्थीच्या गैरहजेरीअभावी मार्ग नाही.

तदनंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे निर्देशीत करुन मूळ माहितीची मागणी कायम ठेवली होती.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक ०६-०२-२००७ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. जन अपिलीय अधिकारी यांनी या सुनावणीच्या संदर्भातील आपले आदेश दिनांक ०६-०२-०७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याचे नमूद करुन अपिलार्थी यांच्याकडून विहित रक्कमेचे चलन प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर अपिलाचा निर्णय अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००७ रोजी कळविल्याचे त्यांच्याकडील जावक नोंदवहीवरुन दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या नोंदवहीमधील नोंदी संशयास्पद वाटतात कारण जावक नोंदवहीतील क्रमांकाची नोंद, अपील निर्णय ज्या पत्राव्दारे पाठविले त्यावर कोठेही दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर अपील निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला किंवा कसे हेही अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे नमूद केले आहे. तद्वतच सुनावणी न घेतल्याने अपिलीय अधिकारी यांना नियमाप्रमाणे शास्ती लावून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य ती कारवाई करुन अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रुपये २२ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यास त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या रक्कमेचा त्यांच्याकडे भरणा केला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या पत्रावर जावक क्रमांक का नाही असे विचारले असता या पत्रावर संबंधीत लिपिकाने टाकावयास हवा होता असे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राव्दारे त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या

सुनावणीस हजर राहण्यास कळविले होते. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची त्यांच्या गैरहजेरीत सुनावणी घेऊन दिनांक ०६-०२-२००७ रोजी आपले आदेश पारीत केले आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नस्तीवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या संदर्भातील त्यांचे निर्णय अपिलार्थीस कळविले नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस प्रथम अपिलावरील निर्णय का कळविला नाही असे विचारले असता त्यांनी त्यावर काहीही उत्तर दिले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिनांक २०-१२-२००६ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या पोटी शुल्क रुपये २२ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस मिळाले किंवा कसे हे कळण्यास आज मार्ग नाही. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या पत्रावर कोणताही क्रमांक नाही. पत्रावर क्रमांक नसल्याने या पत्राची वैधता संशयास्पद ठरते असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणी-साठी बोलाविले त्यांच्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्रावर देखील जावक क्रमांक नाही. फक्त संबंधीत लिपिकाची सदर पत्र दिनांक २५-०१-२००७ रोजी निर्गमीत केल्याप्रीत्यर्थ सही आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या निर्णयावर कोणताही जावक क्रमांक नाही. यावर फक्त संबंधीत लिपिकाची "निर्गमीत केले" अशा अभिप्रायासह दिनांक ०६-०२-२००७ रोजीची स्वाक्षरी आहे. पत्रव्यवहारातील त्रुटी पाहता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय

अधिकारी यांनी या प्रकरणी आवश्यक ती कारवाई बरोबर करुनही केवळ जावक क्रमांकाचा उल्लेख संबंधीत पत्रावर केला नसल्याने यापुर्वी म्हटल्याप्रमाणे या संपूर्ण पत्रव्यवहाराची वैधता धोक्यात येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावर अर्ज करतांना त्या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही असे म्हटले आह. तर आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. यावरुन केवळ संशयाचा फायदा देण्याच्या दृष्टीने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी पाठविलेली पत्रे मिळाली नसल्याची वस्तुस्थिती गृहित धरुन, विशेषतः जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या पत्रव्यवहाराची वैधता वरील परिच्छेदामध्ये वर्णिल्याप्रमाणे संशयास्पद आढळून येत असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतीही टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. तर जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याच्या किंवा त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यासंदर्भात शिफारस करण्याची आयोगास अधिकारिता नसल्याने अपिलार्थीने उपस्थित केलेला हा मुद्दा आयोग विचारात घेऊ शकत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले

व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. स. वजिर स. अहमद, बरकतपुरा भाग, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४२

निर्णय दिनांक २७-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रल्हाद किसनराव तौरे,<br>जनसेवा हॉस्पिटल, महाराष्ट्र व्दार<br>जवळ, अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, घनसावंगी, जिल्हा<br>जालना | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रल्हाद किसनराव तौरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी श्री. जवादे योगेश रमेशराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ पंचायत समिती अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांच्या ठिकाणी बसविलेल्या माहितीदर्शक फलकाचे गट विकास अधिकारी व उप अभियंता यांचे प्रमाणपत्र तसेच शासनाच्या घरकूल योजने अंतर्गत बांधलेल्या घरकुलाचे ताबा प्रमाणपत्र व या घरकुलात संडास बांधलेले गटविकास अधिकारी व उप अभियंता यांच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने सदर प्रथम अपील सादर करण्यात येत असल्याचे या अपिलामध्ये म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०३-२००७ रोजी प्रथम सुनावणी घेतली. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कगदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलाची सुनावणी खरोखरच घेतली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये असे सांगितले की, त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०३-२००७ रोजी सुनावणी घेतली होती तथापि या संदर्भातील

आदेश त्यांना अप्राप्त आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडे देखील या सुनावणीच्या संदर्भातील आदेश अप्राप्त आहेत.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील सुनावणीसंदर्भात त्यांचे दिनांक ०१-०३-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती पुरविली. यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संबंधात कार्यालयाचे ग्राम विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांना माहिती देण्याच्या संदर्भात त्यांनी मासिक व पाक्षिक बैठकीत सूचना केल्या असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविण्यात येईल असे कळविले. अपिलार्थीने मागणी केलेल्या इंदिरा आवास योजने अंतर्गत करण्यात येत असलेल्या घरकूल बांधकामासंदर्भातील विचारलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य माहिती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई केली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती

न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ४ ते ५ वेळा गेले असल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करतांना त्यामध्ये व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित झाले नाहीत त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०६-०३-२००७ च्या पत्राव्दारे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली आहे. दिनांक ०६-०३-२००७ चे पत्र अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याबद्दल त्यांनी पोस्टाची पोच आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०३-२००७ रोजी पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस दिनांक १९-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे मिळणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत सर्व संबंधितांना यासंदर्भात सूचना दिल्या असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच तो अपिलार्थीस देण्याचे आश्वासीत केले आहे व इंदिरा आवास योजने अंतर्गत घरकूलाबाबत लाभार्थी स्वतः बांधकाम करत असल्यामुळे त्यांना ताबा पावत्या

देण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले आहे. थोडक्यात अपिलार्थीने दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती पुरविली तर काही माहिती सर्व संबंधितांकडून प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस देण्याचे फक्त आश्वासीत केले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहितीचा उल्लेख ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० मे १९९९ रोजीच्या आदेशामध्ये केलेला आहे. ग्रामविकास विभागाच्या २० मे १९९९ रोजी पारीत केलेल्या आदेशामध्ये, "ग्रामपंचायतीच्या कामाच्या ठिकाणी, पंचायतराज मध्ये बळकटी आणण्यासाठी" त्यांच्या कार्यक्षेत्रात हाती घेण्यात येणा-या रुपये २०००० /- आणि त्याहून अधिक रक्कमेच्या कामाच्या ठिकाणी ५ x ४ फूट माहिती दर्शविणारा फलक बसविण्याबाबत सूचना पारीत केली आहे. याच आदेशामध्ये गट विकास अधिकारी उप अभियंता यांच्या स्वाक्षरीचे फलक बसविल्याचे प्रमाणपत्र संबंधीत कामाच्या बीलासोबत असल्या शिवाय ते देयक अदा करु नये अशा शासनाच्या सूचना सर्व अधिका-यांना दिलेल्या आहेत. अंबड पंचायत समिती क्षेत्रातील कामामध्ये अशा प्रकारचे फलक बसविल्याबाबत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत त्यांचा वरील युक्तिवाद संपल्यानंतर पुढे असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये एकूण ९८ ग्रामसेवकापैकी ६२ ग्रामसेवकांच्या संबंधात आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती पुरविल्या आहेत. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०४-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २८-०४-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस पाठविल्याबद्दल त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत आयोगास, आयोगाने पूर्वसूचना देऊनही सादर

केली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०४-२००७ रोजी ही माहिती दिली किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. थोडक्यात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना प्रथमतः दिनांक ०३-०३-२००७ रोजी व तदनंतर दिनांक २८-०४-२००७ रोजी काही माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०३-०३-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तथापि जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २८-०४-२००७ रोजीची ग्रामपंचायतीसंदर्भातील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीने सांगितले. सदर माहिती अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी हे आयोगाने त्यांना पूर्ण संधी दिली असतांना देखील यासंदर्भात ते कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याचे अशा परिस्थितीत या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने अपेक्षित केलेली माहिती त्यांच्या अधिनस्त असलेल्या ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांच्याकडून घ्यावी लागते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) नुसार कोणाही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास ती माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्यक करणारे त्यांचे सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जी माहिती दिनांक १९-०२-२००७ रोजी प्राप्त व्हावयास पाहिजे होती ती पूर्ण स्वरुपात आज देखील प्राप्त झाली नसल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी लावलेल्या या विलंबाचे समर्थन आज ते आयोगासमोर करु शकत नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई

केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ७ (१) चा त्यांनी भंग केल्याने ते व त्यांचे सहकारी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहकारी या सर्वांनी मिळून अपिलार्थीस अर्धवट व विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त ९० दिवसात भरावी. सदर शास्तीच्या रकमेची कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी यथायोग्यरित्या हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत करावी व तदनंतर ७ दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांचेही वर्तन आयोगास आक्षेपार्ह वाटले असून त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतली किंवा कसे याबाबत कोणताही अर्थबोध होत नाही. त्यांनी या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत केले नाही. त्यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करते असे दिसून येते. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहकारी या सर्वांनी मिळून अपिलार्थीस अर्धवट व विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे करावा.

४. सदर शास्तीच्या रकमेची कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी यथायोग्यरित्या हे आदेश त्यांना प्राप्त झाल्या-नंतर ७ दिवसाच्या आत करावी व तदनंतर ७ दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक २७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रल्हाद किसनराव तौरे, जनसेवा हॉस्पिटल, महाराष्ट्र व्दार जवळ, अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४३

निर्णय दिनांक २७-०२-२००८

श्री. कांबळे चतुरंग रामदास, : अपिलार्थी
मुख्य संपादक साप्ता. किनवटचा
चतुरंग, कार्यालय, सिध्दार्थनगर, जैतवन
बौध्द विहार जवळ, किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सार्वजनिक बांधकाम उपविभाग
क्रमांक २, कार्यालय किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कांबळे चतुरंग रामदास हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट श्री. भास्कर रामचंद्र खिर्डेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर श्री. विठ्ठल यशवंतराव बिरादार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ रस्त्याच्या बांधकामाबाबत २००६ पर्यतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर कडून केंद्रीय मार्ग निधी या योजनेखाली किनवट - माहूर राज्य मार्ग – २३० वर (अ) १०४/०० ते ११४/०० व (ब) १४६/०० ते १५७/०० कि. मी. रस्त्याची सुधारणा करणेबाबत काम सुरु आहे काय ? असल्यास (१) खंडनिहाय कामाचे अंदाजपत्रकांच्या प्रती, (२) खंडनिहाय शेड्यूल बी च्या प्रती, (३) खंडनिहाय काम करणा-या एजन्सीचे नांव, मालकाचे नांव, पत्रव्यवहाराचा पत्ता, (४) खंडनिहाय कार्यारंभ आदेशाचे प्रती, (५) या कामाची देयके अदा करण्यात आली असल्यास त्याची रक्कम, (६) खंडनिहाय मोजमाप पुस्तीकेच्या प्रती, (७) खंडनिहाय कामास उपविभागीय अभियंता, कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी भेटी दिल्याच्या तारखा व नोंदविलेले अभिप्राय यांच्या प्रती, (८) आज तारखेस कामाची तांत्रिक स्थिती काय आहे ? (९) एजन्सी कडून काम पुर्ती करण्याचा कालावधी व तो संपत आला असल्यास शासना-कडून दंड वसुल केल्या जात आहे काय ? असल्यास त्याचा कालावधी व रक्कम, (१०) खंडनिहाय कामास गुणवत्ता नियंत्रकांनी भेटी दिल्या असल्यास त्याच्या तारखा, भेट देणा-या अभियंत्याचे नाव व पदनाम, त्यांने नोंदविलेला अभिप्राय ही माहिती (अ) व (ब) अशी वर्गवारी करुन द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती व या अर्जावर ते दारिद्र्यरेषे खालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याकरिता त्यांच्या कार्यालयात एल. ओ. सी. नसल्यामुळे माहिती देणे अशक्य होत असल्याचे अपिलार्थीस कळविले व एल. ओ. सी. प्राप्त होताच त्यांना माहिती देण्याचे आश्वासीत केले. सदर पत्र अपिलार्थीस

दिनांक २५-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सदर पत्राच्या स्थळप्रतीवर पोच दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांना सहाय्यक अभियंता श्रेणी १ सार्वजनिक बांधकाम उपविभाग किनवट यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत सक्त ताकीद दिल्याचे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांची त्यांचे म्हणणे फॅक्सव्दारे राज्य माहिती आयोगास पाठविले आहे. त्यामध्ये त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांना दिनांक १०-०८-२००७ रोजी भोकर येथून पोस्टाने अर्धवट व अपूर्ण माहिती पाठविली असल्याचे नमूद केले आहे व तद्वतच त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८, ९ व १० च्या संदर्भात माहिती दडविण्यात आली आहे असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी

दुष्टहेतूने जाणुन बुजून संबंधीत गुत्तेदारास मदत करण्याच्या हेतूने माहिती दडवून ठेवल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोण आहेत याबाबत घोळ कायम ठेवलेला असल्याचे नमूद करुन सहाय्यक अभियंता यांना जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता यांना अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त करावे अशी आयोगास विनंती केली आहे. या सर्व बाबी नमूद करुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अचूकपणे त्यांना आजही हवी असल्याचे त्यांच्या या पत्रात त्यांनी नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी -- माहितीच्या संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रती काढून देण्यासाठी त्यांच्याकडे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये आवश्यक तो निधी उपलब्ध नव्हता व तसे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-१०-२००७ रोजी कळविले आहे. याच कालावधीमध्ये अपिलार्थीने इतर ५ रस्त्याच्या कामांची अशाच स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत व मोठ्या प्रमाणावर असल्याने व ती एका ठिकाणी संकलन होत नसल्याने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांना ती देणे शक्य झाले नाही. आवश्यक तो निधी उपलब्ध झाल्यानंतर व संपूर्ण माहिती संकलीत केल्यानंतर ती त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयाचे शिपाई श्री. पी. डी. आडे यांचेमार्फत अपिलार्थीकडे पाठविली. तथापि सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने नकार दिला त्यांच्या या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांच्या कार्यालयाच्या टपालपुस्तकाची झेराक्स आयोगास सादर केली. उप अभियंता यांनी

पाठविलेली माहिती अपिलार्थीने स्विकृत न केल्याने सदर माहिती कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम भोकर यांना दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पोस्टाने पाठविण्यात आली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस सर्व मुद्दयावर दिनांक ०८-०८-२००७ रोजी माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुलतः या प्रकरणी उप अभियंता स्तरावर, त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे मागितली होती. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना नियुक्त केले गेले आहे तर जन अपिलीय अधिकारी म्हणून अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांना नियुक्त केले गेले आहे. अपिलार्थीने जरी उपविभागीय स्तरावरील अधिका-याकडे माहितीची मागणी केली असली तरी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज या प्रकरणी जे प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले आहेत त्यांच्या कडे पाठविणे हे संबंधीत उपविभागीय अभियंता यांचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) अन्वये कर्तव्य होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. अशाच प्रकारची चूक कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर यांच्या हातूनही झाल्याचे दिसून येते. या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले नसल्याने त्यांनी अपील अर्ज अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांच्याकडे पाठवून द्यावयास हवा होता. तथापि असे न करता त्यांनी सहाय्यक अभियंता श्रेणी १ सार्वजनिक बांधकाम उपविभाग किनवट क्रमांक २ यांना अपिलार्थीस माहिती देण्यास सुचित केले

असल्याचे अपिलार्थीस कळविले. तदनंतर देखील अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे किंवा नाही याचा पाठपुरावा त्यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. थोडक्यात उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर हे प्रकरणे अत्यंत निष्काळजीपणे हातातळे गेल्याचे दिसून येते. कार्यकारी अभियंता यांच्यातर्फे असे युक्तिवाद करण्यात आला की, किनवट उपविभागास २८ फेब्रुवारी २००७ रोजी आवश्यक ते आर्थिक अनुदान त्यांनी वितरीत केले होते. उप अभियंता यांनी दिनांक २८-०२-२००७ रोजी अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती किमान मार्च २००७ च्या अखेरपर्यंत देणस काहीही हरकत नव्हती. तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती प्रथमतः दिनांक ०२-०८-२००७ रोजी देऊ केली आहे. म्हणजेच त्यांनी ही माहिती अंदाजे ५ महिने इतक्या विलंबाने देऊ केली आहे असे येथे सिध्द होते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उप अभियंता यांना वेगवेगळ्या टप्प्यात माहिती प्राप्त करुन घ्यावी लागत होती असे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या शपथपत्रामध्ये म्हटले आहे. थोडक्यात अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी उप विभागीय अभियंता हे एकटेच जबाबदार नसून त्यांना या प्रकरणामध्ये माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे या कामाशी संबंधीत इतर कर्मचारी हे देखिल यासाठी जबाबदार आहेत असे येथे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे त्यांचे इतर सहकारी व कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी ज्या प्रकारे विलंब लावलेला आहे तो पाहता या विलंबाचे समर्थन कोणीही करु शकणार नाही. अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीस पात्र ठरत

आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे इतर कर्मचारी / अधिकारी या सर्वांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली ९० दिवसाचे आत भरावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची यथायोग्यरित्या विभागणी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेली माहितीपैकी मुद्दा क्रमांक ७ ते १० च्या संदर्भातील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग भोकर यांनी नक्की कोणती माहिती पाठविली यासंदर्भात विचारणा केली असता उप विभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता या दोघापैकी कोणीही अपिलार्थीस त्यांनी पाठविलेली कथित माहिती आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजी पाठविलेल्या कथित माहितीचे पुनर्विलोकन करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात निदेर्शीत केलेली मुद्दा

क्रमांक ७ ते १० च्या संदर्भातील माहिती त्यांना पुर्वी पुरविलेली नसल्यास आता हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत ती विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे एल. ओ. सी. संदर्भात भाष्य करण्याची विनंती केली आहे. एल. ओ. सी. ही प्रक्रिया शासनाच्या प्रशासकीय प्रक्रीयेचा भाग आहे. माहितीचा अधिकार अधिनियम आस्तित्वात आल्यापासून कार्यालयीन खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे व ती वाढ यापुढेही सतत होत राहणार. तेव्हा सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी अशा प्रकारच्या वाढीचा अंदाज लक्षात घेऊन पुढील आर्थिक वर्षामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्राखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयाकरिता "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली लागणा-या आवश्यक त्या अनुदानाची तरतूद करण्याबाबत विचार करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने यापुर्वीच सर्व कार्यालयाकडे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या असल्याने व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्याचे अधिकार संबंधीत खात्याला असल्यामुळे अपिलार्थीने सहाय्यक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त करावयाच्या आयोगास केलेल्या विनंतीवर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या कथित माहितीचे पुनर्विलोकन करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात निदेर्शीत केलेली मुद्दा क्रमांक ७ ते १० च्या संदर्भातील माहिती त्यांना पुर्वी

पुरविलेली नसल्यास ती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर सर्व अधिकारी / कर्मचारी यांना अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची यथायोग्यरित्या विभागणी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक २७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कांबळे चतुरंग रामदास, मुख्य संपादक साप्ता. किनवटचा चतुरंग, कार्यालय, सिध्दार्थनगर, जैतवन बौध्द विहार जवळ, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८५

निर्णय दिनांक २७-०२-२००८

श्री. बी. जी. सुर्यवंशी, : अपिलार्थी
रा. इतवारा गल्ली, जुना जालना,
तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बी. जी. सुर्यवंशी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद यांचे प्रतिनिधी नगर रचनाकार नगरपरिषद जालना, श्री. नंदकुमार बाबुराव भोजे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार नगरपालिका

प्रशासन श्रीमती ए. एस. भालेराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जालना नगरपरिषदेच्या हद्दीतील अनाधिकृत बांधकामाबद्दल खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. श्री. रमेश राधाकिसन लाड यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत आपणास प्राप्त अधिकारानुसार आपण त्यांचे विरुध्द कार्य कार्यवाही केली याची सविस्तर माहीती देण्यात यावी. तसेच कार्यवाही केली नसल्यास का केली नाही याचीही सकारण माहिती द्यावी.

२. तसेच या अनाधिकृत बांधकामास आपल्या कार्यालयातील स्वच्छता निरिक्षक व नगर रचना विभाग जबाबदार आहेत. तर आपण संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही करुन जबाबदारी निश्चित केली आहे काय ? जर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही केली नसल्यास ती का केली नाही याची सविस्तर माहीती देण्यात यावी. वरील माहीती कृपया मला लवकरात लवकर देण्यात यावी ही नम्र विनंती.

टिप : मुळ अर्ज दि. ७-११-२००६ मध्ये श्री. रमेश राधाकिसन लाड ऐवजी श्री. घनशाम लाड असे चुकीने टंकलिखीत झाले आहे कृपया याची नोंद घ्यावी."

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे (सदर पत्र दिनांक ३१-०१-२००७ रोजी निर्गमीत केले) प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्रावर दिनांक २९-१२-२००७ अशी तारीख चुकीने टंकलिखीत झाली असल्याचे आज जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत क्षेत्रीय अधिका-याकडून मागविली असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनाधिकृत बांधकामाबाबतचा पुढील कारवाई नियमानुसार करण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ३१-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोच जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी त्यांच्या दिनांक ०७-१२-२००६ च्या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी दखल घेतली नसल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २२-०२-२००७, २७-०२-२००७ व ०६-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले अंतीम आदेश दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पारीत केली. सदर पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक ०३-०४-२००७ रोजी अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थीचे अपील या निर्णयामध्ये त्यांनी अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती ७ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय होऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही

माहिती मिळाली नाही. जबाबदार दोषी अधिकारी व कर्मचा-याविरुध्द कलम २० (१) व (२) अन्वये कारवाई करावी व त्वरीत माहिती मिळावी असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने या प्रकरणी नगरपरिषदेकडे दिनांक ०६-११-२००६, ०७-१२-२००६ रोजी दोन वेगवेगळे अर्ज दिले होते. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांना, मुख्याधिकारी नगरपरिषद यांच्याकडून संदर्भिय माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कडील दिनांक २३-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिनांक २८-११-२००६ रोजी व दिनांक ०७-१२-२००६ च्या अर्जासंदर्भाने दिनांक ३१-०१-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अपिलावर त्यांनी दिनांक २२-०२-२००७, २७-०२-२००७ व ०६-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये पारीत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-११-२००६ ०७-१२-२००६ रोजीच्या अर्जास प्रतिसाद त्यांच्याकडील अनुक्रमे दिनांक २८-११-२००६ व दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिला आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थीने केलेल्या दिनांक

०७-१२-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी उशिरात उशीरा दिनांक ०६-०१-२००७ रोजी प्रतिसाद देणे भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या माहिती संदर्भात दिनांक ३१-०१-२००७ रोजी म्हणजेच २५ दिवसाच्या विलंबाने दिल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये असे म्हटले आहे की, अपिलीय अधिका-याने आदेशीत करुन सुध्दा त्यांना माहित मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे विलंबाबाबत शास्ती लावण्यात यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दिनांक ०३-०४-२००७ रोजी पारीत करुन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक २ ची माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशीत केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या सुचने-प्रमाणे कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक २ व्दारे अनाधिकृत बांधकामाबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित केली आहे काय, जर जबाबदारी निश्चित केली नसल्यास ती का केली नाही याची माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या प्रश्नाचे उत्तर त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या पत्रामध्ये समाविष्ठ आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केलेल्या मुद्दयावर त्यांनी निर्णय पारीत करण्याआधीच कारवाई झाली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर कारवाई केली नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग मान्य करतो. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचा

खुलासा अपेक्षित करणारी अशी आहे.  माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये माहिती या शब्दाची व्याख्या त्यातील कलम २ (च) मध्ये पुरेशा प्रमाणात खालीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. "

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये मागितलेली माहिती या व्याख्येशी जुळत नसल्याचे येथे दिसून येते त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीस ही माहिती देण्याचे बंधन नाही.  एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयासंदर्भात आवश्यक तो खुलासा केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांनी एका अर्जासंदर्भात अपिलार्थीस एकूण २५ दिवसांच्या विलंबाने प्रतिसाद दिला आहे हा मुद्दा विचारात घेणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते. सदर विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना त्यांच्या हाताखालील क्षेत्रीय कार्यालय / अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी लागते. ही माहिती ज्या प्रमाणे प्राप्त झाली त्याप्रमाणे ती अपिलार्थीस पुरविण्यात आली. संबंधीत क्षेत्रीय अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्याकडून अधिनियमाव्दारे आवश्यक

त्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना ती अपिलार्थीस पुरविण्यास विलंब लागला. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) नुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. या प्रकरणी अपिलार्थीस २५ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे सर्व जण जबाबदार असल्याचे आयोगास दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी केलेल्या विलंबाचे समर्थन आयोगास स्विकारार्ह नाही.

सबब जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या सर्वांना या प्रकरणी, त्यांनी कोणत्याही वैध कारणा शिवाय अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या २५ दिवसाच्या असमर्थनीय विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (२५ दिवसाकरिता) एकूण रुपये ६२५० /- (अक्षरी- रुपये सहा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली भरावी. जन माहिती अधिकारी यांनी सदर शास्तीची रक्कम ६ हप्त्यात भरण्यास परवानगी देण्याची आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत असून त्यांनी ही रक्कम एकूण ६ हप्त्यामध्ये भरावी असे त्यांना येथे आदेशीत करण्यात येत आहे. शास्तीचा पहिला हप्ता त्यांनी मार्च २००८ व शेवटचा हप्ता ऑगस्ट २००८ मध्ये भरावा. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी मुख्याधिकारी नगरपरिषद जालना यांनी

यथायोग्यरित्या करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे नियमीत शासकीय कोषागारात भरत असल्याबाबतचा अहवाल मुख्याधिकारी नगरपरिषद जालना यांनी आयोगास येथून पुढे दरमहा सादर करावा. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००६ व ३१-०१-२००७ रोजी पुरविलेली माहिती अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या २५ दिवसाच्या विलंबाबाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (२५ दिवसाकरिता) एकूण रुपये ६२५० /- (अक्षरी- रुपये सहा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे करावा.

औरंगाबाद
दिनांक २७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बी. जी. सुर्यवंशी, रा. इतवारा गल्ली, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६४

निर्णय दिनांक : २७-०२-२००८

१ श्री. अरविंद मिलींद पांडे, : तक्रारदार
फ्लॅट नं. २, अष्टविनायक एन्क्लेव्ह,
बन्सीलालनगर, औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा तहसीलदार, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. अरविंद मिलींद पांडे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद श्रीमती अपर्णा दिनेशचंद्र सोमाणी ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) या हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे विरुध्द त्यांचेकडील दि. २२.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अशी तक्रार केली आहे की, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाने प्रतिपृष्ठ रु.२/- इतकी फीस निश्चित केली असतांना उत्तरवादी हे प्रतिपृष्ठ रु.१०/- इतक्या रकमेची मागणी करीत आहेत व याबरोबरच माहिती आयोगाने प्रतिपृष्ठ रु.२/- असा दर आकारल्यासंबंधी पत्र त्यांना दिल्यास ते तक्रारदारास अपेक्षित माहिती, त्या दराप्रमाणे उपलब्ध करुन देऊ शकतील. उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीचे वेळी तक्रारदार उपस्थित नाहीत. तथापि तक्रारदारांनी दिलेल्या पत्त्यावर आयोगाचे पत्र ज्यांना प्राप्त झाले आहे, असे श्री. मिलींद

अरविंद पांडे हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगासमोर शपथपत्राद्वारे असे लिहून दिले आहे की, राज्य माहिती आयोगाकडे अरविंद मिलींद पांडे या नावाने दि. २२.३.२००७ रोजीच्या केलेला अर्ज, त्यांच्या नावाचा गैरवापर करुन दुसऱ्या कोणीतरी अज्ञात व्यक्तीने आयोगास सादर केला आहे. उत्तरवादी यांचेकडून त्यांनी जी माहिती मागितली होती त्यांना ती विहित मुदतीत मिळाली असल्याने त्यांनी आयोगाकडे तक्रार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. उत्तरवादी यांना मानसिक त्रास देण्याच्या हेतूने सदरचा अर्ज कोणीतरी अज्ञान्त व्यक्तीने आयोगास दिला असावा, असे त्यांनी शपथपत्राच्या अखेरीस म्हटले आहे. आयोगाकडे प्राप्त झालेल्या अर्जामध्ये तक्रारदाराचे नाव अरविंद मिलींद पांडे असे आहे. तथापि सदर तक्रार अर्जामध्ये निर्देशित केलेल्या पत्त्यावर अरविंद मिलींद पांडे नावाचे कोणीही व्यक्ती राहत नसून त्या ठिकाणी मिलींद अरविंद पांडे राहत आहेत. त्याप्रमाणे तयांनी शपथपत्र आयोगास सादर केले आहे. तक्रारअर्जावरील तक्रारदाराची सही पाहता, त्यांनी श्री.मिलींद अरविंद पांडे यांच्या सहीची नक्कल केल्याचे दिसते.

सबब वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

२. तक्रारदार यांची तक्रार खारीज येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलींद अरविंद पांडे, रा. फ्लॅट नं.२, अष्टविनायक एन्क्लेव्ह, बन्सीलालनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती